# बाबांनी काळाला परतविले!

–श्री. विवेक वकारे
बडोदे, गुजरात.

मी बडोदे येथे राहणारा महाविद्यालयाचा विद्यार्थी. माझे मामा, आजी, आजोबा व मावशी हे सर्वजण साईबाबांचे उपासक आहेत. मामाकडे १९६० पासून दर गुरुवारी संध्याकाळी नारळाचा प्रसाद केला जातो. १९९१ च्या जून महिन्यातील हा प्रसंग. या वर्षीच्या आठ व नऊ जूनला पावसाने अक्षरश: थैमान घातले होते. इतकेच नव्हे तर गेल्या शंभर वर्षांतील उच्चांकही मोडला होता. आम्ही भाईंदरहून विरारला चाललो होतो. सव्वा सहाला विरार लोकल आली. स्त्रियांच्या डब्यात आजी व आईला बसवून पुरुषांच्या डब्यात मी बसायला गेलो. गर्दीमुळे मला आत जाता आले नाही. जेमतेम दारातील खांबाला धरून उभा होतो. एवढ्यात गाडीने वेग घेऊन फलाट सोडले व खांब हातातून सटकून मी बाहेर फेकला गेलो. मी जेव्हा शुद्धीवर आलो तेव्हा स्ट्रेचरवर होतो. पोलिस माझ्या बाजूला उभे होते. मी त्यांना माझा पत्ता सांगितला व पुन्हा बेशुद्ध झालो. परत ज्यावेळी शुद्धीवर आलो तेव्हा मी बोरीवलीच्या भगवती रुग्णालयात होतो व माझे सर्व मामा बाजूला उभे होते.

सर्वसाधारणपणे अपघात झाल्यानंतर पोलिस लवकरात लवकर मोकळे होण्यासाठी त्यांच्याकडून केल्या जाणाऱ्या सोपस्काराला प्राधान्य देतात; परंतु त्या दिवशी त्या हवालदाराने दूरध्वनीवर संपर्क साधून मामांना घरी कळविले. माझ्या मामांना सर्व मदत करून प्रथम वर्गाच्या डब्यातून वसईपर्यंत पोहचविले. मामांनी आग्रह करूनदेखील त्याने जेवण घेतले नाही; उलट त्यानेच मामांना चहा दिला व धीरही दिला.

कोण होते ते? बाबांशिवाय कोण असणार! हवालदाराच्या रुपाने बाबाच प्रत्यक्ष आले होते. पंधरा दिवसांनी बरे वाटल्यावर पुन्हा आम्ही सर्वजण शिरडीला गेलो. बाबांचे दर्शन घेताना अश्रूंच्या धारांमध्ये त्यांची मूर्ती झिनटली होती.

## ....आणि असे बाबांचे द्वारकामाईत दर्शन घडले!

–सौ. मेघा केळकर
देवळाली, नाशिक.

साईबाबा भक्ताची कसोटी घेत घेत त्याची मनोकामना कशी पुरी करतात, याचा अनुभव मला आला. एप्रिल महिन्यात मुलांच्या परीक्षा संपल्यावर मी मुंबईला दादर येथे विश्रांतीसाठी माझ्या माहेरी येऊन राहिले. नऊ मेला आम्ही शिरडीला साईंच्या दर्शनासाठी जायचे ठरविले. बाबांनी या खेपेस माझी परीक्षाच जणू घ्यायची असे ठरविले की काय असे येणाऱ्या अनुभवांवरून वाटू लागले. २७-२८ एप्रिलच्या दरम्यान माझी प्रकृती बिघडली. कानाचे दुखणे सुरु झाले. वैद्यकीय इलाजाने ते बरे झाले. नऊ तारखेला सकाळीच माझ्या मुलाला ताप आला. त्या दिवशी जाण्याचे आम्ही रद्द केले. अकरा मेला माझ्या सासरी येते असे कळवून टाकले; कारण बारा मेचे आमचे शिरडीचे आरक्षण झाले होते. दहा मेला मुलाला पुन्हा ताप आला. अकरा तारखेला बारा वाजेपर्यंत निघणे आवश्यक होते; पण ताप काही कमी होत नव्हता. आमच्या घराजवळच्या श्री साईमंदिरात गेले. बाबांना कळवळून सांगितले की बाबा, मला तुमचे द्वारकामाईतील दर्शन हवे आहे. घरी आले तर मुलाचा ताप जरा कमी होता. त्याला डॉक्टरकडे दाखवून आणले व बाबांवर भार टाकून बारा मेला माझ्या पतीसमवेत मी शिरडीला पोहचले. द्वारकामाईत गेल्यावर अनपेक्षित व अद्भुत असा चमत्कार मला पहायला मिळाला. संस्थानचे भटजी बारा वाजता येऊन पूजा करतात. त्यांची पूजा होईपर्यंत साखळी-खांब बांधून पहारेकरी बाकीच्या भक्तगणांना बाहेर थांबवून ठेवतात. मी मात्र एकटी आधीच पूजा करीत असल्यामुळे आत अडकले होते. बाबांनी असा प्रसंग घडवून आणून जणू ते सांगत होते, "माझ्या दर्शनाची तळमळ लागून राहिली होती ना! घे, अगदी शांतपणे, मनसोक्त दर्शन घे! त्याकरिताच तुला मी एकटीला आत अडकवून ठेवले आहे." माझे मन साईदर्शनाने तृप्त झाले होते. माझ्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले. माझी कठोर परीक्षा घेऊन माझ्या आवडत्या द्वारकामाईचे दर्शन बाबांनी अखेर अशाप्रकारे घडवून आणले.

## ....तू दुःखहर्ता....

–सौ. अनघा पटवर्धन
नागपूर.

मागच्या वर्षीच्या घटस्थापनेच्या दिवशी जागा, परिसर व घराचा आराखडा पसंत पडल्याने आम्ही जागेसाठी पैसे

भरले. थोडीशी चौकशी करून व विश्वास ठेवून आम्ही बिल्डरला पंधरा हजार रुपये दिले. सहा महिने झाले तरी घरबांधणीला सुरुवात झाली नाही म्हणून पुन्हा चौकशी केली. तेव्हा कोणाकडून तरी समजले की त्या बिल्डरने अनेक लोकांना फसविले आहे. हे ऐकताच आमच्यावर आभाळ कोसळल्यासारखे झाले. देवघरात जाऊन साईमहाराजांचे पाय धरले आणि दिनवाणी होऊन मदतीची याचना केली. पैशासाठी बिल्डरकडे गेलो तर तो भेटत नसे. साईंवर निष्ठा ठेवून त्याच्याकडे परत परत जातच होतो. एका गुरुवारी तो स्वतःहून आमच्या घरी आला व थोडे थोडे पैसे देवून आमचे सर्व पैसे त्याने परत केले.

## असता पाठी श्री साई, चिंता मग कशापायी!

–श्रीमती सुलभा गोटखिंडीकर
कोल्हापूर.

११ जून, १९९० रोजी मी माझ्या मुलीबरोबर कोल्हापूरहून सांगलीला गेले होते. मुलीला नथ व कानातले घ्यायचे होते, ते घेतले, माझी नात अमृता हिच्यासाठी कानातले घेतले. दुकानदाराने बील दिल्यावर माझ्याकडचे, मुलीकडचे पैसे घेऊन बील भागविले. नंतर मला माझ्या भावाकडे जायचे होते. जवळ रिक्षापुरतेही पैसे शिल्लक राहिले नव्हते. दोन-अडीच हजार रुपयांची खरेदी उत्साहाने केली; पण परतीच्या भाड्याइतकेही पैसे उरले नव्हते.

पुन्हा पुन्हा पर्स उघडून पाहिली; परंतु श्री साईबाबांचा फोटो, उदीची पुडी व थोडी चिल्लर याशिवाय काहीच उरले नव्हते. काय करावे सुचेना! तसेच भावाच्या घरी गेलो. रिक्षाचे पैसे वहिणीने दिले. भावाच्या घरी सौ. वहिनींबरोबर बोलणे, गप्पा वगैरे चालू होते. तरी मनात एकच विचार चालू होता की पैशाशिवाय कोल्हापूर कसे गाठायचे? शेवटी धीर करून बहिणीला सर्व सांगितले व तिच्याकडे पंधरा रुपये मागितले. तिने लगेच दिले. मला उगाचच संकोच वाटत होता.

पुन्हा एकदा सर्व पर्स जमिनीवर ओतली. साईंचा फोटो ठेवताना पाठीमागे कसलातरी कागद आहे, असे वाटले म्हणून उघडून पाहता त्यात पन्नास रुपयांची एक नोट मिळाली. बहिणीचे पैसे परत दिले. मन अगदी निश्चिंत झाले. साईंच्या कृपाशीर्वादाने मन कसे भरून आले! वाटले.... असता पाठी श्री साई, चिंता मग कशापायी....

## ही तर श्री साईंची लीला!

–श्री. ल. म. रणदिवे
दादर (प.), मुंबई.

माझा नातू चि. रोहन याला दिनांक १७-८-९१ रोजी १०३ डिग्रीपर्यंत ताप चढला. फॅमिली डॉक्टर, स्पेशालिस्ट डॉक्टर यांना दाखविले; पण ताप काही उतरेना. बाबांना प्रार्थना केली की तुमच्याशिवाय आम्हाला कोण सहाय्य करणार!

चमत्कार असा की दिनांक २३-८-९१ रोजी मे-जूनचा 'श्री साईलीला'चा अंक आला. मुखपृष्ठावर श्री साईबाबांची अत्यंत आकर्षक व सुंदर प्रतिमा होती. तो अंक घेऊन रोहनकडे गेलो व म्हणालो, "रोहन, हे बघ बाबा आले. तेच तुझा ताप उतरवतील." मुखपृष्ठावरील बाबांना नमस्कार केला व रोहनला उदी लावली. त्याचवेळेपासून त्याचा ताप उतरू लागला व दिनांक २४-८-९१ च्या सकाळी ताप पूर्णपणे उतरला. कृपाळू बाबांना माझे कोटी कोटी प्रणाम.

## बाबांच्या उदीचा अगाध महिमा

–सौ. सुहिता बोडके
गोरेगाव, मुंबई.

आमच्या घरात सर्वांचे आशास्थान म्हणजे शिरडीचे श्री साईबाबा. बाबांच्याच कृपेने साईभक्त असलेले पती मला लाभले व वारंवार मला शिरडी-दर्शन घडू लागले. १९८८ ला माझ्या मानेवर गाठी आल्या होत्या. मी रोज सकाळी आंघोळ केल्यावर बाबांची उदी लावायला सुरुवात केली. काही कालावधीनंतर त्या गाठी बऱ्या झाल्या. मार्च १९९१ मध्ये माझ्या डाव्या बाजूने छातीत अचानक कळ येऊन घटकेत खांद्याच्या वरच्या भागात वेदना होऊ लागल्या. वेदना इतक्या असह्य होत की त्यावेळी काही सुचेनासे होई. बाबांचा धावा सुरु केला, उदी लावली. डॉक्टरांनी क्ष-किरण वगैरे तपासणी केली. बाबांच्या कृपेने रिपोर्ट चांगला आला.

## "....मी तुझ्या पाठीशी आहे.... काळजी करू नकोस...."

–कु. प्रणिता सांगळे
पुणे.

मी, माझी बहीण व तिची मैत्रीण अशा आम्ही तिघी मिळून एकदा कालीपूजा पहायला गेलो होतो. तेव्हा आम्ही कलकत्त्यात रहात होतो. कालीमातेसमोर डेकोरेशन केलेले होते. ते भयानक डेकोरेशन पाहून मी पार घाबरून गेले व मला खूप ताप भरला. असे खूप दिवस चालले होते. ताप काही केल्या उतरत नव्हता. एक दिवस माझे हात-पाय, तोंड वाकडे झाले. गळा सुजला. आईने मला दवाखान्यात नेले. डॉक्टरांनी इंजेक्शन दिले; पण गुण काही आला नाही. घरी आल्यावर मी झोपले. तेथे एका कोपऱ्यात साईबाबा उभे होते. पांढरेशुभ्र कपडे घातलेले, पायात खडावा असलेले, एका हातात काठी घेतलेले. कोपऱ्यात उभे राहून मला म्हणाले, "तू काळजी करू नकोस. मी तुझ्या पाठीशी आहे. तुला शिरडीहून उदी पाठवितो. ती तू घे. लवकर बरी होशील." असे म्हणून ते

अंतर्धान पावले. मी आईला हे सांगितले. आईला वाटले, मी तापात बडबडत आहे; कारण त्या महिन्याचा उदी-प्रसाद पूर्वीच आला होता. परंतु नंतर थोड्या वेळाने खरेच पोस्टाने उदी-प्रसाद आला. आईने त्यातील उदी मला पाण्यातून दिली, कपाळी लावली आणि आश्चर्य म्हणजे, माझे वाकडे झालेले हात-पाय, तोंड अगदी ठीक झाले.

## बाबांच्या श्रद्धा-सबुरीची अशी प्रचिती आली!

**–श्री. भूषण पंडित**
गोरेगाव, मुंबई.

मी एका प्रसिद्ध कंपनीत एअर-कंडिशनर मेकॅनिकचा डिप्लोमा पूर्ण केला. त्यानंतर भारत सरकारची परीक्षादेखील प्रथम श्रेणीत पास झालो. मला त्याच कंपनीत चांगल्या पगाराची नोकरी अपेक्षित होती; पण जागा नाही, या सबबीवर तेथे नोकरी मिळाली नाही. त्यानंतर एक-दीड वर्ष मी नोकरीसाठी अक्षरश: वणवण भटकलो. बाबांकडे नोकरीसाठी विनवणी केली व काही दिवसांतच एका कॉन्ट्रॅक्टरकडे मला दरमहा रु. ६००/- ची नोकरी मिळाली. मला वाटले, बाबांनी माझी प्रार्थना ऐकली; पण असली नोकरी काय कामाची! परंतु या काळात बाबा माझ्यासाठी चांगल्या नोकरीची व्यवस्था करीत आहेत, याची मला काय कल्पना!

त्यानंतर काही दिवसांतच पेपरमधील जाहिरात वाचून मी जर्मन केमिकल कंपनीत अर्ज केला. चार जागांसाठी लेखी परीक्षेला अनेकांना बोलविण्यात आले होते. बाबांचे नामस्मरण करूनच मी पेपर सोडवला. एवढ्या जणांमध्ये आपला नंबर लागेल का, ही काळजी मनाला लागून होती; परंतु पंधरा दिवसांनी मुलाखतीसाठी बोलविलेल्या सोळाजणांतून चारजणांना पुन्हा दुसऱ्या मुलाखतीसाठी बोलविण्यात आले.

ही मुलाखत पहिल्या मुलाखतीपेक्षाही जास्त चांगली झाली. तद्नंतर तेथील अधिकाऱ्याने तुम्हाला वैद्यकीय तपासणीसाठी पत्राने कळवू, असे सांगितले. मी फार निराश झालो; कारण अशाप्रकारचे उत्तर मिळाले की पुन्हा बोलवितच नाहीत, असा माझा अनुभव होता. त्यामुळे भीतीही वाटू लागली. तेव्हा बाबांच्या 'श्रद्धा व सबुरी' या महामंत्राचा मला अनुभव आला.

आज त्या कंपनीत मी काम करीत आहे. जवळजवळ शंभरेक मुलांतून चारजणांची निवड होणे व त्यात माझा समावेश असणे, हा केवळ योगायोगाचा किंवा नशिबाचा भाग नसून श्री साईनाथांच्या कृपेचेच ते एक फळ आहे, असे मला वाटते. बाबांनी माझ्याबाबतीत केलेल्या चमत्काराने मन भरून येते, हात जोडले जातात व मस्तक त्यांच्या चरणांवर विसावते.

## बाबांवर विश्वास ठेवला म्हणजे इच्छापूर्ती ही होतेच!

–तृप्ती राजेश्वरकर
हैद्राबाद, आंध्रप्रदेश.

माझा बाबांवर पूर्ण विश्वास आहे. त्यांचं नाव घेऊन, त्यांच्यावर विश्वास ठेवून कोणतीही गोष्ट केली की इच्छापूर्तीचा आनंद हा मिळतोच, असा माझा आजवरचा अनुभव आहे. एस.एस.सी. झाल्यावर मी विज्ञानशाखेत प्रवेश घेतला. बी.एस्सी.च्या शेवटच्या परीक्षेत प्राणीशास्त्राचा पेपर थोडासा कठीण गेला होता; पण पास होण्यापुरते गुण मिळतील, असे वाटत होते. निकालाच्या दिवशी वर्तमानपत्रात पहाते तर माझा पास झालेल्यांच्या यादीत नंबर नव्हता. त्यानंतर मी गुरुवारी पोथी-वाचन सुरू करून आठवड्याभरात ते समाप्त केले.

निकाल लागल्यानंतरच्या तिसऱ्या गुरुवारी माझे वडील विद्यापीठात जाऊन आले. तिथे एकाने पुनर्मुल्यांकनासाठी अर्ज करा, असे सांगितले. मी माझ्या अभ्यासाच्या पुढच्या तयारीला लागले. नंतर कळले की मी पास झालेले आहे. हे सारे बाबांच्या कृपेमुळे झाले, अशी माझ्या मनाची ठाम धारणा आहे.

## बाबांच्या दर्शनाने नोकरी मिळाली!

**–श्री. पी. बी. बाळीकर**
मुंबई.

१९५७ मध्ये मी एस्.एस्.सी. पास झालो. त्यावेळी मी बहिणीकडे रहात होतो. नोकरीसाठी प्रयत्न चालू होते. माझ्या मित्रांनी शिरडीला बाबांच्या दर्शनाला जायचे ठरविले. माझ्या मनातही बाबांच्या दर्शनाला जायची फार इच्छा होती; पण पैशांची अडचण आड येत होती.

एके दिवशी सकाळीच मी बाहेर चाललो होतो. जीना उतरत असताना मला एकूण ५० रुपयांच्या नोटा पडलेल्या दिसल्या. मी ते पैसे उचलले व बहिणीकडे दिले आणि चाळीत कुणाचे पडलेत का, हे विचारायला सांगितले. दोन-चार दिवस विचारल्यानंतरही त्या पैशांवर कुणी हक्क सांगितला नाही. ताई म्हणाली, "अरे, तुझ्या मनात शिरडीला जायचे आहे ना! देवानेच तुझी सोय केली असेल. तू हेच पैसे घेऊन जा!"

मी शिरडीला गेलो. बाबांचे डोळे भरून दर्शन घेतले व नोकरी मिळू दे! अशी बाबांजवळ प्रार्थना केली. शिरडीला जाऊन आलो आणि काय आश्चर्य! दुसऱ्या दिवसापासून मला नोकरीचे कॉल येऊ लागले व मला नोकरी मिळाली.

"जरी हें शरीर गेलों मी टाकून तरी मी धावेन भक्तांसाठी" याची मला प्रचिती आली.

## 'मन साईरंगी रंगले'

–श्री. बाळासाहेब कुरकुटे
इचलकरंजी, कोल्हापूर.

सन १९८८चा दीपावलीचा सण तोंडावर होता. दरम्यान आंबोलीचे महाराज घरी आले. आरती – जेवण झाल्यानंतर आम्ही दोघेही रात्री झोपलो. झोपेत असा दृष्टांत झाला की मी शिरडी गावी असलेल्या साईबाबांच्या देवळात साईबाबांच्या मूर्तीसमोर हात जोडून नमन करीत उभा आहे. साईबाबांनी माझ्याकडे पाहिले व बोटांनी अशी खूण केली की माझ्या पाया न पडता तू पाठीमागे पहा. त्याप्रमाणे पाठीमागे वळून मी हात जोडून उभा राहिलो. तेव्हा तेथे समोर शंकराची मोठी व उंच पिंडी दिसली. त्या पिंडीवर असलेला 'श्री राम' हा महामंत्र मी वाचला व आनंदी झालो. सकाळी शेजारी झोपलेल्या महाराजांना सर्व हकिगत सांगितली तेव्हा महाराजांनी सांगितले की श्री साईबाबा तुझ्यावर प्रसन्न झाले असून त्यांनी तुला 'श्री राम' हा महामंत्र दिला आहे.

यापूर्वी शिरडीच्या साईबाबांबद्दल मला काहीच कल्पना नव्हती. काही दिवसांनी लगेच दिवाळीच्या वेळी म्हणजे साईबाबांनी पाण्याचे दिवे लावले त्या दिवशी आम्ही शिरडीला गेलो. बाबांच्या पहिल्याच दर्शनाने नयनी अश्रू दाटले, मनाला सात्त्विक समाधान लाभले. दरवर्षी बाबांच्या पुण्यतिथीच्या दिवशी त्यांचे गुण-गान, पूजा-अर्चा व अन्नदानाचा कार्यक्रम आम्ही करीत असतो. त्यांच्याचमुळे संतसज्जनांची संगत लाभू लागली.

साईबाबांच्या भक्तीमुळे मानसिक समाधान मिळून अंगी समभाव निर्माण झाला आहे. असाच समभाव इतर भक्तांमध्ये निर्माण व्हावा, अशी साईचरणी प्रार्थना.

## साईजपाची प्रचिती

–सौ. निर्मला मालवणकर
दादर (पूर्व), मुंबई.

माझा भाचा एकाएकी आजारी पडला व त्याला वांद्र्याच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याला पहायला मी रुग्णालयात गेले. तेथे जिन्याची पायरी न दिसल्यामुळे मी खाली तोंडावरच पडले व माझी जीभ दाताखाली सापडून कापली गेली. नाकाला, डोळ्याला मुका मार बसला व तोंड सुजून काळे-निळे झाले. माझ्या सुनेने भाभा रुग्णालयात नेऊन माझ्या जिभेला टाके घालून आणले. मी घरी आले तर जीभ तोंडाच्या बाहेर व मी असह्य वेदनांनी पिडलेली!

हृदयी साईनाथांचा सारखा जप चालला होता. माझ्या आजारपणाची बातमी वाऱ्यासारखी नातलगांत पसरली. माझ्या दोन्ही मुली मला पहायला आल्या. तीन दिवस त्या सारख्या आमच्याकडे येत राहिल्या. माझी परिस्थिती पाहून त्या हबकूनच गेल्या. माझा जप अविरत चालूच होता. एका आठवड्यात जीभ आत गेली. मला बरे वाटू लागले. माझी वाचा जाईल की काय, ही भीती; पण साईकृपेने व त्यांच्याच जपाने माझी वाचा आली.

## साईंची अतर्क्य लीला

–श्री. सुहास जोशी

आमच्या शिरूर येथील महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य शिवाजीराव भोसले यांना घेऊन येण्याचे काम माझ्यावर सोपविले होते. निफाड येथे त्यांचे भाषण होते. तेथे त्यांना मी भेटलो. आम्ही यायला निघालो. दहा मिनिटांतच लक्षात आले की प्राचार्य शिवाजीरावांचे भोजन झाले नव्हते. शिरूरला पोहचायला रात्रीचे दीड-दोन वाजणार होते. खानावळीत भोजन करायचे तर २५-३० रुपये लागणार व माझ्याजवळ तर तेवढे पैसे शिल्लक राहिले नव्हते. काय करावे काही कळतच नव्हते!

शिवाजीराव वाटेत म्हणाले, "सुहासराव, आपल्याला वाटेत थोडा वेळ श्री क्षेत्र शिरडी येथे दर्शनासाठी थांबायचे आहे." श्री क्षेत्र शिरडीत माझ्या काही ओळखी झालेल्या होत्या. श्री. टिनूभाईची तर उत्तम खानावळ होती व दुसरे श्रीमान बाबूजी अभ्यागतप्रिय कार्यकर्ते होते. गाडी शिरडीत प्रविष्ट झाली. नेमके ते दोघे कार्यकर्ते बोलत उभे असलेले दिसले. शिवाजीरावांची ओळख करून देताच दोघांनाही सुखद आश्चर्य वाटले. दोघेही त्यांना आपल्याकडे जेवायला येण्याचा आग्रह करू लागले. आम्ही श्री साईदर्शन घेऊन आलो. शिवाजीरावांना उत्तम भोजन झाले. भक्ताला संकटातून वाचविण्याची साईंची कृपा अतर्क्य आहे, याची पुन्हा एकदा प्रचिती आली.

## ....धरा दृढ बुद्धी माझ्या ठायी!

–श्री. प्रभाकर गोडबोले
ग्वाल्हेर, म.प्र.

जुलै महिन्यात माझी मुलगी संस्कृत परिषदेकरिता दहा दिवसांच्या शिबिरासाठी भोपाळला गेली होती. जाताना ओळखीच्या गृहस्थांबरोबर गेली. ते गृहस्थ शिबिर आटोपण्याच्या आतच काही कामानिमित्त परत आले. माझा भाऊ भोपाळला रहातो. त्यालाही मी कळविले होते. शिबिर समाप्तीच्या दिवशी तो तेथे पोहचला नाही. शिबिराचे कार्यवाह हे मराठी सद्गृहस्थ. त्यांनी माझ्या मुलीला आपल्या घरी नेले. माझा भाऊ पंचवीस किलोमीटर दूर रहातो. दुसऱ्या दिवशी त्यांनी माझ्या मुलीला

माझ्या भावाकडे पोहचविले. मुलीला यायला उशीर झाला व सोबत जे गृहस्थ गेले होते तेही परत आलेले पाहून इकडे आम्ही घाबरून गेलो.

मी मनातल्या मनात बाबांचे स्मरण करून मुलगी जेथे असेल तेथे सुखरूप ठेवा, अशी प्रार्थना करीत होतो. मी ग्वाल्हेरहून निघालो. स्टेशनवर माझ्याच शेजारी रहाणारे एक गृहस्थ भेटले. ते म्हणाले, एवढ्या दूर कशाला जायचा त्रास करता? मी जातोच आहे तर तुमच्या भावाच्या घरी जाऊन तुमच्या मुलीला घेऊन येतो. दुसऱ्या दिवशी भोपाळला जाऊन त्यांनी माझ्या मुलीला बरोबर आणले. बाबांच्या कृपेने आमची काळजी दूर झाली. बाबा नेहमी म्हणत, तुम्ही माझ्यावर विश्वासून राहिलात तर मीही तुमची काळजी दूर करीन.

## जो जो, मज भजे जैशा जैशा भावे....

–श्री. प्र. अ. पुराणिक
धुळे.

लग्नसमारंभाच्या निमित्ताने आम्हा सर्वांना संगमनेरला जाण्याचा योग आला. वाटेत साईदर्शनाचा लाभ मिळेल, ही एक सुप्त इच्छा. अण्णा, माझे थोरले बंधू हे प्रस्थान संयोजक. आधी शिरडीला जाऊन बाबांचे दर्शन घेऊन पुढे जाऊ या का, असे त्यांना विचारता अण्णा काही तयार होईनात. "अरे, एकदा उतरलो की साऱ्या प्रवासाचे खोबरेच होईल", अण्णा म्हणाले.

दुसऱ्या दिवशी लग्नाचा सोहळा थाटात पार पडला. वधूपित्याने सर्वांना पंचपक्वान्नाचे भोजन दिले व आवर्जून सांगितले, "कसेही करा; पण जाताना नवदांपत्याला श्री साईबाबांचे दर्शन घडवा." सर्वांचा निरोप घेऊन वऱ्हाड परतीच्या प्रवासाला निघाले. अण्णांचा नाद सोडून मी दादांना विचारले की परत जाताना तरी आपण साईदर्शन घेऊ या. दादा म्हणाले, "अरे, ही कान्ट्रॅक्टची बस आहे. रात्रीपर्यंत ही गाडी डेपोत जमा नाही केली, तर दंड भरावा लागेल."

शिरडीतून गाडी जात असताना सर्वांनी गाडीतच बसल्या जागी श्रद्धेने साईबाबांना, मंदिराला व शिरडीला नमस्कार केला व नंतर वेळेवर गावी पोहचण्यासाठी गाडीने भरधाव वेग घेतला. आमची एस्.टी. शिरडीपासून चार-पाच किलोमीटरवर बंद पडली. जिथे बंद पडली तिथे एक पानपट्टीचे दुकान होते. त्याठिकाणी एक कॅसेट चालू होती. गाण्याचे बोल होते.... साईबाबा बोलो.... गाडीचे रूसणे व गाण्याचे मार्मिक बोल यांची काहीतरी संगती असावी, असेच वाटले. समोर पाहिले, तर अण्णा आणि दादा दोघेही स्तंभित झाले होते. त्यांनी ड्रायव्हरला विचारले. त्याने सांगितले की गाडीचा कुठलातरी पार्ट तुटला आहे व गाडी आता कुठल्याही परिस्थितीत पुढे जाणार नाही. ड्रायव्हर कुठलेतरी वाहन पकडून कोपरगावला मेकॅनिक आणण्यासाठी गेला. गाडी दुरुस्त होऊन पोहचायला खूप वेळ लागला. आर्थिक भुर्दंड पडला तो वेगळाच.

माझ्या मनात मात्र सारखे येत होते की शक्य असूनही साईंचे दर्शन घेतले नाही, त्याचे तर हे प्रायश्चित्त नव्हे ना!

### 'श्री साईलीला' लेखक-कवींस निवेदन

**गद्यलेखन**

'श्री साईलीला'कडे साहित्य पाठविताना 'श्री साईलीला' लेखकांनी पुढील प्रकारात आपले लिखाण बसते का, याची दक्षता घ्यावी.

दिवंगत संत महात्म्यांवर आधारित समयोचित लिखाण.

श्री साईबाबांचे पूर्व व समकालीन संतांचे तत्त्वज्ञान, कार्यप्रणाली व श्री साईबाबांचे तत्त्वज्ञान, कार्यप्रणाली यातील साम्य व भेद.

श्री साईबाबांचे उपदेश, बोल व घटना यांविषयी आपल्याला झालेले आकलन, उमगलेला विश्लेषणात्मक अर्थ.

श्री साईबाबांचे उपदेश आचरण करताना आलेले अनुभव.

श्री साईबाबांच्या कृपाछायेचे अनुभव.

श्री साईबाबांच्या जीवनावरील अन्य भाषेतील समर्पक लिखाणाचे अनुवाद (मूळ लेखकाचा, पुस्तकाचा संदर्भ देणे आवश्यक).

बालसाईभक्तांसाठी हलक्या-फुलक्या, सहज-सोप्या भाषेत आध्यात्मिक लिखाण.

**कवितालेखन**

कवींनी आपले दर्जेदार काव्यच 'श्री साईलीला'ला पाठवावे. वृत्त, ताल, छंद वा मुक्त छंद इत्यादी आकृतीबंधात न बसणाऱ्या कविता स्वीकारणे शक्य होणार नाही. यासाठी कवितांची रचना व आशय याकडे अधिक लक्ष पुरवावे.

'श्री साईलीला'करिता साहित्य लिहिताना कागदाच्या दोन्ही बाजूस पुरेसा समास सोडावा, दोन ओळींच्या मध्ये पुरेसे अंतर ठेवावे, कागद जीर्ण-विजीर्ण असू नये, आशय व्यक्त करताना तो मुद्देसूद व सलगपणे मांडावा.

जुन्यातलं सोनं

# श्री दासगणू महाराज

(श्री साईलीला, १९५७ अंकांवरून)

'उल्हास साईभक्तीचा। दास गणूनें विस्तारिला साचा॥
वाढविला साई प्रेमरसाचा। स्वानंदाचा सागर॥'

—श्री साईसच्चरित, अ. १५-३२

कांहीं वर्षांपूर्वी आम्हीं शिरडीस श्री साईबाबांच्या दर्शनासाठीं गेलों होतों. त्यावेळीं तेथील एका रहिवाशी भक्तानें असें सांगितलें कीं, प्रथमारंभीं पुष्कळ वर्षांपूर्वी दोन मोठे भक्त येथें येऊन बाबांची कृपा संपादन करिते झाले. तें भक्त म्हणजे (१) उपासनीबुवा आणि (२) दासगणू. पहिल्याला बाबांनीं खंडोबाच्या देवळांत आणि दुसऱ्याला विठ्ठल मंदिरांत बसावयास लावून ध्यान, तपश्चर्या करण्यास सांगितलें. दोघांनाहि सिद्धि प्राप्त झाल्या. पहिल्यानें आपल्या सिद्धीच्या जोरावर पुष्कळ संपत्ति मिळवून साकोरी नगराची स्थापना केली. दुसऱ्याची कामगिरी अतिशय महत्त्वाची अशी झाली. त्यांनीं धनाचा परिग्रह न करितां वैराग्यवृत्तीनें राहून काव्य-वाङ्मय यांचा सागर उत्पन्न केला, वाढविला. त्यांचे मानसपौत्र आयुर्विद्यापारंगत श्री. अनंतराव दामोदर आठवले यांनीं 'संतकवि दासगणू महाराज—व्यक्ति आणि वाङ्मय' हा ग्रंथ लिहून व प्रसिद्ध करून दासगणू महाराजांच्या काव्योदधीची यथार्थ कल्पना जनतेला करून दिली आहे. त्यांत दिलेल्या ग्रंथांची नामावली पाहून वाचक थक्क व आश्चर्यचकित होईल, इतकी ती श्रेष्ठ व मोठी आहे. त्या नामावलीचा नुसता ओझरता उल्लेख वाचकांच्या माहितीसाठीं येथें करीत आहे. ग्रंथाच्या शेवटीं त्यांच्या काव्यसंग्रहाची माहिती येणें प्रमाणें दिली आहे.

(१) संतचरित्रात्मक 'ओवीबद्ध ग्रंथ—भक्तिलीलामृत, संतकथामृत, भक्तिसारामृत इत्यादि ११

(२) ओवीबद्ध ऐतिहासिक चरित्र (शिवछत्रीविजय अपूर्ण)—१

(३) ओवीबद्ध पौराणिक कथा ३

(४) ओवीबद्ध स्तोत्रें—१०

(५) ओवीबद्ध टीकाग्रंथ—८

(६) ओवीबद्ध निवेदन प्रकरणें (कांहीं अपूर्ण)—२४

(७) लोकबद्ध अष्टकें व स्तोत्रें—३३

(८) खंडकाव्यें—२

(९) सुभाषितें

(१०) पोवाडे—१२

(११) प्रासंगिक स्फुट कविता—१७

(१२) आरत्या—१३

(१३) स्फुटपदें

(१४) भजनावली

(१५) कीर्तनोपयोगी व्याख्यानें—८२

ज्यांची बुद्धी तीव्र असेल आणि ज्यांची शक्ति अलोट असेल, त्यांनी या काव्योदधींत आलोडन करून सुखसंपन्न व्हावें. नाहींतर, इतरांनीं, डॉक्टर अनंतराव आठवले यांनीं ग्रंथाच्या शेवटीं, निवडक रत्नें (वेचे) काढून ठेविलेलीं आहेत, त्यांचा यथाशक्ति आस्वाद घ्यावा अशी सप्रेम सूचना करीत आहें.

आतां दासगणू महाराजांच्या कीर्तन पद्धतीविषयीं थोडेसें विवेचन करूं.

पुणें, नगर, सोलापूर या प्रांतांत श्री बाबांची ख्याति पसरलेली होती, पण कोंकणच्या (मुंबईच्या) बाजूस त्यांची माहिती, नानासाहेब चांदोरकर आणि दासगणू महाराज या दोघांनी लोकांना करून दिली व त्यांना साईभक्ति लाविली. दासगणू हे पूर्वी पोलिस खात्यांत नोकर होते. ते उत्तम कवि असून तमाशांत लावण्या रचून देत असत. नानासाहेबांनीं त्यांना बाबांकडे नेलें. त्यांच्या घरीं दामोदर वामन आठवले ऊर्फ दामुअण्णा नांवाचा एक पोरका, पण गोड कंठाचा व सुस्वभावाचा मुलगा होता. त्याला त्यांनीं बाबांच्या आज्ञेप्रमाणे दासगणूकडे पाठवून दिलें. दामुअण्णाचें मराठी शिक्षण चांगलें झालें होतें. संस्कृताचाहि कांहीं थोडासा अभ्यास त्याने केला होता. त्यामुळें दासगणूंच्या कीर्तनाची साथ तो उत्तम करूं शकला, यामुळें दासगणू आणि दामुअण्णा ही जोडी म्हणजे 'दुधांत साखर' किंवा 'सोन्याला सुगंध' असा प्रकार झाल्यामुळें त्यांची कीर्तनें लोकांना फारच आवडत असत आणि परिणामकारक होत असत.

### दासगणूंची नारदीय कीर्तन प्रथा

दासगणू एकदां शिरडीस असता नीटनेटका पोषाख करून बाबांस भेटण्यास गेले. त्यांना वंदन केल्यावर 'नवरदेवासारखा सजून कुठें चाललास' असा श्री बाबांनीं प्रश्न केला. 'कीर्तन करावयास जातों' म्हणून दासगणूंनीं उत्तर दिलें. त्यावर बाबा

म्हणाले – 'अंगरखा, फेटा कशास, किमर्थ केलास इतुका प्रयास ? हा सर्व भार कशास अंगावर घ्यावा, तो सर्व खालीं काढून ठेव.' तेव्हा त्यांच्या आज्ञेनुसार दासगणूंनीं सर्व पोषाख बाबांच्या चरणांवर ठेविला आणि तेव्हांपासून 'तनु उघडी डोई न पगडी। कासेसी साधीच पंचे-जोडी' यांत सांगितल्याप्रमाणें कीर्तन करण्याची प्रथा पाडली.

> 'तैंपासून उघडे सोज्ज्वल। हातीं चिपळी गळां माळ
> कीर्तन समयीं सर्व काळ। गणूदास हावेळपर्यंत' ॥२७॥
> ही नारदीय मूळ गादी। येथूनचि हरिदासांची मांदी।
> बाह्य रंगाची न ज्यां उपाधी। अंतःशुद्धिध्येय ज्यां॥

– श्री साईसच्चरित, अध्याय १५

याप्रमाणें नारदीय पद्धतीनें लोकांच्या विनंतीला मान देऊन दासगणू कीर्तन करूं लागले. 'एका कवडीचाहि परिग्रह। किंवा दुराग्रह तेथें ना' (अ-१५-१९) असा त्यांचा कीर्तनाचा बाणा असल्यामुळें श्रोत्यांची अतोनात गर्दी व अनिवार उडी कीर्तन प्रसंगीं नेहमीं होत असे. इतर ठिकठिकाणीं ते कीर्तनें करीत असत, तसेंच शिरडीस रामनवमी उत्सव १९१२ सालीं सुरू झाल्यावर चवथ्या वर्षापासून म्हणजे १९१६ सालापासून पुष्कळ वर्षें रामनवमीच्या उत्सवांत या नारदीय पद्धतीनेच कीर्तन करीत होते.

आतां दासगणूंच्या कीर्तनाचा नमुना कसा असे आणि श्रोत्यांवर काय परिणाम होत असे आणि त्यांना काय अनुभव येत असे याविषयीं एक नमुना किंवा मासला येथें देत आहें.

**चोळकराचा बिनसाखरी चहा आणि बाबांनीं या चहाची केलेली चहा**

कोणत्याहि कीर्तन प्रसंगीं श्रोतृसमाज कसा असतो, आणि त्यांची आवडनिवड कशी असते, हें बहुतेकांना माहीत आहे. कोणाला हरिदासबुवाची व्युत्पत्ति आवडते, तर कोणाला त्याचे हावभाव, कोणाला त्याचें प्रेमानें नाचणें, कोणाला कीर्तनाचा पूर्वरंग (वेदान्त निरूपण) तर कोणाला उत्तररंग (आख्यान किंवा कथा) आणि पुष्कळांना त्याच्या नकला आवडतात. 'ऐसे श्रोते बहुत असती। परी श्रवणें श्रद्धा भक्ति। जोडे ईश्वर वा संतचरणीं प्रीति। ही श्रोतृस्थिति 'दुर्मिळ' (अ. १५.४२). एकदां ठाण्याच्या लोकांनीं कौपिनेश्वर मंदिरांत दासगणूंचें कीर्तन करविलें. नेहमींप्रमाणें तें कीर्तन 'सुश्राव्य' झालें. त्या प्रसंगीं ठाण्याच्या सिव्हिल कोर्टांतील चोळकर नांवाचा एक गरीब उमेदवार उपस्थित होता. त्या कीर्तनांतील साईबाबांचें महिमान ऐकून चोळकर अत्यंत गहिंवरला, ''आधींच चोळकर श्रद्धाळु। आला साईप्रेमाचा उमाळु। मनांत म्हणती बाबा कृपाळु। करा सांभाळ दीनाचा'' ॥ (अ. १५.४६) कोणी देवाला अनेक तऱ्हांचे नवस करितात, आपली कामना पूर्ण झाल्यास, इच्छाभोजन किंवा सहस्र भोजन घालूं, ब्राह्मण संतर्पण करूं, शतगोदान देऊं किंवा अमुक रुपये देऊं असे अनेक नवस लोक करीत असतात; पण चोळकर निर्धन, त्याचा गरिबीचा संसार, परीक्षा पास झाल्यास नोकरी कायम होणार, अशी त्याची स्थिति होती. तेव्हां त्यानें आम्हां गरीब लोकांसारखाच बाबांवर सर्व भार घालून असा नवस केला कीं –

> 'झालों कृपेनें पास जर। होईन आपले पायीं सादर॥
> वांटीन नांवानें खडीसाखर। हाच निर्धार पैं माझा'॥

– श्री साईसच्चरित, अ. १५-५२

पुढें लवकरच देव (बाबा) त्याच्या नवसाला पावला. चोळकर परीक्षा पास झाला आणि त्याला कायमची नोकरी लागली. पण पगार थोडा आणि कुटुंबखर्च फार, अशी स्थिति असल्यामुळें शिरडीस जाऊन नवस फेडण्याइतकी पुंजी त्याचेजवळ जमेना. असें म्हणतात कीं, नाणेघाट (ठाणें जिल्ह्यांतील मुरबाड तालुक्यांतील एक घाट) किंवा सह्याद्रीचा अफाट कडाहि ओलांडिता येईल, पण गरीबाला 'उंबरेघाट' (घराचा उंबरठा) ओलांडितां येत नाहीं. म्हणजे द्रव्याभावीं प्रवास करितां येत नाहीं. चोळकराची स्थिति अशीच झाली. त्याला आपलें घर व गांव सोडून जातां येईना. तेव्हां त्यानें काटकसर करण्याचें ठरविलें, आणि साखरेशिवाय चहा घेण्यास सुरुवात केली. याप्रमाणें कांहीं दिवस गेल्यावर प्रवासखर्चाची रक्कम जमतांच, चोळकर शिरडीस गेला आणि त्यानें आपला नवस फेडला. बाबांचें दर्शन घेऊन त्यांचेपुढें श्रीफळ ठेवून त्यानें लोटांगण घातलें आणि निर्मळ मन करून खडीसाखर वांटली आणि 'म्हणती आजी मनोरथ सकळ। झाले सफळ कीं माझे' (अ. १५-५९). चोळकर जोगांचे पाहुणे होते. जोगही त्यावेळीं हजर होते. ते उठले आणि पाहुणे (चोळकर) जावयास निघाले. तेव्हां बाबा जोगांस म्हणाले – **''पाजी यास चहाचे प्याले। भले भरले साखरेचे''** (अ. १५.६१)

'खुणेचीं अक्षरें पडतां कानीं। चोळकर चमत्कारले मनीं॥ आनंदाश्रु आले नयनीं। माथा चरणीं ठेविला॥ चहा नाहीं बाबांस ठावा॥ येक्षणींच कां आठवावा॥ चोळकरांचा विश्वास पटावा। ठसा उमटावा भक्तीचा॥' (अ. १५.६२.६४) बाबांनीं त्याला या योगें असा इशारा किंवा समज दिली कीं, तुझी वाचादत्त (नवसाची) साखर मला पोचली. तुझा त्यागाचा नियमही पुरा झाला. दीर्घसूत्रतेचें (नवस लवकर न फेडण्याचें) प्रायश्चित्त (साखरेशिवाय चहा) तूं जरी गुप्त ठेविलें होतेंस तरी तें सर्व मला कळलें. तुम्हीं कुठेंही असा, माझ्यापुढें भावानें पसा पसरतांच मी तुमच्या हृदयीं, अंतर्यामीं आहे असे समजा. बाबांचें हें सर्वसाक्षित्व व अंतर्ज्ञान खरोखर अलौकिक होय यांत शंका नाही आणि दासगणूंच्या कीर्तनामुळें हें चोळकरांना पटलें.

**दासगणू महाराजांचें बाबांविषयी अनुभवकथन**

दासगणू महाराजांचे पणजोबा अप्पाजी नारायण सहस्रबुद्धे; त्यांना झालेल्या पांच मुलांपैकी चवथे एकनाथ हे त्यांचे आजोबा. एकनाथांच्या चार मुलांपैकी वडील मुलगा दत्तात्रेय हे त्यांचे

वडील. दासगणूंचा जन्म शके १७८९, पौष शुद्ध एकादशीस अकोळनेरगांवीं झाला. त्यांचें पाळण्यांतील नांव 'नारायण' असें ठेविलें. पण मुलाला मांडीवर घेऊन पहातांना आजोबा एकनाथपंत म्हणाले – नारायण नांव कां ठेविलें? गुलामाचें पाय पहाना? कसें गणपतीसारखें आहे. कानसुद्धां पहा केवढे आहेत. यास आतां गणपतीच म्हणावयाचें. आजोबांची ही सूचना सर्वांना मान्य झाली आणि गणपति–गणेश हेंच नांव प्रचलित झालें. गणेश हें बुद्धिमत्तेचें परम मंगल दैवत आणि त्याप्रमाणें दासगणूंचें नांवहि अन्वर्थक झालें, हें त्यांच्या पुढील चरित्रावरून स्पष्ट झालें.

सात वर्षें झाली तरी त्यांचें शिक्षण सुरू झालें नाहीं. नवव्या वर्षी नगर येथें त्यांची मुंज झाली. त्यानंतर त्यांचें शिक्षण कसेंबसें थोडेसें झालें. त्यांचे चुलते जनार्दनपंत यांनीं त्यांच्या इंग्रजी शिक्षणाविषयीं फार खटपट केली. तेराव्या वर्षी ते इंग्रजी तिसरींत होते आणि चवदाव्या वर्षी इंग्रजी चवथींत गेले आणि त्यानंतर त्यांचें शिक्षण बंद पडलें. शके १८१३ मध्यें जामखेड तालुक्यांतील बोरले अष्टयाचे जहागीरदार नारायणराव रानडे यांच्या कन्येशी दासगणूंचा विवाह पुणें येथें झाला. त्यानंतर ते नगरास आल्यावर भटकण्याचा, नोकरी किंवा उद्योगधंदा कांहीं न करितां चकाट्या पिटीत उगाच भटकण्याचा त्यांचा क्रम सुरू झाला. हें त्यांच्या चुलतीना न आवडून ती त्यांना मर्मभेदक असें टोंचून बोलली. ते त्यांना न आवडल्यामुळें त्यांनीं घराचा त्याग केला आणि ते नगरच्या रस्त्यावरून हिंडत असतांना पोलिस सुपरिंटेंडेंट एम्. केनडी यांची गांठ पडली आणि त्यांनी दासगणूंना पोलिसखात्यांत नोकरी दिली आणि दरमहा नऊ रुपयांवर शिपाई नेमिलें.

या खात्यांत काम करीत असतां त्यांच्या कवित्वशक्तीचा विकास झाला; आणि ते तमाशाकरितां पोवाडे, लावण्या वगैरे रचूं लागले आणि ते पुष्कळांना आवडले. या खात्यात काम करीत असतांनाच त्यांना सद्गुरुपदेश झाला. इस्लामपूरचे राहाणारे श्री. वामनशास्त्री इस्लामपूरकर नांवाचे एक विद्वान् गृहस्थ, रामदासी सांप्रदायी असूनहि पंढरीचे वारकरी असे होते. त्यांना कांहीं सरकारी कामांत दासगणूंनी श्रीगोंद्यास जाऊन मदत करावी म्हणून वरिष्ठांकडून लिहून आल्यामुळें दासगणू त्यांच्या तैनातीस राहिले. त्यांची वागणूक, सुस्वभाव वगैरे पाहून दासगणूंना फार आनंद झाला आणि त्यांनी त्यांचेपासून रीतसर मंत्रोपदेश घेतला. दासगणू हे कट्टर शिवभक्त असल्यामुळें त्यांनी बेलाच्या पानावरच शिवमंत्राचा उपदेश घेतला. गुरुच्या आज्ञेमुळें पंढरीची वारी पत्करली. पुढें कांहीं वर्षांनंतर काशीस देह ठेवण्यासाठी ते निघाले तेव्हां त्यांनी दासगणूंना बोलावून घेतलें आणि भुसावळवरून प्रवास करितांना आपलें आध्यात्मिक सर्वस्व दासगणूंना दिलें आणि परत जातांना त्यांना सांगितलें की, हा मृत्युलोकच आहे, वेड्यांसारखें दुःख करूं नकोस, साईबाबा योग्य विभूति आहेत, आम्हीं दोघे एकरूपच आहोंत. तेच तुला वेळोवेळीं मार्ग दाखवितील. पुढें नानासाहेबांच्या आग्रहामुळें दासगणू साईबाबांच्या भेटीस गेले.

श्री. वामनशास्त्री यांना संतति नव्हती आणि दुसरा शिष्यहि नव्हता. तेव्हां त्यांनी आपली सर्व मिळकत एका मृत्युपत्रानें दासगणूंना दिली. पण हें गुरुपत्नीला आवडलें नाहीं. कांहीं मित्रांनी सल्ला दिला तरी दासगणूंनीं तें मृत्युपत्र जसेच्या तसें गुरुपत्नीच्या स्वाधीन केलें. खरे वैराग्य तें हेंच आणि ही विरक्तवृत्ति दासगणूंच्या अंगीं बाणत होती.

### पोलिसखात्यांत नोकरी

शके १८१४ ते १८२५ या अकरा वर्षांच्या कालाकडे पाहतां दासगणूंनीं श्रीगोंद्यास नोकरीचा आरंभ केला. मध्यांतील काळ जामखेडास घालविला आणि शेवटीं दोन-तीन वर्षे नेवाशास काढली असें दिसते. ही नोकरी करीत असतां कान्ह्या भिल्ल प्रकरण कसें उद्भवलें आणि त्यांना नोकरीचा कसा त्याग करावा लागला इत्यादि हकीगत पुढें येणार आहे.

### दासगणू महाराजांचें अनुभव कथन

जून १९३६, पुणें. दासगणू महाराज ऊर्फ गणपतराव दत्तात्रेय सहस्रबुद्धे, ब्राह्मण, कीर्तनकार, वय अजमासें ६८, राहणार नांदेड, निजाम स्टेट याचें कथन असें कीं :

मी श्री साईबाबांना बऱ्याच वर्षांपासून ओळखतों. त्यांची कांहीं हकीकत मी माझ्या ग्रंथांत (१) भक्तिसारामृत, अध्याय २६, ६५, ६६, ६७ (१९२५) (२) भक्तिलीलामृत, अध्याय ३१ (१९०६) आणि अध्याय ३२ व ३३ आणि संतकथामृत, अ. ५७ यांत दिली आहे. यापैकीं दुसऱ्या ग्रंथाचा अध्याय ३१, आणि तिसऱ्या ग्रंथाचा अध्याय ५७ हे बाबांच्या हयातींतच प्रसिद्ध झाले होते.

बाबांच्या चरित्रांतील त्यांच्या कांहीं आठवणी व गोष्टी त्यांच्या मुखांतूनच आल्या आहेत, पण त्या फार थोड्या, शिवाय माझा बाबांबरोबर फार काळ गेला नाहीं, माझी त्यांची क्वचितच भेट होई, मी शिरडीस असतांना बाबा मला फार वेळ मशिदींत रहाणेस देत नसत, ते मला विठ्ठल मंदिरांत जाणेस सांगत. तेथें राहून मी संतचरित्रें आणि वर नमूद केलेले ग्रंथ लिहीत असें आणि विष्णुसहस्रनामाचें पारायण करीत असे. वर नमूद केलेले ग्रंथ लिहण्याचे पूर्वी बाबांविषयीं मी कांहीं चौकशी केली होती आणि कांहीं गोष्टी मला स्वतःला माहीत होत्या. मी पोलीसखात्यांत हवालदाराच्या जागेवर होतों. तरी वाङ्मयाकडे आणि नाटकाकडे माझा विशेष कल होता. मला तमाशाचा फार नाद असून मी त्यात भाग घेत असें. लावण्या व इतर छंदात तात्काळ स्फूर्तीनें कविता करीत असें. मी नोकरींत असतांना आणि नानासाहेब चांदोरकर हे कलेक्टरचे चिटणीस व डेप्युटी कलेक्टर असतांना त्यांनीं मला साईबाबांकडे नेलें. अगदीं

प्रथमपासूनच बाबांनीं माझे भविष्य जाणलें, आणि माझे रक्षण करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. माझ्या समक्ष त्यांनीं नानासाहेबांना सांगितले कीं – **'या मनुष्यास तमाशाचा छंद आणि आपल्या नोकरीचा नाद आहे. त्यानें हें सर्व सोडून द्यावें.'** नानासाहेबांना व मलाहि तेंच सांगितले.

पण मला माझे छंद (तमाशा वगैरे) व नोकरीहि आवडत असे. हळूहळू मी तमाशांत भाग घेण्याचें बंद केलें. पण नोकरी मला सोडतां येईना. प्रत्येक वेळीं नोकरी सोडून देण्याचा उपदेश करण्यांत येई. तेव्हां 'मी पाहतों, विचार करतों' असें मी उत्तर देई. तेव्हां बाबांनीं सांगितलें कीं, नोकरी सोडण्यास भाग पाडल्याशिवाय म्हणजे याचेवर कठीण प्रसंग ओढवल्याशिवाय हा कांही नोकरी सोडणार नाहीं. याप्रमाणे सतत दहा वर्षे मी नोकरी सोडून द्यावी म्हणून बाबांनीं एकसारखा माझ्यामागें प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष लकडा लाविला. पुढें माझेवर एकामागून एक असे कठीण प्रसंग कसे कसे येत गेले आणि त्या सर्वांतून शिक्षा, अपमान, हाल इत्यादिकांपासून बाबांच्या कृपेनें माझी सुटका कशी झाली आणि शेवटीं १९०३ सालीं मला नोकरी कशी सोडावी लागली हे मी पुढें सांगणार आहें.

४० वर्षांपूर्वी अजमासे ६५ अथवा ७० वर्षे वयाची एक वृद्ध बाई साळुबाई शेलके मला भेटली होती. तिनें मला सांगितलें कीं, ८ किंवा ९ व्या वर्षी जेव्हां माझें लग्न झालें तेव्हां बाबा शिरडींस आलें आणि त्यावेळी ते, आतां (१८९५) जसें ४०/५० वर्षाचे दिसले तसें दिसत होते. दुसरी एक वृद्ध बाई सईबाई म्हणाली कीं, जेव्हां बाबा शिरडीस आले तेव्हां ते लहान मुलाप्रमाणें दिसत होतें. यावरून बाबांचें वय त्यांचे समाधीच्या वेळीं शंभरावर असावें असें वाटतें. आपलें वय किती हें, आणि पूर्वाश्रमाची विशेष माहिती बाबांना विचारणेस कोणाचीहि छाती होत नसे. तेव्हां याविषयीं नक्की असें कांहीं सांगतां येत नाहीं.

पण बाबा केव्हां केव्हां स्वतःच आपली पूर्वीची हकीकत सांगत असत. आपल्या गुरुविषयी त्यांनीं पुष्कळदां सांगितलें कीं, (संतकथामृत ५७-२४) व्यंकुशहा हे आपले गुरु होते आणि त्यांच्याच कृपेनें हें हल्लीचें पद (स्थिति) प्राप्त झालें आहे.

त्यांचेविषयीं पुष्कळ गोष्टी अतर्क्य व गूढ असत. त्यांचे कांही चमत्कार मी स्वतः पाहिले आहेत व कांही दुसऱ्याकडून ऐकिलेले आहेत. (१) बाबांनीं मशिदींतील पणत्या तेलाऐवजी पाणी घालून (किंवा पाण्याचें तेल करून) सबंध रात्रभर पेटत ठेविल्या ही गोष्ट प्रत्यक्ष पाहिलेल्या खेडुतांनीं मला सांगितली आहे. त्या दिवशीं बाबांना तेल देण्यास ज्यांनी नकार दिला त्यापैकीं प्रेमचंद मारवाडी हे एक होते. (२) मशिदींत छपरास फाटक्या चिंध्यांनी बांधून टांगलेली 'बाबांची विचित्र शय्या' म्हणजे एक वीत रुंद आणि चार हात लांब अशी लांकडाची फळी मी स्वतः पाहिलेली आहे. जमिनीपासून सात आठ हात उंच वर, व आढ्यापासून हात दीड हात खालीं टांगलेल्या फळीवर बाबा कसे चढत व उतरत असत हें एक मोठें आश्चर्यच होय. त्या फळीवर चोहोंबाजूस चार पणत्या पेटलेल्या असत. बाबा तेथें कसे चढतात व तेथून ते कसे उतरतात आणि ती फळी त्यांचा भार कसा सहन करिते हें पाहणेचा पुष्कळांनीं प्रयत्न केला. पण यांत कोणालाहि यश आलें नाहीं. (३) भक्तलीलामृत, अध्याय ३१, ओव्या १२२ ते १४३ यांत सांगितलेली नारायण कृष्ण पेणशे यांची हकीकत – म्हणजे पेणशांची कांता परम भाविक व उदार मनाची अशी होती. तिला बाबांचें दर्शन सहज झालें, पण शिरडींत एक वेडापिसा मुसलमान ढोंग माजवून जग लुटाया बैसला आहे असे म्हणणाऱ्या पेणशांना बाबांनीं सहज दर्शन दिलें नाहीं, उलट हातीं धोंडा घेऊन मारण्यास तयार झाले. तेव्हां आपाचा वशिला लावून त्यांनीं बाबांचें दर्शन घेतलें इत्यादि – मी सदर पेणशाकडूनच ऐकिलेली आहे.

बाबांसमोर भक्तलीलामृत (अध्याय ३१, ३२, ३३) हा ग्रंथ पोथीसारखा वाचून दाखविण्यात आला. तेव्हा नानासाहेब चांदोरकरांनीं सदरहु ग्रंथ बाबांच्या हातीं दिल्याबरोबर बाबा उद्गारले कीं, हा ग्रंथ ठीक आहे.

मुसलमानाप्रमाणें दिवसा पांच तर सोडून द्या, बाबा एकदांसुद्धां नमाज पडत नसत. फतिआ म्हणावयाचा असला म्हणजे तो कोणाकडून तरी म्हणवून घेत व केव्हां केव्हां ते स्वतःहि म्हणत असत, तसेंच कुराणांतील कांहीं भागहि म्हणत असत.

बाबांनीं नानासाहेब चांदोरकरांना जो कांहीं उपदेश सांगितला, तो त्यांनीं मला सांगितला. त्याला मी नीटनेटकें रूप देऊन (भक्तलीलामृत, अध्याय ३३) प्रसिद्ध केला. त्यांतील मुख्य भाग नानासाहेबांनीं मला दिला (सांगितला) आहे. बाबांनीं माझे समक्ष अद्वैताचें निरूपण केलें आहे. 'अहं ब्रह्मास्मि, तत्त्वमसि; सर्वं खल्विदं ब्रह्म' हीं महावाक्यें बाबांनीं पुष्कळदां उच्चारलेलीं आहेत. बाबांना अवगत नाहीं असें कांहींच नाहीं.

कोपरगांवास वालेंबी मास्तर नांवाचा एक स्टेशन मास्तर होता. त्याची बाबांवर श्रद्धा नव्हती. त्यांनीं मला व इतर भक्तांना सांगितलें कीं, बाबा हा वेडापीर आहे, त्याचें तुम्हीं इतकें स्तोम कां माजवितां? तथापि माझ्याबरोबर शिरडीस बाबांचें दर्शनास येण्यास मी त्यांचें मन वळविलें. आम्हीं जेव्हां बाबांच्या दर्शनास गेलों, तेव्हां ते बासनें-पात्रें धुवून तीं जमिनीवर 'मुख खालीं व तळ वर' अशीं ठेवीत होते. हें असें कां असें वालेंबी मास्तरानें विचारलें. बाबा म्हणाले कीं, प्रत्येक पात्र जें माझेकडे येतें तें 'अधोमुख' म्हणजे अग्रहण स्थितींत येतें.

**कान्ह्या भिल्ल**

इ.स. १८९८-९९ चे सुमारास कान्ह्या भिल्ल नांवाचा एक डाकू (दरवडेखोर) नगर व बीड जिल्ह्यांत म्हणजे ब्रिटिश मुलुखांत आणि संस्थानांत चोऱ्या, खून करून धुमाकूळ घालीत होता. एकसारखे तीन वर्षे पोलीस त्याच्या पाठीवर (शोध करीत) होते. पण तो कांहीं सांपडेना. त्यावेळीं मी एक साधा हवालदार होतों. त्याची हालचाल पाहून रिपोर्ट करण्यासाठीं माझी व दुसऱ्या तिघा इसमांची स्पेशल गुप्त हेर म्हणून नेमणूक झालेली होती. कान्ह्या भिल्ल फार धूर्त व लबाड होता आणि त्याचे गुप्त हेरखातें इतकें कांहीं हुशार व तरबेज होते कीं, त्यांनीं त्या तिघां इसमांना गांठून एका मागून एक असे ठार केले. माझे हातून फारसें काम झालें नव्हतें म्हणून मी कुचकामाचा व निरुपयोगी आहे असा आमच्या इन्स्पेक्टरसाहेबांनीं रिपोर्ट केला. त्यावेळीं माझा रामदासी बाणा असे आणि लोणीवर्णी येथील राममंदिरांत राहून कीर्तन करीत असें. तेथील गंगाराम पाटील हा त्या भिल्लाचा मित्र असून त्याला भेटावयास पुष्कळदां येत असे. त्या भिल्लांनीं माझ्या विषयीं सर्व माहिती (माझें नांव, बकल नं. ७२७, स्टेशन वगैरे) मिळविली आणि एके दिवशीं तो मला गोळी घालून ठार मारण्यास आला. मी राममंदिरांत गेलों आणि 'हे प्रभो, मला वांचीव' अशी श्री रामाची प्रार्थना केली. माझ्यावर आपली नजर आहे अशी मला ताकीद देऊन तो भिल्ल निघून गेला. त्याच्या साथीदारांनीं माझ्यावर पाळत ठेविल्यामुळें मला तो गांव सोडतां येईना. त्या खेड्यांतील मुलांकडून त्या भिल्लाचा कार्यक्रम व हालचाल याविषयीं मी माहिती मिळविली व ती पोलिसांना कळविली. तो भिल्ल ज्या टेकडींत लपून बसला होता, त्याभोंवतीं पोलिसांनीं गराडा घातला. पोलीसांचीं व त्याची गोळीबारांनी लढाई जुंपली, कांहीं पोलीस मारले गेले व तो भिल्ल पसार झाला.

मला हृदयाचा विकार जडला आहे असे सर्टिफिकेट मिळाल्यामुळें गुप्तहेरांच्या कामांतून माझी सुटका झाली. त्यानंतर लोणीवर्णींच्या खेडुतांनीं त्या दरवडेखोराला आश्रय दिला म्हणून राळे मामलेदारासमोर खटला सुरू झाला. त्या गांवच्या पाटलानें मला वेळोवेळीं माहिती देऊन मला मदत केली अशी मी पाटलातर्फे साक्ष दिल्यामुळें तो दोषमुक्त होऊन सुटला.

मी माझी हद्द सोडून रजा न घेतां एका क्षेत्राला गेलों आणि गोदावरी तीराला जाऊन गोदेचें पाणी हातीं घेऊन बाबांची प्रार्थना करून असा नवस (प्रतिज्ञा) केला कीं, जर बाबांनीं माझा बचाव केला, तर मी नोकरी सोडून देईन. नंतर त्या क्षेत्रीं कांहीं लुटालुटीच्या मालासहित एक टोळी मला आढळली. ती टोळी व माल पकडून गांवच्या अमिनाबरोबर वार्डन साहेबाकडे त्याच्या ठाण्यावर (मुक्कामावर) पाठविण्यांत आला. दैवीचमत्कारामुळें माझी सुटका झाली आणि साहेबांचें चांगलें सर्टिफिकेटहि मिळालें. फौजदार व्हावें अशी माझी तीव्र महत्त्वाकांक्षा होतीच. याकरितां मी परीक्षेस बसून तींत पासहि झालों. पण बाबांनीं मला सांगितलें कीं, मला फौजदारी मिळणार नाहीं.

माझी एका गांवी बदली झाली आणि तेथें जातांना शिरडीवरून जावें लागलें. मी नोकरी चालू ठेविल्यामुळें, तें बाबांना आवडणार नाहीं असें वाटून मी त्यांचे दर्शन घेण्याचें टाळून शिरडी गांवाबाहेरच्या मोठ्या रस्त्यानें चाललों. पण योगायोग असा कीं, मी लेंडीपाशीं मोठ्या रस्त्यावर येतांच, बाबा माझे समोर दत्त म्हणून उभे राहिले. तेव्हां मी घोड्यावरून उतरून त्यांचे चरणावर मस्तक ठेविलें. मशिदीकडे येण्यास त्यांनीं मला सांगितलें. तेथें गेल्यावर बाबांनीं मला विचारलें– गणू गोदेचें पाणी हातांत घेऊन कोणी नवस केला? मी उत्तर दिलें, त्यांत काय बिघडलें. मी खरोखरीच नोकरीचा राजीनामा देणार आहें. त्यावर बाबा म्हणाले– जरा थांब, सर्वकांहीं सुरळितपणें चालल्यामुळें तूं कांहीं आमचें ऐकणार नाहींस.

यानंतर माझा कांहीं अपराध नसतां मी दुसऱ्या एका संकटांत सांपडलों. एका शिक्षा झालेल्या आरोपीच्या दंडाची ३२ रु. रक्कम वसूल होऊन सरकारांत जमा करण्यासाठी माझे गांवीं पाठविण्यांत आली. ती माझ्या पश्चात् माझ्या असिस्टंटनें घेऊन दाबून टाकिली. पुढें त्या आरोपीची सुटका न झाल्यामुळें त्या दंडाच्या रकमेविषयीं तक्रार होऊन चौकशी सुरू झाली आणि मला सस्पेंड करण्यांत आलें. हें प्रकरण माझेवर शेकणार आणि मला शिक्षा होणार असें दिसूं लागलें. यांतून माझी सुटका झाली तर मी नोकरी सोडीन असा मी पुन्हा नवस केला आणि शेवटीं माझी सुटका झाल्यामुळें मी १९०३ सालीं नोकरीचा राजीनामा देऊन मोकळा झालों.

(क्रमशः)

''व्यर्थ कशाची करितेस खंती। या कुत्र्याची जे उदरपूर्ती। माझीच तृप्ति ती जाण॥१०३॥ या श्वानाचा जीव नाहीं का। प्राणिमात्राच्या एकच भुका। जरी तो मुका आणि मी बोलका। भेद असे का भुकेंत॥१०४॥ क्षुधेनें व्याकूळ जयाचे प्राण। तयांस देती जे अन्नावदान। माझिया मुखींच तें सूदिलें जाण। सर्वत्र प्रमाण मानीं हें''॥१०५॥ प्रसंग सोपा व्यवहाराचा। बोध अवघा परमार्थाचा। ऐसी उपदेशपर साईंची वाचा। प्रेमरसाचा परिपाक॥१०६॥ बोलूनि सोपी प्रपंचभाषा। आंखीत परमार्थरूपरेषा। न काढिलां कोणाच्या वर्मा दोषा। शिष्यसंतोषा राखीत॥१०७॥

–अध्याय ४२, श्री साईसत्‌चरित

## साईभक्तांचे अनुभव....१०

### रा. ब. मोरेश्वर विश्वनाथ प्रधान सांताक्रूझ

मूळ लेखक – कै. बी. व्ही. नरसिंहस्वामी, मद्रास.
मराठी भाषांतर – श्री. शं. बा. पटवर्धन, मुंबई.

माझे सर्व नातेवाईक व मी नानासाहेब चांदोरकरांच्यामुळे बाबांच्या दर्शनाला गेलो. १९१० चा मे महिना होता. माझे बंधु व त्यांची मित्र-मंडळी नानासाहेबांबरोबर गप्पा मारीत होते. तेव्हा माझे बंधु रामराव यांनी त्यांना विचारले, "सध्या अक्कलकोटच्या स्वामी समर्थांसारखे सत्पुरुष कोणी आहेत का?"

**नानासाहेब :** अशा सत्पुरुषाला तुम्हाला भेटायचे आहे का?

**रामराव :** होय.

**नानासाहेब :** मग तुम्ही शिरडीला जा. शिरडीचे साईबाबा समर्थांसारखेच आहेत.

**रामराव :** शिरडी हे नाव आम्ही प्रथमच ऐकले. हे गाव कुठे आहे व तेथे कसे जायचे?

**नानासाहेब :** ते गाव अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगाव तालुक्यात आहे. प्रथम मनमाड-दौंड या फाट्यावर असलेल्या कोपरगाव स्टेशनवर उतरायचे. तेथून टांग्याने जायचे. स्टेशनपासून शिरडी ११ मैल आहे.

मग नानासाहेबांनी बाबांचे सामर्थ्य, व्यक्तिमत्व आणि दयाळूपणा इत्यादी गुणांचे असे काही रसभरित वर्णन केले की श्रोत्यांच्या मनात ताबडतोब नसले तरी शक्यतो लवकर बाबांच्या दर्शनाची इच्छा उत्पन्न होऊन दुसऱ्या दिवशी दहा-पंधरा मंडळी शिरडीला जायला निघाली. मलाही बरोबर नेण्याची त्यांची इच्छा होती, पण मी घरात नव्हतो म्हणून त्यांनी पत्नीजवळ निरोप ठेवला. त्या दिवशी मी आईकडे गेलो असताना तिने मला ते सर्व लोक बाबांच्या दर्शनासाठी शिरडीला गेल्याचे सांगितले. पण मी अज्ञानासारखा तिला म्हणालो, "ते खरोखरच सत्पुरुष आहेत, याची खात्री कोण देणार?" ती सर्व मंडळी शिरडीहून परतल्यावर मी माझ्या बंधुकडून दोन वस्तु मागून घेतल्या. एक बाबांचा फोटो व दुसरा दासगणूकृत भक्तलीलामृतातील ३१ वा अध्याय, ज्यात बाबांच्या चमत्कारांचे वर्णन आहे असा. दोन्ही वस्तु त्याच दिवशी परत करीन, असे आश्वासन दिले. फोटो पाहून व अध्याय वाचून मनावर एक विलक्षण परिणाम झाला व मी साईबद्दल व्यक्त केलेले संशय पार वितळून गेले. तेव्हाच मी मनाशी अशी खूणगाठ बांधली की बाबा अत्युच्च कोटीचे सत्पुरुष आहेत. माझ्या पत्नीची तर माझ्यापेक्षाही दृढ श्रद्धा बसली. त्या दिवशी गुरुवार असल्याने तिने त्या दोन्ही वस्तु परत करण्याचे साफ नाकारले. नंतर माझ्या भावाने मागितल्याने चौथ्या दिवशी त्या वस्तु मी परत केल्या.

या प्रकाराने आमच्या मनात मात्र बाबांच्या दर्शनाबद्दल तीव्र इच्छा निर्माण झाली. पण एक मोठी अडचणही समोर उभी राहिली. नुकतीच विधवा झालेली माझी मेहुणी गरोदर होती व तिचा प्रसुतीकाळ जवळ आला होता. आम्हा सर्वांची इच्छा होती की तिला मुलगा व्हावा आणि घरात मी एकटा पुरुष असल्याने मी तेव्हा गाव सोडणे इष्ट नव्हते. परंतु माझी पत्नी व बहीण ह्या दोघांच्या मनात मी शक्यतो लवकर दर्शनाला जावे असे होते. म्हणून पहिली मंडळी शिरडीहून परत आल्यावर सुमारे पंधरवड्याने, म्हणजे मेच्या अखेरीस मी निघालो. नानासाहेब चांदोरकरांनी आपल्या उदार मनाला अनुसरून त्यांचे चिरंजीव बाबू व बापू ह्या दोघांनाही माझ्यासोबत पाठविले. निघताना मी बरोबर थोड्या गिन्या घेतल्या होत्या आणि बाबांनी दक्षिणा मागितल्यास असावे म्हणून नोट मोडून चांदीचे रुपये घेतले. याप्रमाणे माझ्याजवळ २० रुपये रोख व बाकी नोटा होत्या. कोपरगावला तेथील मामलेदारांनी आमचा चांगला पाहुणचार केला व मग गोदावरीत आम्ही मंगलस्नान करून शिरडीला पोहचलो. तेव्हा लेंडीजवळ बाबा जणूकाय आमच्यासाठीच थांबले होते. आम्ही टांग्यातून उतरून ताबडतोब दर्शन घेतले व मग साठेवाड्यात मुक्कामाला गेलो. त्यावेळी तेथे रा. ब. साठे व तात्यासाहेब नूलकर यांचाही मुक्काम होता. थोड्या वेळाने मी बरोबर आणलेले हार, फुले, फळफळावळ घेऊन मशिदीत गेलो व बाबांचे चरण वंदून सर्व त्यांना अर्पण केले. जेव्हा आमची नजरानजर झाली तेव्हा मनात असा विचार आला, "परमेश्वरा, तुझा मी शतशः आभारी आहे, कारण तू येथे येण्याची सुबुद्धी दिलीस." पण बाबांनी लगेच मला कसास लावले. बाबांनी माझ्याकडे दक्षिणा मागितली. मी त्यांना रुपयाऐवजी सोन्याची गिनी दिली. बाबांनी ते नाणे हातात घेऊन उलट-सुलट करून न्याहाळले व मग नूलकरांना विचारले, "हे काय आहे?" नूलकर म्हणाले, "बाबा, ही गिनी आहे. याची किंमत पंधरा रुपये आहे." मग बाबांनी ते नाणे मला परत दिले व ते म्हणाले, "मला पंधरा रुपये दे." ते नाणे मी खिशात ठेवले. पण नूलकरांच्या मते मी ते नाणे इतरांत न मिसळता प्रसाद म्हणून निराळे ठेवावे असे होते. त्याप्रमाणे मी केले व बाबांना पंधरा रुपये दिले. बाबांनी ते हातात घेऊन मोजल्यासारखे केले व म्हणाले, "हे दहा रुपयेच आहेत. मला आणखी पाच रुपये दे." ही माझी कसोटीच होती. माझ्यासारख्या कायदेपंडिताला हा वस्तुस्थितीचा विपर्यास झालेला पाहून राग आला असता तर नवल नव्हते. पण मीही त्या कसोटीस उतरलो व उरलेले पाच रुपये दिले. मी त्यांच्याकरिता २० रु.

काढून ठेवलेले बाबांना माहीत होते म्हणून या मिषाने त्यांनी ते माझ्याकडून घेतले. बाबांनी जास्त मागितले नाही. मग मी घरी परत आलो. दुसऱ्या वेळी दर्शनाला गेलो तेव्हा ते सभोवती जमलेल्या भक्त-मंडळींना उदी देत होते. थोड्या अंतरावर मी उभा असलेला त्यांनी पाहिले व जवळ येण्यास खूण केली आणि म्हणाले, "भाऊ, (यानंतर नेहमी ते मला याच नावाने हाक मारीत असत.) दोन-चार दिवसांत ठीक होईल." असे म्हणून त्यांनी उदी दिली व मी तेथून निघालो. माझ्या पहिल्या भेटीतच बाबांनी माझ्याबद्दल इतके प्रेम व करुणा दाखविली याचे नूलकर, जोग वगैरे मंडळींना कुतूहल वाटले. नूलकरांनी आलिंगन दिले व जोगांनी मला विचारले, "तुमचे कोणत्या ग्रंथाचे पठण चालले आहे?" कारण सर्वांना माहीत होते की बाबा श्रीमंती, हुद्दा किंवा उच्च घराणे यापैकी कशालाच महत्त्व देत नसत. मी जोगांना सांगितले की कोणत्याच ग्रंथाचे पठण मी करीत नाही. शिरडीहून दुसऱ्या दिवशी निघता येईल असे मला वाटले होते. पण जेव्हा निरोप घ्यावयास गेलो तेव्हा बाबा त्यांच्या नेहमीच्या पद्धतीने म्हणाले, "उद्या जा." असे सांगून त्यांनी मला आठ दिवस ठेवून घेतले. त्या मुक्कामात बाबांच्याकरिता भोजन-समारंभ आयोजित करून बाबांना पक्वान्न काय करू व कोणाला बोलावू, असे विचारले. ते म्हणाले, "तू बाबूला बोलाव. मीही येईन." बाबू हा दादा केळकरांचा पुतण्या होता व बाबांचा लाडका होता. दुसऱ्या दिवशी भोजनाची तयारी झाली आणि पाने मांडली. एका पानावर बाबू येऊन बसला व दुसरे पान बाबांसाठी वाढून तयार केले. इतक्यात एक कावळा येऊन त्या पानातील पुरणपोळी चोचीत घेऊन उडून गेला. बाबांची प्रसाद ग्रहण करण्याची अद्भुत पद्धत पाहून सर्वांना आनंद झाला. त्या दिवशी दुपारी बाबा आपल्या अंगाच्या एका बाजूला हात लावून म्हणाले, "या बाजूने असह्य वेदना होत आहेत. पण २/४ दिवसांत बरे होईल." त्यावेळी बाबांची प्रकृती बरी दिसत असल्याने त्या शब्दांचे महत्त्व आम्हाला कळले नाही. त्याचवेळी एका गुरुवारी बाबा मशिदीत हंडी शिजवित होते. त्यांनी सर्वांना तेथून निघून जायला सांगितले होते व ते एकटेच हंडीजवळ होते. त्याचवेळी मी बाबू व बापू चांदोरकरांसह मशिदीत गेलो. सर्वांना आश्चर्याचा धक्काच बसला. बाबा आमच्यावर रागावले तर नाहीतच, पण या खासगी भेटीसाठीच त्यांनी इतरांना बाहेर घालविले, असे मला वाटले. थोड्या वेळाने ते एखादे गाणे गुणगुणत आहेत, असे मला वाटले, पण तिसऱ्या खेपेला ऐकले ते शब्द असे... "काय रे! आपले काय! आपण म्हणावे श्रीराम जयराम जयजयराम." हे शब्द ऐकताच अष्टसात्त्विक भाव अंतरी दाटून आला व मी बाबांच्या चरणी मस्तक ठेवून अश्रूंना वाट करून दिली. आमच्या घराण्याचे गुरु हरीबुवा (ठाकुरद्वारला राममंदिर ज्यांनी बांधले त्या आत्मारामबुवांचे नातू) यांच्याकडून याच नामाचा गुरुमंत्र मला मिळाला होता आणि बाबांनी अशारीतीने गुरुमंत्रावर माझी निष्ठा बळकट करून दिली.

(क्रमशः)

---

# श्री साईबाबा संस्थान शिरडी

## फोटोंची यादी

| अनु. क्र. | फोटोचे नांव | साईज | किंमत |
|---|---|---|---|
| १. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | १४'' X २०'' | २.२५ |
| २. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | ४'' X ५'' | ०.२५ |
| ३. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | २'' X ३'' | ०.१० |
| ४. | द्वारकामाई (४ रंगात) | १४'' X २०'' | २.२५ |
| ५. | द्वारकामाई (४ रंगात) | १०'' X १४'' | १.२० |
| ६. | द्वारकामाई (४ रंगात) | ७'' X १०'' | ०.६० |
| ७. | मूर्ती (४ रंगात) | १४'' X २०'' | २.२० |
| ८. | मूर्ती (४ रंगात) | १०'' X १४'' | १.१० |
| ९. | मूर्ती (४ रंगात) | ७'' X १०'' | ०.६० |
| १०. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | १४'' X २०'' | २.४० |
| ११. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | १०'' X १४'' | १.३० |
| १२. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | ७'' X १०'' | ०.६० |
| १३. | चेहरा फोटो (४ रंगात) | पोष्टकार्ड | ०.२५ |
| १४. | पालखी (४ रंगात) | ७'' X १०'' | ०.६५ |
| १५. | दगडावर बसलेले बाबा (काळा/पांढरा) | १४'' X २०'' | २.१० |
| १६. | ३-डी (शिरडी-दर्शन) | — | ४०.०० |

सर्व फोटोंकरिता पॅकिंग व पोस्टेजचा दर रु. ७.०० आहे.

**पुस्तके आणि छायाचित्रे मिळण्याचे ठिकाण :–**

१. कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान, शिरडी पो. शिरडी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३ १०९.

२. साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई-४०० ०१४.

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्र. | पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकींग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्चरित | मराठी | ३३.१५ | १२.०० |
| २. | श्री साई सत्चरित | इंग्रजी | — | — |
| ३. | श्री साई सत्चरित | हिंदी | १८.०० | १०.०० |
| ४. | श्री साई सत्चरित | गुजराथी | २४.०० | ११.०० |
| ५. | श्री साई सत्चरित | कन्नड | १७.७५ | १०.०० |
| ६. | श्री साई सत्चरित | तेलुगु | २०.७० | १०.०० |
| ७. | श्री साई सत्चरित | तामीळ | २६.५० | १०.०० |
| ८. | श्री साई सत्चरित | सिंधी | २२.०० | १०.०० |
| ९. | श्री साई सत्चरित पोथी | गुजराथी | ३१.०० | १२.०० |
| १०. | श्री साईलीलामृत | मराठी | ८.२५ | १०.०० |
| ११. | श्री साईलीलामृत | हिंदी | १२.५० | १०.०० |
| १२. | श्री साईलीलामृत | गुजराथी | ११.५० | १०.०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | ६.८० | ८.०० |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | १.०० | ७.०० |
| १५. | स्तवन मंजिरी | हिंदी | १.१५ | ७.०० |
| १६. | स्तवन मंजिरी | गुजराथी | १.३० | ७.०० |
| १७. | स्तवनमंजरी | इंग्रजी | — | — |
| १८. | सगुणोपासना (आरती) | मराठी | १.०० | ७.०० |
| १९. | सगुणोपासना (आरती) | हिंदी | १.५० | ७.०० |
| २०. | सगुणोपासना (आरती) | गुजराथी | ०.९५ | ७.०० |
| २१. | सगुणोपासना (आरती) | तेलुगु | ३.६० | ७.०० |
| २२. | सगुणोपासना (आरती) | सिंधी | १.२५ | ७.०० |
| २३. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | २.५० | ७.०० |
| २४. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | ६.८० | ७.०० |
| २५. | मुलांचे साईबाबा | मराठी | १.६० | ७.०० |
| २६. | मुलांचे साईबाबा | इंग्रजी | २.६० | ७.०० |
| २७. | मुलांचे साईबाबा | हिंदी | १.६० | ७.०० |
| २८. | मुलांचे साईबाबा | गुजराथी | १.७५ | ७.०० |
| २९. | मुलांचे साईबाबा | तेलुगु | २.३० | ७.०० |
| ३०. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | १.१५ | ७.०० |
| ३१. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ६.७० | ७.०० |
| ३२. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | ४.५० | ७.०० |
| ३३. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३.५० | ७.०० |
| ३४. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | १५.२५ | १०.०० |
| ३५. | खापर्डे डायरी | इंग्रजी | ९-५० | १०-०० |

Registered with the Registrar
of News-papers for India
No MH/527



मुद्रक: श्री. एम. डी. राजन, गीता ऑफसेट, बी-२३, रॉयल इंडस्ट्रियल इस्टेट, नायगांव क्रॉस रोड, वडाळा, मुंबई–४०० ०३१.
संपादक व प्रकाशक: कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान, शिरडी, साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई–४०० ०१४.



# वाजे नगारा

मोहनलाल अग्रवाल

## दशनाम–परिचय

**का**ळ आणि जीवन याविषयी थोडा विचार केला तर असे दिसून येते की, कधी जीवनाला अनुकुल काळ असतो तर कधी काळानुसार जीवन असते. काळ हे जीवन आहे की जीवन हे काळ आहे? तसेच दोन्ही एकमेकांवर आधारीत आहे का? दोन्ही एकच आहेत की दोन्ही वेगवेगळे आहेत? यावर कुणी निष्कर्ष काढला नाही.

इ.स. १९६६ ते १९६८ पर्यंत मी माझ्या मात्यापित्यांच्या तसेच आजोबांच्या वात्सल्यापासून वंचित झालो. कुटुंबात ज्येष्ठ असल्याने कुटुंबाची सर्व जबाबदारी माझ्यावर आली. देवाच्या व वडिलधाऱ्यांच्या कृपेने मी व्यवसाय व सर्वच जबाबदारी कुशलतेने सांभाळली. त्याबरोबरच माझ्या आवडीची काळजीही मी घेत होतो.

साधूसंत, अघोर, औघड, नाथ, नागा, अवधूत, दर्शनी, बैरागी, दशनाम, निर्वाण, रामादली, शंभूदली वगैरेंच्या संपर्कात रहाण्यासाठी मी सौराष्ट्र, कच्छ, काठेवाड, मारवाड, राजस्थान, उत्तरप्रदेश, नेपाळ मध्यप्रदेश, महाराष्ट्र वगैरे ठिकाणी परिभ्रमण करीत असे. अबुपर्वत, माझा दृष्टीबिंदू होता. माझे आश्रयस्थान, त्याच्या पाठबळावर मी कुठलेही दु:साहस करीत होतो. अशाच अनिच्छेने आलेल्या दु:साहसांत अबुमंडलाच्या जोगींनी माझे प्राण रक्षण करून मला जीवदान दिले; त्यासाठी त्यांना त्यांच्या पूर्ण शक्तीचा उपयोग करावा लागला.

उन्हाळ्याच्या दिवसांत एकदा अटलगिरीजींनी मला पत्राद्वारे यायचे आमंत्रण पाठवले; त्यांचे एक गुरुबंधु

(पृष्ठ क्र. २८ वर)

# श्री साईलीला

श्री साईबाबा संस्थान
शिरडीचे अधिकृत नियतकालिक

वर्ष ७१ अंक ८-९

नोव्हेंबर – डिसेंबर ९२

संपादक
प्रा. डॉ. लेखा पाठक

कार्यकारी संपादक
अरूण ताम्हणकर

मुखपृष्ठ
हेमंत चोणकर

अक्षर जुळवणी व ऑफसेट छपाई
गीता ऑफसेट, वडाळा, मुंबई.

कार्यालय
'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई–४०० ०१४.
दूरध्वनी : ४१२२५६१

वार्षिक वर्गणी – रु. ५०/-,
आजीव सभासद वर्गणी – रु. १,०००/-,
परदेशाकरिता वार्षिक वर्गणी – रु. १,०००/-
(टपाल खर्चासहित)
किरकोळ अंक – रु. ८/-

मुद्रक, प्रकाशक प्रा. डॉ. लेखा पाठक, अध्यक्षा, श्री साईबाबा संस्थान, शिरडी यांनी हे नियतकालिक, 'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई – ४०० ०१४ येथे छापून तेथेच प्रसिद्ध केले.


या नियतकालिकातील लेखांत प्रसिद्ध झालेली मते ही त्या लेखातील लेखकांची स्वतंत्र मते असून त्या मतांशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. लेखांविषयीची कोणतीही कायदेशीर कारवाई मुंबईच्या न्यायकक्षेतच होऊ शकते, याची कृपया नोंद घ्यावी.

# अकरा हनुमान

(मागील अंकावरून)

श्रद्धा आणि अंधश्रद्धेच्या वादात सामान्य माणूस गोंधळून जातो. त्याला बुद्धीभ्रम झाल्याचा अनुभव येऊ लागतो.

आपली दैवते, त्यांची रूपे, त्यांचे कार्य आणि त्यांच्या जन्मकथा विचारी माणसाला संभ्रमात टाकणाऱ्या आहेत.

वायुसूत हनुमान अथवा मारूती हे असेच एक दैवत आहे की त्याच्याविषयी अधिक विचार करू लागताच अनेक प्रश्न उभे राहतात.

हनुमान हा वानरयोनी आहे. तरीही तो बुद्धीमताम् वरिष्ठम्, मनोजवम्, मारुततुल्य वेगम् आणि जितेन्द्रीयम्ही आहे. ज्या देशात वानर एवढा महान असू शकतो त्या देशात आज माणसंसुद्धा वानरापेक्षा चंचल आणि भोळसट कशी जन्मु शकतात?

असं नसेल तर आपण समजतोय तो 'वानरयुत मुख्यम्' हनुमान वेगळा असला पाहिजे. वाढता वाढता शुन्यमंडळालाही भेदणारा हा हनुमान समजून घेण्यात आपण कुठेतरी चुकलो आहोत. जड पातळीवरील हनुमान व सुक्ष्मातील हनुमान यांच्यातील सांधा शास्त्रार्थींच्या अभावी तुटल्यामुळे दैवते समजुन घेताना वैचारिक प्रदुषण निर्माण झाले आहे. या प्रदुषणातूनच श्रद्धा-अंधश्रद्धा-भक्ति असे भावुक शब्द जन्माला येऊन अवधान सुटले आहे. हे अवधान परत आणायचे असेल तर या वैचारिक प्रदुषणापासून दूर जाऊन समजाऊन घेण्याचा समजुतदारपणा वाढविला पाहीजे.

असाच समजुतदारपणा वाढवित असताना पंडित ग. रा. सावंतांना हनुमान कसा जाणवला ते पहा....

– कार्यकारी संपादक

## तीन मुखी हनुमान

हे हनुमंता! पुरुष आणि प्रकृति यांच्या प्रामुख्याच्या दृष्टीनें प्रकृतिप्रधान ब्रह्मा, पुरुषप्रधान विष्णू आणि पुरुषप्रकृति समदृष्टि माया-महेश, या तीन प्रकारच्या तत्त्वदृष्टि कोणी मानतात. तसेंच राम आणि शिव हे अनुक्रमें वैष्णव आणि शैव तत्त्वज्ञानाचें प्रवर्तक असून रावण हा ब्रह्मदेवाचा अनुयायी मानतात. आणि हे हनुमंता! तुला या तिन्ही पंथांचा प्रतिनिधी समजतात. तेव्हां तुझ्या या ज्या तीन तत्त्वदृष्टि तींच तुझीं तीन मुखें असें मी म्हणतों.

हे रामसख्या! ह्या देहरूपें लंकेंतील किंवा नवद्वारांच्या अयोध्येंतील जीवनरामाच्या रामायणांत, जो क्रियात्मक अंतर्यामी आहे, तो अस्ती-भाती प्रिय, ज्ञान-इच्छा-क्रिया, सत्त्व-रज-तम, गति-आगति-स्थिति, आत्मा-बुद्धि-मन असा त्रिविधतेनें प्रतीत होत आहे, तींच तुझीं तीन मुखें होत.

हे मायावी देवा! क्षणांत मोठा, क्षणांत लहान, क्षणांत अदृश्य असें तुझें मायावीरूप रामायणांत वर्णिलेलें आहे. अरूप, सरूप आणि अरूप-सरूप असें अंतर्यामीचेंहि मायावीरूप दिसतें. हे प्राणेश्वरा! उजवीकडील आध्यामिक हृदय किंवा डावीकडील हृत्पिंडाकाश अमूर्त आहे, डावीकडील शारीरिक हृदयाचा मांसपिंड किंवा त्याच हृदयाचे ठोके मूर्त आहेत व प्राण आणि मनहीं मूर्तामूर्त आहेत. असाच तूं मुखत्रयाचा अंतर्यामी आहेस.

हे अचिंत्य अंतर्देवा! तूं अव्यक्त, व्यक्त आणि व्यक्ताव्यक्त रूप आहेस, असेंच तुझें स्तोत्र सांगतें. तीन बाजू हें मूर्ताचें अतिसंक्षिप्त

(पृष्ठ क्र. १२ वर)

॥ जरी हें शरीर गेलों मी टाकून ॥
तरी मी धावेन भक्तांसाठी ॥

# साईकृपा

॥ नवसास माझी पावेल समाधी ॥
धरा दृढ बुद्धी माझ्या ठायीं ॥

वर्ष ७१ अंक ८-९ • श्री साईंच्या कृपाप्रसादाचे वार्तापत्र • नोव्हेंबर-डिसेंबर, १९९२

## बाबांची प्रार्थना केली आणि कोर्टाचा निर्णय बाजूनं लागला !

(श्री. एस्. व्ही. मोघे, माहिम, मुंबई यांच्याकडून):

"सब्र का फल मीठा होता है" असे बाबा सांगत ते काही खोटे नाही. १९७१ साली आमच्या वडिलांनी झाड लावले त्याचे फळ आम्हाला १९९० साली मिळाले. १९७१ साली आमच्या खोलीची केस झाली. त्यावेळी आमची परिस्थिती फार गरीबीची आणि त्यात वडील एकटे कमवणारे. त्याच्यात वकिलाला पैसे द्यावयाचे. असे होता होता मला १९७५ साली नोकरी लागली. वडिलांना थोडाफार आधार झाला. पण काही वर्षांतच माझ्या डोक्यावर डोंगरच कोसळला. माझ्या वडिलांना १९७८ साली हृदयविकाराच्या झटक्याने देवाज्ञा झाली. माझ्यावर फार मोठी जबाबदारी पडली. त्यात खोलीची केस. या केसमधील मला काहीच माहीत नव्हते. माझी साईबाबांवर निष्ठा होती. म्हणतात ना "साई तारी त्याला कोण मारी" तसे बाबा मला त्यातून तारीत होते. त्यांच्यावर माझी फार श्रद्धा होती. बाबा म्हणत, श्रद्धा व सबुरी ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. "तुम्ही प्रश्नांची उत्तरे मी व्यवस्थित दिली. मनात बाबांचे आभार मानले व मी पिंजऱ्यातून बाहेर आलो. त्यानंतर माझ्या विरुद्ध पक्षाला पिंजऱ्यात बोलविण्यात आले. त्यांच्या वकिलांनी त्यांना सरळ सरळ प्रश्न विचारले. त्यांची उत्तरे त्यांनी दिली. नंतर माझे वकील त्यांची उलट तपासणी करण्यासाठी उभे राहिले. त्यांना माझ्या वकिलांनी उलट-सुलट प्रश्न विचारून गडबडवून टाकले. ते प्रश्नांची उत्तरे व्यवस्थित देत नाहीत हे त्यांच्या वकिलांच्या व न्यायाधिशांच्या लक्षात आले. हे सर्व संपल्यानंतर न्यायाधिशांनी आम्हाला ३१-८-८३ ही न्यायाची तारीख दिली.

आम्ही सर्वजण कोर्टातून बाहेर पडलो. मी माझ्या वकिलाबरोबर त्यांच्या चेंबरमध्ये जावून बसलो. वकील मला म्हणाले, तुम्ही प्रश्नांची उत्तरे व्यवस्थित दिली आहेत व ते उत्तरे देताना फार गडबडले आहेत. मी कोर्टातून घरी आलो. बाबांना नमस्कार करून सांगितले की बाबा, याच्यापुढे आता सर्व तुम्हीच बघायचे !



हा प्रश्न माझ्यापुढे उभा राहिला. माझे वकील मला म्हणाले, एकदा न्याय आपल्या बाजूने झाला आहे. तो सहसा बदलत नाही. घाबरण्याचे कारण नाही. मी घरी येऊन बाबांसमोर उभा राहिलो. बाबाच जणू मला सांगत होते, तू माझ्यावर श्रद्धा ठेव! सर्वकाही ठीक होईल !

आमची केस दिनांक ८-२-८९ रोजी पुन्हा वरच्या कोर्टात उभी राहिली. त्यातही आम्ही जिंकलो व विरुद्ध पार्टीच्या लोकांना ३१-३-८९ रोजी खोली खाली करण्याचा आदेश देण्यात आला; परंतु त्यांनी तसे न करता परत दिनांक १७-४-८९ रोजी हायकोर्टात अपील केले. त्यावेळी हायकोर्टाच्या न्यायाधिशांनी त्यांचे अपील नामंजूर करताना त्यांना एका वर्षाने, म्हणजे ३१-३-९० रोजी खोली खाली करण्याचा आदेश दिला. त्यांच्याकडून तसे लिहूनही घेतले. जसजसे वर्ष जवळ येऊ लागले तरी त्यांची काहीच हालचाल नाही हे पाहून मी मार्चच्या २८ तारखेला वकिलाकडे गेलो. वकिलांनी मला सांगितले की त्यांच्या मुलांच्या परीक्षा आहेत म्हणून त्यांनी कोर्टाने परत मुदत वाढवून द्यावी असा विनंती-अर्ज केला आहे. कोर्टाने त्यांना पुन्हा दोन महिन्यांची मुदत वाढवून दिली व यानंतर परत मुदत वाढवून मिळणार नाही अशी सक्त ताकीद दिली. त्याप्रमाणे त्यांनी आम्हाला दिनांक ३१-५-१९९० रोजी आमची खोली आमच्या ताब्यात दिली.

अशीच श्रद्धा तुम्ही बाबांवर नित्यनियमाने ठेवलीत तर बाबा तुम्हाला त्यातून नक्कीच तारतील. •

### अनुभव हवेत; पण छायाचित्रांसह !

आपण सर्व श्री साईभक्त आहात. म्हणून आपल्याला बाबांच्या कृपेचे अनुभव हमखास येत असतील. अशा अनुभवांपैकी एखादाच जबरदस्त अनुभव 'श्री साईलीला'कडे त्वरित पाठवा! मात्र अनुभवाशी संबंधित असलेल्या व्यक्तींची छायाचित्रे अनुभवासोबत पाठविणे आवश्यक आहे. अशा अनुभवास आम्ही त्वरित प्रसिद्धी देऊ!

– कार्यकारी संपादक

श्रद्धेने माझ्याकडे पहा मी तुमच्याकडे तसेच पाहीन."

अशीच भराभर वर्षे जात होती. तब्बल १३ वर्षांनी, म्हणजे १९८३ साली केस कोर्टात उभी राहिली. ज्या दिवशी केस होती त्या दिवशी सकाळी उठून, आंघोळ करून, बाबांच्या तसबिरीसमोर उभा राहून नमस्कार केला, त्यांची मनोमन प्रार्थना केली. नंतर माझ्या वकिलाकडे गेलो. त्यांनी ते मला काय प्रश्न विचारतील व दुसरा वकील काय प्रश्न विचारील, हे समजावून सांगितले. मी घरी आलो. साईबाबांसमोर उभा राहून नमस्कार केला. बाबांना सांगणे केले की बाबा, तुम्ही आता माझ्या मदतीला धावून या व दुसऱ्या वकिलांनी मला उलट तपासणीच्या वेळी सरळ सरळ प्रश्न विचारू द्या! असे सांगून पुडीत बाबांची थोडीशी उदी घेतली व नमस्कार केला.

मी कोर्टात जाण्यासाठी घराबाहेर पडलो. मी मनात सारखा बाबांचा धावा करीत होतो. माझी माणसे मला धीर देत होती. अकरा वाजता मी कोर्टात हजर राहिलो. कोर्टाची कामे चालू झाली. माझ्या केसचा नंबर पुकारला गेला. माझी छाती धडधड करीत होती. मी पिंजऱ्यात जाऊन उभा राहिलो. माझे वकील मला प्रश्न विचारण्यास उभे राहिले. त्यांनी मला प्रश्न विचारले. मी त्याची उत्तरे व्यवस्थित दिली. आता माझ्या उलट तपासणीसाठी माझ्या विरुद्ध बाजूचे वकील मला प्रश्न विचारणार होते. मी मनात बाबांचे नामस्मरण केले व सांगितले, बाबा, तुम्ही त्या वकिलाच्या मुखामध्ये वास करून ते मला सरळ सरळ प्रश्न विचारू द्या! विरुद्ध बाजूचे वकील मला प्रश्न विचारण्यास उभे राहिले आणि काय चमत्कार! त्या वकिलांनी काही आडवेढे न घेता व उलट-सुलट प्रश्न न विचारता मला सरळ सरळ प्रश्न विचारले. त्या

३१-८-८३ ही न्यायाची तारीख आली. मी सकाळी बाबांना नमस्कार करून वकिलाकडे गेलो. वकील मला म्हणाले, आपली जजमेंट दुपारी तीन वाजता आहे तेव्हा तुम्ही अडीच वाजता कोर्टात हजर व्हा! मी घरी येऊन बाबांना नमस्कार करून सांगणे केले की बाबा, आता तुम्ही त्या न्यायाधिशाच्या मुखामध्ये वास करा व खरा न्याय द्या! जसजशी दुपार होत आली तसतसे माझे हृदय धडधडू लागले. मला जेवण गोड लागेना! मला काहीच सुचत नव्हते. आम्ही दुपारी दोन वाजता कोर्टात हजर राहिलो. तीन वाजता आमची जजमेंट चालू झाली. माझे डोळे न्यायावर लागले होते. मी मनात बाबांचा सारखा धावा करीत होतो. पाच वाजता जजमेंट संपली. न्यायाधिशांनी आमच्या बाजूने न्याय दिला. शेवटी सत्य ते सत्य झाले. बाबांनी माझ्या बाजूने कौल दिला. मी हर्षभरित झालो; कारण आमची खोली आम्हाला मिळणार होती.

मी हार व पेढे घेऊन घरी आलो. माझ्या घरची सर्व मंडळी माझ्या वाटेकडे डोळे लावून बसली होती. माझ्या हातातील हार व पेढे पाहून सर्वजण आनंदित झाले. ते काय समजायचे ते समजले. घरच्या सर्व मंडळींना आनंद झाला. नंतर मी हात-पाय धुऊन बाबांच्या तसबिरीला हार घातला व पुढ्यात पेढे ठेवले. बाबांना सांगितले, तुम्ही माझ्याबरोबर होता म्हणून मी खोलीची केस जिंकू शकलो.

दिवस भराभर जात होते. काही दिवसांनी मी परत माझ्या वकिलाकडे गेलो तेव्हा त्यांनी सांगितले की विरुद्ध पार्टीच्या लोकांनी वरच्या कोर्टामध्ये अपील केले आहे. माझ्या मनात चर्र झाले. आता याच्यापुढे काय?

## साईंच्या कृपेनं पंगू भाऊ चालू लागला!

(श्री. विलास कोडाप, गडचिरोली यांच्याकडून):

सन १९८७ मध्ये मी अहेरी येथे शासकीय सेवेत कार्यरत होतो. अहेरी हे गाव माझ्या मूळ गावापासून ८५ कि.मी. लांब आहे. सदर घटनेच्या वेळेस मी तिथे एकटाच रहात होतो व माझे सर्व कुटुंब गडचिरोली येथेच रहात होते.

दिनांक २४ डिसेंबर, १९८७ ला मी अहेरीवरून गडचिरोलीस अनायासेच आलो. तेसुद्धा बाबांनीच ओढून आणले असे म्हणणे वावगे होणार नाही. तेव्हा आदल्या दिवशी, म्हणजे २३ डिसेंबरला माझा धाकटा भाऊ चि. हेमंतवर भांडणात चाकूचे वार झाले होते व तो गंभीर जखमी होऊन त्याला सामान्य रुग्णालयात भरती करण्यात आले होते. मी लगेच रुग्णालयात गेलो. पहातो तर हेमंतला कमरेच्या मागील बाजूस चाकूच्या दोन घातक जखमा झाल्या होत्या. तसेच पृष्ठभागावर व दंडावर एक एक जखम होती. एवढ्या जखमांमुळे फारच रक्तस्राव झाला होता. हेमंत मारेकऱ्यांचा पाठलाग करताना बेशुद्ध पडला होता आणि त्याच परिस्थितीत त्याला रुग्णालयात भरती करण्यात आल्याचे कळले. चाकूच्या हल्ल्याने एवढ्या जखमा व रक्तस्राव होऊनसुद्धा तो जिवंत राहिला हेसुद्धा दयाघन श्री साईबाबांच्या कृपेनेच घडले. अशा कठीण परिस्थितीत कमरेखालच्या जखमेमुळे पायाची मुळीच हालचाल करता येत नव्हती. डॉक्टरांनी क्ष-किरण केल्याशिवाय काहीही सांगण्याचे टाळले. चाकूच्या घावामुळे कमरेवरील पायाशी संलग्न असलेली नस तुटली असेल तर पुढे मेजर ऑपरेशनशिवाय पर्याय नाही असे शल्यचिकित्सकांचे म्हणणे पडले. त्यामुळे तर मी फारच घाबरून गेलो.

रुग्णालयात पुरुषांच्या वॉर्डातच मुख्य द्वारावर संत शिरोमणी सद्गुरु श्री साईनाथांची प्रतिमा लावलेली होती. तिथेच त्याच रात्री मी बाबांना चि. हेमंतला या दुर्धर संकटातून मुक्त करण्याची प्रार्थना केली. बाबांनी माझी प्रार्थना स्वीकारून चमत्कार घडविला. सकाळी हेमंत स्वतःच उठून चालत संडासला गेला तेव्हा आपोआपच परमकृपाळू साईनाथांच्या कृपादृष्टीच्या वर्षावापुढे मी नतमस्तक झालो व माझ्या डोळ्यांतून आनंदाचे अश्रू वाहू लागले.

पुन्हा सन १९८९ मध्ये २२ सप्टेंबरला सायंकाळी हेमंत ६-७ किलोमीटर सायकलने जाऊन आला व घरी आल्यानंतर थोड्याच वेळात त्याचे दोन्ही पाय निर्जीव झाले. ही वेळ सायंकाळची असल्यामुळे शासकीय रुग्णालय बंद होते. त्यामुळे त्याला खाजगी डॉक्टरला दाखविले. डॉक्टरांनी त्याला शासकीय रुग्णालयात भरती करण्यास सांगितले. शासकीय रुग्णालयात शल्यचिकित्सकांनी हेमंतला तपासले व कमरेच्या जुन्या घावामुळे असे घडले असावे असे निदान करून त्याला नागपूर मेडिकलला नेण्यास सांगितले आणि तशी सर्व कागदपत्रे तयार करून दिली. या सर्व प्रकारामुळे मला भांबावल्यासारखे झाले. काय करावे काहीच कळत नव्हते! ती वेळ रात्रीची होती. त्यामुळे दुसऱ्या दिवशी सकाळी नऊ वाजेपर्यंत हेमंतला दवाखान्यातच ठेवून घेण्याची आम्ही डॉक्टरांना विनंती केली व ती त्यांनी मान्य केली.

रात्री परत त्याच प्रतिमारूपी साई दयाघनाला हेमंतला या संकटातून दूर करण्यास हाक मारली व बाबांची उदीरूपी संजीवनी हेमंतच्या कमरेला व पायाला लावली. थोडी उदी पाण्यातूनही प्यायला दिली. त्याही वेळेला बाबांनी पुन्हा चमत्कार दाखविला. दुसऱ्या दिवशी सकाळी परत हेमंत स्वतःच उठून कोणाचाही आधार न घेता संडासला जाऊन आला. याहीवेळेस बाबांच्या या कृपेने मी भारावून गेलो व पुन्हा आपोआपच श्री समर्थ साईनाथांच्या चरणी नतमस्तक झालो. ●

## सत्यात उतरलेली स्वप्नं पाठवा!

आपल्याला असंख्य स्वप्नं पडत असतात. पण शास्त्रज्ञांच्या मते ९० टक्के स्वप्नं आपण जागे झाल्यावर विसरत असतो. तरीही जी स्वप्नं आठवतात ती कालांतरानं सत्यात अनुभवास आल्याची असंख्य उदाहरणेही आपण पाहतो.

श्री साईबाबांनीही अनेक भक्तांना स्वप्नात जाऊन दर्शन आणि दीक्षा दिली आहे. म्हणूनच स्वप्नांचा अभ्यास होणं आवश्यक आहे.

तुमची स्वप्नं, नंतर सत्यात उतरल्याचा अनुभव तुम्हाला आला आहे का? असेल तर असा अनुभव 'श्री साईलीला'कडे लिहून पाठवा! आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ! अर्थात ज्याला अनुभव आला आहे त्यानं आपलं छायाचित्र व पूर्ण पत्ता पाठविणं आवश्यक आहे.

—कार्यकारी संपादक

## बाबांनी अपघातापासून वाचविले !

(श्री. वि. रा. पवार, सातारा यांच्याकडून):

आम्ही काही मित्रमंडळी बाबांच्या दर्शनासाठी साताऱ्याहून खास टेंपो करून निघालो. त्यामुळे प्रवास अगदी मजेत आणि मनाप्रमाणे चालला होता. वाटेत काही धार्मिक तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी गेल्यामुळे नगरमध्येच रात्र झाली आणि आमचा मुक्काम नगरमध्ये झाला.

दुसऱ्या दिवशी सकाळीच आनंदी वातावरणात आम्ही शिरडीला गेलो. बाबांचे दर्शन व्यवस्थित झाले. दुपारी १२ची आरती झाली. आम्हापैकी काहींनी संकल्प केले होते, त्याचीही सांगता व्यवस्थित झाली. सर्वकाही प्रत्येकाच्या इच्छेप्रमाणे होत होते. त्यामुळे साहजिकच आमच्यातील सर्वजण मनाने एका वेगळ्या दुनियेत वावरत होते. दरम्यान दुपारचे ३ वाजले. पुन्हा एक वेळ बाबांचे दर्शन घेऊन मनातल्या मनात बाबांना आम्ही सांगितले की परत लवकर दर्शनाला घेऊन या! आणि आमचा टेंपो शिरडीरूपी पंढरीतून बाहेर पडला.

आम्ही संगमनेर सोडले व त्यानंतरचा घाट उतरू लागलो. संध्याकाळचे ६ वाजले होते. मावळत्या सूर्याचे दर्शन घेत बाहेर अंधुक प्रकाशात दिसणारे निसर्गसौंदर्य न्याहाळीत होतो – एवढ्यात मोठा आवाज झाला. आम्ही सर्वजण अर्थातच घाबरलो. घाईघाईने टेंपोतून खाली उतरलो, पहातो तो मागचा टायर पंक्चर झालेला. स्टेपनी काढली. तीही साधारणच होती; पण तेव्हा आम्हाला ती लाखमोलाची वाटली !

स्टेपनीचा टायर जोडून पुन्हा प्रवास सुरू झाला. पुन्हा पंक्चर, दुसरा जोडा; पुन्हा पंक्चर काढा, असा आमचा प्रवास [illegible] आता [illegible] सर्वच कंटाळले होते. त्यातच काहीजण चक्क झोपले होते. आम्ही शिरवळपर्यंत पाच ते सहा वेळा टायर बदलत आलो होतो. पंक्चर काढणे महत्वाचे होते म्हणून आम्ही थांबलो. त्यावेळी रात्रीचे २ वाजले असल्याने पंक्चर काढून मिळेल का ? याची काळजी वाटत होती. तीही बाबांच्या कृपेने दूर झाली. पंक्चर काढून मिळाले आणि सबुरीरूपी आशीर्वादही ! "अगदी हळू जा ! टायरची खात्री नाही." बाबांच्यावर पूर्ण श्रद्धा ठेवून नामस्मरण करीत आम्ही निघालो.

पहाटेचा गार वारा अंगाला झोंबत होता. नाही म्हटलं तरी झोपेने आमच्यावर आक्रमण केले होते. इतक्यात पुन्हा नेहमीच्या टायरच्या आवाजापेक्षा कानठळ्या बसविणाऱ्या आवाजाने आम्ही सारे जास्तच भयभीत झालो. क्षणभर वाटलं, पुन्हा त्याच टायरची करामत असणार ! कारण तशी या प्रवासात सवयच झाली होती. परंतु आश्चर्य म्हणजे ज्या टायरवर आमची खात्री नव्हती तो शांत उभा होता; तर टेंपोच्या ड्रायव्हरच्या बाजूचे पुढील संपूर्ण चाकच निघून जाऊन टेंपो ३ फर्लांग पुढे येऊन नाईलाजास्तव थांबला होता. त्यावेळी सातारा फक्त २ किलोमीटर अंतरावर होते.

सुदैवाने कोणासही काहीही इजा झाली नाही.

त्याचक्षणी वाटले, पहा, बाबांना भक्तांची किती काळजी आहे ती ! कसलीही बरी-वाईट वेळ येऊ नये म्हणून तर वारंवार टायर पंक्चरचं निमित्त करून सबुरीने; परंतु सुखरूप घरी पोहचावं, अशीच बाबांची इच्छा असावी. ●

## बाबांच्या कृपेनं हरवलेले हजार रुपये परत मिळाले !

(सौ. लीला एन्. पवार, गोखले नगर, पुणे यांच्याकडून):

माझे यजमान नाशिकला सरकारी कार्यालयात नोकरीस असतात. दर शनिवारी व रविवारी पुण्याला आमच्या राहत्या घरी ते येतात. असेच जानेवारी महिन्यात एक तारखेला काही महत्त्वाच्या कामामुळे ते पंधरा दिवस येऊ शकले नाहीत. दिनांक ७ जानेवारीला रात्री नाशिकहून एक दिवसाकरिता हे पुण्याला आले. रविवारी सुट्टी असल्याने अन् रात्री खूप उशिरा आल्याने ते दुसऱ्या दिवशी उशिराच उठले. सर्व विधि उरकून महाभारत पाहून झाले. घरात किराणामालाचे सामान वगैरे आणून देण्याच्या दृष्टीने सामानाची यादी, तसेच कोणाकोणाचे पैसे द्यायचे (उदा. दुधवाल्याचे बील, घरभाडे, मुलांच्या शाळेची फी वगैरे) याचा हिशोब केला. पैसे मोजून वेगवेगळे करावेत म्हणून यांनी पैशांचे पाकिट उघडले, तो काय, त्यात चक्क एक हजार रुपये कमी असल्याचे आढळले. यांनी मला विचारले,

"अग, तू यातले काही पैसे घेतलेस काय ?" त्यांचे हे वाक्य ऐकून मीही अवाक्च झाले; कारण मी तर मुळी यांच्या पाकिटाला हातच लावला नव्हता. तसं मी सांगितल्यावर यांना घामच फुटायचा बाकी राहिला. तर मग पैसे गेले कुठे ? घरात सर्व ठिकाणी पाहिले. बॅग दोन दोन वेळा उलट-सुलट करून पाहिली; पण सारेच प्रयत्न व्यर्थ ! मी तर पार घाबरूनच गेले. आतापर्यंत आजकालच्या महागाईच्या दिवसांत एक हजाराचा फटका म्हणजे काय साधी बाब आहे ! घरातील सर्व व्यवस्था चोख केल्याखेरीज इतर काहीच खर्च न करण्याचा त्यांचा परिपाठ असतानाही मी यांना पुन्हा पुन्हा खोदून खोदून एक ना अनेक प्रश्न, कुणाला दिलेत का ? वेगळे कुठे ठेवलेत का ? काही खर्च केलेत का ? विचारायला सुरुवात केली. सर्वच प्रश्नांची उत्तरं "नाही" अशीच आल्यावर आता काय करायचं ? हा प्रश्न साहजिकच "आ" वासून उभा राहिला. मी यांना पुन्हा आठवण देत विचारलं,

"अहो, नीट आठवा ! पगाराचे पैसे घेताना नीट मोजून घेतले होतेत ना ? की त्यातच हजार रुपये कमी मिळाले ?"

हे ऐकून मात्र ते संभ्रमात पडले; कारण तशी शक्यता होती खरी, हे त्यांच्या चेहऱ्यावरून मला उमगले. ते बोलू लागले,

"अग, बहुधा पगाराचे पैसे घेऊन नंतर ते सुट्टे करून घेताना काहीतरी घोटाळा झाला असावा खरा ! कॅशियर तसे करणार नाही; पण काय सांगावे ! पैशाचा मोह फार वाईट ! एक हजार रुपये विनासायास मिळताहेत म्हटल्यावर मोह पडायला कितीसा तो अवकाश !"

शांत मनाने थोडा विचार केल्यावर माझं मन मला सांगू लागलं, काहीतरी देण्याघेण्यात चूक झाली असावी. कॅशियरला जर विचारले तर चूक लक्षात येऊन पैसे नक्कीच परत मिळतील.

आम्ही दोघांनी लगेच बाबा व श्री गुरुदेव दत्तांच्या फोटोपाशी जाऊन त्यांना नमस्कार केला. त्यांना घडलेली घटना सांगितली. पैसे परत मिळू दे ! अशी प्रार्थना केली. आम्हा सर्वांचा बाबांवर व दत्तात्रेयांवर पूर्ण विश्वास असल्याने आणि आम्ही त्यांचे नित्य स्मरण करीत असल्याने आम्हाला पैसे परत मिळतील अशी खात्री वाटू लागली. तो रविवार मात्र द्विधा मन:स्थितीत गेला. सोमवारी पहाटेच हे पुन्हा नाशिकला गेले. त्यांनी जेव्हा कॅशियरला विचारले तेव्हा तो सुरुवातीला कबूल होईना; परंतु यांच्याकडे शिल्लक असलेल्या रकमेतील नोटांचे नंबर तपासले असता त्यात यांना ज्या क्रमांकांच्या नोटा देणे आवश्यक होते त्यातील काही नोटा मिळाल्या. (पगाराचे पैसे सुट्टे करून घेताना कोऱ्या करकरीत नोटा मिळाल्या होत्या व त्या अनुक्रमाने होत्या.) त्याबाबत विचारले असता कॅशियर कबूल झाला. त्याला बाबांनी व दत्तगुरुंनीच चांगली बुद्धी दिली होती. कॅशियरने ते एक हजार रुपये घरी आणून दिले.

यांनी लगेच मनातल्या मनात बाबांचे व दत्तगुरुंचे आभार मानले. त्यांच्यावरील आमच्या विश्वासामुळेच त्यांच्या कृपेने आमचे पैसे आम्हाला परत मिळाले. लागलीच यांनी मला फोन करून पैसे परत मिळाल्याचे कळविले आणि माझा जीव भांड्यात पडला. ●

## बाबांमुळे आत्मिक बळ मिळाले !

(श्रीमती एम्. एस्. भोयर, अमरावती यांच्याकडून):

**मी** साईप्रती पूर्णपणे समर्पित आहे. जीवनात येणाऱ्या छोट्या छोट्या अनुभवांवरून तर माझी भक्ती अधिकच दृढ होत जाते. अतिशय कठीण प्रसंगाला आजपर्यंत मला तोंड द्यावे लागले नाही इतके माझे जीवन सरळमार्गी आहे.

परंतु १९ एप्रिल, १९९० हा दिवस मी माझ्या आयुष्यात कधीच विसरू शकणार नाही. आमच्या सकाळच्या शाळा लागल्या होत्या. त्यावेळी शाळेमध्ये परीक्षेचे काम सुरू होते. माझी दोघंही मुलं, लहान सहा वर्षांचा व मोठा तेरा वर्षांचा, घरी खेळत होती. त्यांच्या वार्षिक परीक्षा नुकत्याच संपल्या होत्या. माझे पती घरामध्ये त्यांचे महाविद्यालयीन काम करीत होते. याच सुमारास महाभारतात दाखविण्यात येणाऱ्या लढाईचा परिणाम पोरांवर झालेला! ते बाण-बाण खेळू लागले. तेवढ्यात लहानग्याकडून मोठ्याच्या डाव्या डोळ्याला बाण लागला. त्यातून रक्त वाहू लागले. ते पाहून माझे पती फार घाबरून गेले. त्यांनी सरळ त्याला डॉक्टरकडे नेले. डॉक्टरांनी प्रथमोपचार केल्यावर त्याचदिवशी ऑपरेशन करावे लागेल, असा सल्ला दिला; कारण, जी काडी डोळ्याला लागली होती त्याची 'शिलक' त्याच्या डोळ्यात राहिली होती आणि ती काढणे भाग होते.

डॉक्टरांनी ऑपरेशन सांगितल्याबरोबर हे तर फार घाबरले. त्यांची ॲसिडिटी वाढली. तेथेच त्यांना उलट्या सुरू झाल्या. मला शाळेत फोनवर कळविण्यात आले. मी दवाखान्यात गेले व रात्रीच्या ऑपरेशनसाठी मन पक्कं करून तयारीला लागले. तो दिवस गुरुवारचा होता. सकाळपासून मी अन्नाचा एक कणही घेतला नव्हता. मी मनाशी ठरविले की ऑपरेशन यशस्वी होईपर्यंत काही खायचे नाही; आणि साईनाम जपत राहिले. रात्री साडेआठ वाजता ऑपरेशन झाले. दहा दिवसपर्यंत आम्ही दवाखान्यात राहिलो. ते दिवस अतिशय काळजीत काढले.

एक महिना झाल्यानंतर डोळ्याची जखम पूर्णपणे बसली; पण त्याला त्या डोळ्याने दिसेना. आम्ही अधिकच काळजीत पडलो. त्यासोबत त्याचे अतिशय डोके दुखणे सुरू झाले. काय करावे मला सुचेना! त्याला मुंबईच्या एका डॉक्टरकडे नेले; पण उपयोग काही झाला नाही. शेवटी आम्ही त्याला मद्रासला नेले. तेथे त्याच्या डोळ्याची पुन्हा छोटी छोटी तीन ऑपरेशन्स झाली व नंतर दोन महिन्यांनी लेन्स लावली तेव्हा त्याला दिसू लागले.

ते ५/६ महिने आम्ही अतिशय काळजीत काढले. तरीही मला विश्वास होता की सर्वकाही ठीक होईल. या विश्वासामागे होती ती माझी साईबाबांवरील भक्ती! जेव्हा जेव्हा मी काळजीत असे तेव्हा तेव्हा मला साईबाबा माझ्याजवळ असल्याचे जाणवत असे. माझी जर भक्ती नसती तर माझीही अवस्था कदाचित यांच्यासारखीच झाली असती, हे निश्चित!

माझ्यामधील आत्मिक बळ केवळ साईकृपेनेच प्राप्त झाले, याचा मला पूर्ण विश्वास आहे. म्हणूनच माझ्या जीवनात येणाऱ्या प्रसंगांना मी निर्धाराने तोंड देऊ शकते. ●

---

## साईकृपेनं ट्रक घेता आला !

(श्री. जगदिश सुंके, पनवेल, रायगड यांच्याकडून):

**अ**खिल ब्रह्मांडनायक राजाधिराज योगीराज श्री साईबाबांनी अखंडपणे भक्तांना योग्य मार्गदर्शन करून त्यांना साक्षात्कार दिल्याचे व त्यांच्याबाबतीत अनेक चमत्कार घडवून आणल्याचे आपण पहात असतो, ऐकत असतो, वाचत असतो.

अशाचप्रकारे मलासुद्धा बाबांनी चमत्कार दाखविला. १९८० सालच्या, मला अनुभवायला मिळालेल्या चमत्कारामुळे मी आजतागायत श्री साईबाबांचा असीम भक्त आहे व बाबांचे ध्यान, तसेच बाबांनी केलेल्या उपदेशाचे काटेकोरपणे पालन करीत आहे.

मे महिन्याचे कडक आणि रखरखीत उन्हाळ्याचे दिवस होते. माझा ट्रक-ड्रायव्हिंगचा व्यवसाय असल्यामुळे नित्यनियमानुसार मी माझा ट्रक मुंबईहून माल उतरवून पनवेलला दुपारच्या वेळी पोहोचलो होतो. माझे पनवेललाच रहाते घर असल्यामुळे घरी दुपारी जेवण आटोपून ट्रकमध्ये किरकोळ दुरुस्तीचे काम करून घेऊन पुन्हा माल भरण्याकरिता कर्जत-नेरळ या गावी ट्रक घेऊन जायचे नक्की केले होते.

ज्या गॅरेजमध्ये तासभर दुरुस्तीचे काम चालले होते त्या ठिकाणी तीन अनोळखी व्यक्ती ऊन लागू नये यासाठी बाजूलाच असलेल्या छपराखाली उभ्या होत्या. माझ्या ट्रकचे दुरुस्तीचे काम लवकर करून द्यावे याकरिता मी एकसारखा गॅरेज कर्मचाऱ्यांकडे लकडा

(पृष्ठ क्र. ८ वर)

---

## आणि डॉक्टरांचे हात गुरुमाऊलीच्या फोटोसमोर जोडले गेले !

(श्री. स. द. महाजन, नागपूर यांच्याकडून):

**श**निवार, दिनांक १५ ऑगस्ट, १९९२ रोजी दरवर्षाप्रमाणे ध्वजारोहणाच्या कार्यक्रमाकरिता मी राज्य परिवहन मंडळाच्या शहर बसआगारात गेलो. तेथून श्री. टेकाडे, आगार व्यवस्थापक यांना दिनांक १६ ऑगस्ट, १९९२ला मुंबई येथे जाणे आवश्यक असल्याने त्यांचे आरक्षणाचे तिकिट देण्यासाठी घरी जाणे आवश्यक होते. त्या दिवशी इतका पाऊस होता की घराबाहेर पडणे मुष्किलीचे होते.

भरपावसात मी घरी आलो. अंग पुसले. कपडे बदलले. जेवण केले. थोड्याच वेळात अकस्मात मला चक्कर आली. काही दिसेनासेच झाले. माझी पत्नी सौ. वंदना हिला तसे सांगितले.

डॉ. जामदार व नेत्रतज्ञ डॉ. शरद जोशी यांच्याकडे गेल्यानंतर त्या तज्ञांनी जे सांगितले त्यामुळे हातपाय गळल्यागत झाले, शरीरात त्राणच उरला नाही. डॉ. जोगळेकरांनी नुकतेच पोटाचे ऑपरेशन केले होते. त्यापायी जवळजवळ १५ हजार रुपये खर्च झाले होते. त्यात पुन्हा हा खर्च! माझ्या विचारांसमोरही डोळ्यांप्रमाणे काळोख पसरला.

माझं जीवन दुसऱ्याच्या आधारावरच अवलंबून राहणार या भयंकर विचाराने माझं ब्लड-प्रेशर अधिकच वाढलं.

माझी पत्नी व बहीण सौ. सुशिला ह्या दोघीही विचारात पडल्या. कुठे धाव घ्यावी, काही कळेना! डॉ. जोशी व डॉ. जामदार यांनी जवळजवळ १८ तास झोप घेतली तर आराम पडेल व डोक्यावरील ताण हळूहळू आपोआप कमी होईल, असं सांगितलं. दोघींनीही साईनामाचा जप सतत चालू ठेवला व मलाही करण्यास सांगितला. मी झोपेतही साई.... साई.... म्हणत होतो. माझ्या पत्नीने माझ्या गळ्यातील ताईत दोन वर्षांपूर्वी साईचरणाला स्पर्श करून आणला होता. तो तिने एका पाणी भरलेल्या वाटीत ठेवून त्याचे तीर्थ मी झोपेत असतानाही दोन दोन थेंब त्या दोघीही मला आळीपाळीने भरवित होत्या.

तीन दिवसांनी मला आराम पडला. पुन्हा डॉ. जोशी यांच्याकडे डोळे-तपासणीकरिता गेलो. त्यांनी डोळे तपासल्यावर एकदम आश्चर्यच व्यक्त केले! डोळे-तपासणीचे सर्व कागद पुन्हा पुन्हा वाचले! त्यांचा त्या रिपोर्टवर विश्वासच बसेना!

"महाजन, खरं सांगा तुम्ही काय उपाय केलेत ते! मी मुद्दामच तुम्हाला सांगितलं नव्हतं तुम्ही घाबरून जाल म्हणून! तुमच्या डोळ्यांचं ऑपरेशन करण्याशिवाय गत्यंतरच नव्हतं! परंतु आता पहातो तर तुम्हाला बराच आराम पडलेला दिसतोय!" डॉक्टर बोलत होते.

माझ्या पत्नीच्या व बहिणीच्या डोळ्यांतून अश्रूधारा वाहू लागल्या. त्या अश्रूधारा आनंदाच्या होत्या, साईंच्या कृपाप्रसादाच्या होत्या. डॉ. जोशींनी कुतूहलानं त्यांना विचारलं, "तुमच्या डोळ्यांतून अश्रूधारा?"

"डॉक्टर...." माझी पत्नी भरल्या अंतःकरणानं डॉक्टरांना सांगत होती. "....आम्ही फक्त साईतीर्थ यांच्या डोळ्यांत घातलं...."

....आणि डॉ. जोशींचे हात त्यांच्या दवाखान्यात असलेल्या गुरुमाऊलीच्या फोटोसमोर जोडले गेले!

(पृष्ठ क्र. ७ वरून)

लावला होता. माझी घाई पाहून गैरेजचा मालक खवळला व त्याची आणि माझी शाब्दिक चकमक उडाली.

गैरेजवाला व माझ्यामध्ये जुंपलेले भांडण पाहून छपराखाली उभ्या असलेल्या तिन्ही अनोळखी व्यक्ती माझ्याजवळ येऊन अत्यंत आत्मियतेने मला म्हणाल्या, "मित्रा शांत हो!" त्यांच्या प्रेमळ वाणीत अत्यंत माया असल्याचे मला तात्काळ जाणवले. मीसुद्धा त्यांच्या लोभस वाणीने प्रसन्न झालो व शांत होणेच पसंत केले.

थोड्या वेळानंतर मी त्यांच्याजवळ जाऊन नम्रतापूर्वक विचारले, "साहेब, आपण तिघेजण तासाभरापासून या जागी का ताटकळत उभे आहात?" त्यावर त्यांनीही शांततेने त्यांच्यावरचा प्रसंग कथन केला. तो असा....

"आम्ही कर्जत तालुक्यात, कर्जत-नेरळ मार्गावर असलेल्या भिवपुरी-रोड रेल्वे-स्टेशनजवळ असलेल्या चिंचिवली या गावातील श्री साईबाबा मंदिराचे ट्रस्टी आहोत. मंदिराच्या ठिकाणी बाबांनी हयात असताना सन १९१६ साली श्री. प्रधान नावाच्या भक्तास साक्षात् दृष्टांत देऊन आज्ञा केली की माझ्या नावाने या जागेवर अखंड धुनी प्रज्वलित रहावी. ती धुनी त्या दिवसापासून आजही अखंडपणे प्रज्वलित आहे. ज्या ठिकाणी बाबा घोड्यावर बसून आज्ञा करीत होते त्या जागी एक सुंदरसे तुळशी-वृंदावन बांधले आहे व बाजूला लागून बाबांचे भव्य मंदिर!"

"आज आम्ही धुनी-कार्यासाठी लागणारी जळाऊ लाकडे (गंडेरी), तसेच उत्सवाकरिता लागणारी सामुग्री [illegible]

# ....आणि आम्ही सर्वांनी सुटकेचा निःश्वास टाकला!

(प्रभा गोसावी, इंदोर, म.प्र. यांच्याकडून):

**कि**तीतरी कसोटीचे प्रसंग जीवनात येतात व जातात. त्यावेळी सद्गुरुंनीच प्रत्येक प्रसंगातून आम्हाला वाचवलेले असते. तुमच्याशिवाय आमचा वाली कोणी नाही, हा पूर्ण भरंवसा देवा, तुमच्या चरणी आमचा असतो; पण वेळ आली, एखादे संकट पुढे येऊन उभे ठाकले की यातून पार पडू ना म्हणून आमच्यासारख्यांच्या मनात शंका का यावी? या गोष्टीचा मनाला खेद होतो. आम्ही आमच्या स्वतःवर किंवा मुलाबाळांवर खूप प्रेम करतो; पण ते खरंच निःस्वार्थी प्रेम असतं का? का बरं असं होतं? आमची भक्तीची पायरी बरीच खाली असते म्हणून असं होतं? अगदी अलिकडचे दोन प्रसंग मी येथे सांगणार आहे. इंदोर-नाशिकच्या गाडीने आम्ही (मी, माझी धाकटी मुलगी व तिचा मुलगा) नाशिकला चाललो होतो. प्रवासात मी सतत नामस्मरण करीत होते. रात्रीची शांत वेळ होती. शिरपूरच्या जवळपास आमची बस अडवली गेली. हातात लोखंडी कांबी वगैरे घेऊन १०-१५ शीख बाजूला येऊन उभे राहिले. आमच्या बसच्या पुढे २-३ ट्रक व १-२ बसेसही उभ्या होत्या. अर्थात त्यांचा उद्देश सर्वांच्याच लक्षात आला. बसमधील सर्वजण दारे-खिडक्या बंद करून आता पुढे काय होणार म्हणून धास्तावले होते. आम्ही बाबांची मनापासून प्रार्थना करीत होतो, आळवणी करीत होतो. सर्वांच्याच जीवाचा भीतीने थरकाप उडाला होता, ब्रह्मांड आठवले होते आणि अशा कसोटीच्या वेळी आमचा परमेश्वर, भक्तांचा भगवंत, करूणेचा, कृपेचा सागर, जो भावाचा भुकेला आहे तो, धावून आला. बाबा, आम्ही कसे उतराई होऊ तुमचे! मनापासून केलेली प्रार्थना सार्थ ठरली. सर्व बसेस व ट्रकच्या ड्रायव्हरांनी काय सल्लामसलत केली व त्यांना पैसे देऊन ते शीख शांतपणे कसे निघून गेले याचे अजून आश्चर्य वाटते. ते शीख निघून गेल्यानंतर आमची बसही सुरु होऊन योग्य दिशेने जाऊ लागली व आम्ही सर्वांनी सुटकेचा निःश्वास टाकला.

असाच आणखी एक प्रसंग त्यानंतर १०-१५ दिवसांनी घडला. कोकणात आमच्या जावयाबरोबर आम्ही ५-६ जण त्यांच्या गाडीतून जात होतो. कोकणात 'परळीनाथ' म्हणून कुलदैवत आहे. त्याच्या दर्शनासाठी आम्ही निघालो होतो.

आजूबाजूला हिरवीगार शेते होती. एकीकडे नारळी-पोफळीची दाट वनराई व आंबे-फणसांची झाडे शिस्तीत; पण आनंदाने डुलत होती. शिरीष-कुसुमांची फुललेली रंगीबेरंगी फुले पाहून तर परमेश्वराने या कोकण प्रांताला निसर्गसौंदर्याचे केवढे मोठे बक्षिस दिले आहे असे वाटले. फळाफुलांनी भरलेले ते वृक्ष आमचे जणू स्वागत करीत आहेत असे वाटत होते. तासनूतास आम्ही ती भगवंताची कलाकृती, ते निसर्गसौंदर्य मनमुराद पहाण्यात गुंग होऊन गेलो होतो. वाकडी वळणे घेणारे घाट ओलांडून आम्ही 'पेण' हे गाव पार केले. संध्याकाळी ६-६॥ ची वेळ झाली. आता आम्हाला सरळ रस्ता सोडून शेतांच्या मधून जाणाऱ्या लहान रस्त्याने पुढे जायचे होते. कोकणातल्या निसर्गाने इतका वेळ मनाला केवढा आनंद दिला! पण नंतर मात्र आमच्या आनंदाला काळजीची कड लागली. हा जो रस्ता होता तो म्हणजे उंचच्या उंच उंचवटे व लगेच उतरण, धुळीचे लोट असा ६-७ मैलांचा होता. तो ओलांडून आमची गाडी एका आडोशाला उभी राहिली व पुढे गाडीने जाणे शक्य नसल्याने आम्ही सर्वजण 'पायवाटेने' चालू लागलो. असे होता होता संध्याकाळ होऊन गेली व चांगलाच अंधार पडला. जवळपास वस्ती नाही. बॅटरीच्या उजेडात समोरचा अस्ताव्यस्त पसरलेला रस्ता कसातरी पार करीत बाबांची मनापासून प्रार्थना करीत चाललो होतो. आजूबाजूला शुकशुकाट आणि अनोळखी पाऊल-वाट; सोबत होती ती फक्त माझ्या सद्गुरुंची, गुरुमाऊलीची.

त्या रस्त्यावरून जाताना असं वाटे, पालापाचोळ्यातून एखादे सरपटणारे जनावर येईल का? की जवळच्या झाडीतून जंगली जनावर अचानक समोर येईल? म्हणून जीवाचा थरकाप होत होता आणि काय आश्चर्य! थोड्याच वेळात प्रचिती आली. मनाच्या गाभाऱ्यातून साद आली, "....घाबरू नकोस! अगदी घाबरू नकोस! तुमचे रक्षण करायला मी सदैव तुमच्या पाठीशी उभाच असतो." आणि मग फार धीर आला. ज्यावेळी संपूर्ण भार आम्ही सद्गुरुंवर टाकतो तेव्हाच परमेश्वर धावत येतो हे सर्व माहीत असूनही व हजारो वेळा अनुभव आला असतानाही, आता या संकटातून मुक्त होऊ की नाही अशी पुसटशी शंका मनाच्या एका कोपऱ्यातून हळूच डोकं वर काढते. हे किती चुकीचे आहे! स्वतःच्या जीवाबद्दल केवढी ही आसक्ती! हीच देहाबद्दलची आसक्ती परमपवित्र अशा सद्गुरुचरणी परिणीत होईल का? अनंत जन्मांचे पुण्य फळाला आले म्हणूनच सद्गुरुंचे चरण दिसले. तेव्हा भगवंता, करुणासागरा, आमची भक्ती दृढ होऊ दे! आमच्या मनातले असंख्य विचार-विकार, संकल्प-विकल्प, मान-अपमान, तुझं-माझं असल्या विचारांचं जाळं उचलून फेकून द्यायला आपणच आम्हाला प्रेरणा द्या! आपणच हात धरून आम्हाला श्रद्धेची वरची पायरी दाखवा, म्हणजे त्रिशंकुसारखी अवस्था आमची व्हायची नाही व कोणतेही संकट, कोणतीही परिस्थिती समोर आली तरी आपल्या चरणांवर सर्व भार टाकून आम्ही आपले मोकळे होऊ. हे मनातल्या विचारांचे तांडव चालू असतानाच ज्या पाऊलवाटेने आम्ही जात होतो ती वाट एकदाची संपली आणि आम्ही कोकणातल्या घरी सुखरूप येऊन पोहोचलो. तेथील कुलदैवतेला त्रिवार नमस्कार करून म्हटले, देवा,

द्या मज एकच वरदान<br>
किती करू गुणगान<br>
देवा मी आहे अज्ञान

द्या मज एकच वरदान<br>
बाबा, एवढेच मागणे हवे -

कृपादृष्टीने सदा पहावे।<br>
प्रेमाश्रूंनी चरण धुवावे।<br>
हृदयासनी सदा असावे।<br>
या जन्मीचे सार्थक व्हावे॥

नऊ वाजल्यापासून ते आता दुपारी तीन वाजायला आले तरी आम्हास खरेदी केलेले सामान व लाकडे वाहून नेण्यासाठी भाड्याने ट्रक मिळालेला नाही. तेव्हा एखादे वाहन भाड्याने मिळेल या आशेने येथे उभे आहोत.''

त्यावर मला सुबुद्धी झाली व मी त्यांना पटकन् म्हणालो, ''माझा ट्रक कर्जतलाच माल भरण्यासाठी येथून रिकामा जाणार आहे. तेव्हा जाताना तुमचे सामान मी घेऊन चलतो. काहीच काळजी करू नका.''

एवढे बोलल्यावर त्या तीनही व्यक्ती हर्षभरित होऊन म्हणाल्या, ''केवळ बाबांचीच कृपा! अगदी त्वरेने आमच्यासाठी धावून आले! तुमचा ट्रक विनासायास आम्हाला मिळवून दिला! साईनाथांनीच भक्तांच्या सेवेला ट्रकरूपी रथ पाठविला असेच म्हणायचे!''

सामान ट्रकमध्ये भरून पनवेल ते कर्जत (चिंचवली) येथे मंदिराच्या भव्य प्रांगणात विनदिक्कत पोहोचला. ट्रक रिकामा होईपर्यंत बाबांचे मंदिर, धुनीची जागा, छोटीशी लेंडीबाग ह्या सर्व गोष्टी पाहून मन प्रसन्न झाले. तसेच मंदिरासमीपच वास्तव्य करून असलेले ट्रस्टी प्रधानांचे चिमुकले घर व त्या सर्वांचे प्रेमळ वर्तन, तसेच मनःपूर्वक साईभक्ती, साईसेवा पाहून माझ्याही मनात साईश्वराबद्दल भावना उफाळून आल्या व साईभक्तीची पाळेमुळे चिरकाल तिथेच रुजली गेली माझ्या मनात!

विद्यमान ट्रस्टी प्रधान परिवार यांचा निरोप घेऊन त्यांस विनंतीपूर्वक सांगितले, ''आपल्याला पनवेलहून ज्या ज्यावेळी बाबांच्या उत्सवासाठी लागणारी साधनसामुग्री आणावयाची असेल त्या त्यावेळी आपण प्रथम माझ्याशी संपर्क साधा! मी साईसेवेकरिता कधीही सज्ज आहे. मी आनंदाने आपल्याबरोबर साईसेवा करीन!''

माझ्या या बोलण्याने त्यांना फार आनंद झाला. त्यानंतर बरीच वर्षे माझ्या ट्रकचा साईसेवेस उपयोग झाला. मलाही साईसेवेबद्दल समाधान वाटत असे, आनंद होत असे. दरम्यानच्या काळात त्या ट्रकवरील माझी नोकरी संपून मला बाबांनी स्वतःचा ट्रक घेण्यासाठी आशीर्वाद दिला. बाबांच्या उत्तम आशीर्वादाने प्राप्त झालेला ट्रक उत्तम अवस्थेत सुरु असून मला जीवनामध्ये स्थैर्य आल्याचे मनःपूर्वक वाटते. बाबांच्या असीम कृपेने आम्ही सर्वजण उत्तम आरोग्यसंपन्न जीवन जगत आहोत.

हे सर्व अर्थातच केवळ साईआशीर्वादाने साध्य झाल्याचे मी मानतो. ●

## बाबांच्या कृपेमुळे कामधंद्याला लागलो!

(प्रा. विश्वनाथ इप्पर, रिसोड अकोला यांच्याकडून):

**श्री** साईबाबांचे श्रद्धा आणि सबुरी हे दोन अमृतरूपी शब्द अतिशय महत्त्वाचे आहेत. श्री साईसत्चरित्र या ग्रंथाचे मुख्य सार या दोन शब्दांत सामावलेले आहे. मला स्वतःला श्रद्धा व सबुरीचे विलक्षण अनुभव आलेले आहेत.

खरोखरच बाबांच्या उपदेशाप्रमाणे आपण जर नेक कामावर श्रद्धा व सबुरी ठेवली तर आपल्याला त्या कामाचे फळ हे मिळतेच! कामाची योजना मनात आखली जात असताना व प्रत्यक्ष काम करीत असताना मन स्थिर व सावधान असलं पाहिजे. बाबांच्या अमृतभरल्या दोन शब्दांना अनुसरून मी वागलो म्हणूनच आज बाबांच्या कृपेने अतिशय आनंदात आहे. मला आज कशाचीच कमी नाही.

१९७७ चं वर्ष होतं. एका मित्रासोबत मी प्रथमच औरंगाबादला इकडे-तिकडे नोकरीच्या शोधात भटकत होतो. त्या मित्राने स्वखर्चाने मला शिरडी दाखविली. त्याआधी मला शिरडी कुठे आहे? साईबाबा कोण आहेत? याची तिळमात्रही कल्पना नव्हती. मी त्यांचा फक्त फोटो बघितला होता. मात्र त्या दिवशी शिरडीतील बाबांचे वैभवशाली मंदिर, तेथील त्यांची समाधी व अतिशय आकर्षक अशी मूर्ती, मन तल्लीन करणारी प्रार्थना हे सारं भव्य-दिव्य पाहून माझ्या आनंदाला पारावार उरला नाही. जीवनात प्रथमच मला मनःशांतीचा लाभ झाला. सर्व जाती-धर्मांचे, पंथाचे, वंशाचे लोक या स्थळी मला एकत्र दिसले. परदेशातील व्यक्तीही मी पाहिल्या. जगाच्या पाठीवर सर्व धर्मांचे आणि त्यातल्या त्यात हिंदू, मुसलमान एकत्र येऊन भक्ती करणारे एकमेव ठिकाण मला फक्त शिरडीतच दिसले. यावरून साईबाबा हे सर्वधर्मसमभावाचे केवढे मोठे प्रतीक आहेत याची आपल्याला साक्ष पटते.

मी प्रथमच जेव्हा शिरडीला गेलो तेव्हा सुशिक्षित बेकार होतो. तेव्हापासून माझी एकूण परिस्थिती अगदी पालटून गेली आहे, माझी व माझ्या कुटुंबाची सर्वच क्षेत्रात प्रगती झाली आहे. आम्ही दर दिवाळीला आणि अधूनमधून बाबांच्या दर्शनाला जात असतो. मला बाबांचे शेकडो अनुभव आले आहेत.

मी जेव्हा जेव्हा बाबांकडे काही मागितले तेव्हा तेव्हा ते मला जास्त विलंब न होता मिळाले आहे. मात्र तशी श्रद्धा असणे जरूरीचे असते. कधीकधी तर मी दर्शनासाठी एवढा आतूर होतो की वाटते, मला पंख फुटून गगनात उंच भरारी मारून साईचरणी जावे; पण हे वास्तवात अशक्य आहे. बाबा मात्र त्यांच्या मनात आले की आपल्याला दर्शनाला बोलावून घेतात. शिरडीला दर्शनाला जावून रिकाम्या हाताने घरी परत गेला असेल असा एकही माणूस सापडणार नाही. गरीब-श्रीमंत, दीन-दुबळे सर्वांकडे बाबा समान दृष्टीने पाहतात. त्यांना तुमच्याकडून हवीय ती केवळ श्रद्धा आणि सबुरी! माझ्या जीवनात शेकडो संकटे आली. त्या त्यावेळी मी बाबांचा धावा केला, त्यांची पवित्र उदी मस्तकाला लावली, तोंडात टाकली; आणि साईसामर्थ्य अनुभवले, माझी संकटे पार नाहीशी झाली. बाबांनी माझ्याप्रमाणेच इतर भक्तांवरही अशीच कृपेची छाया ठेवावी, ही त्यांच्या चरणी प्रार्थना. ●

## बाबा स्वप्नात आले!

(प्रा. वाल्मिक, नाशिक यांच्याकडून):

**मी** साईबाबांचा निस्सीम भक्त नव्हतो. नोव्हेंबर १९८३ मधील ही घटना. मी शिरडीला जात असे, बाबांचे दर्शनही मनोभावे घेत असे; पण ज्याला मनःपूर्वक समर्पण भक्ती म्हणतात, ती माझ्यात त्या काळी असेल, असे वाटत नाही. बाबांप्रती माझा भाव अनन्य व उत्कट नव्हता. प्रातःकाळी देवदेवतांच्या आरत्यांबरोबर बाबांच्या दोन आरत्या मात्र नित्यनेमाने म्हणत असे. मी माझ्या बिऱ्हाडाच्या सर्व सामानासह सटाण्याहून ट्रक भरला आणि नाशिकच्या माझ्या नव्या व स्वतःच्या घरात आणण्यासाठी नोव्हेंबर १९८३ मध्ये निघालो. पत्नी, कन्या व तीनही पुत्र सोबत ट्रकमध्येच होते. सामानाने भरलेल्या ट्रकच्या टपावर ७/८ ओळखीची व काही अनोळखी माणसेही सोबत होती. वडाळीभोईच्या जवळ ट्रक येत असताना पाठीमागून भरधाव येणारा दुसरा ट्रक आमच्या ट्रकवर आदळणार होता म्हणून टपावरील माणसे त्या ट्रकच्या ड्रायव्हरला हाका देत होती; परंतु कुठल्यातरी तंद्रीत असलेल्या त्या ड्रायव्हरने आमच्या ट्रकला धडक देण्याच्या अवस्थेत, त्याचा ट्रक सडकेच्या खाली घेऊन धडक काही इंचावर थांबविली. समोरून येणाऱ्या ट्रकला ओव्हरटेक करून एस्.टी. बसही समोरूनच आमच्या ट्रकवर आदळणार होतीच. म्हणजे पुढून व पाठीमागून मध्येच सापडलेल्या आमच्या सर्व परिवारासह टपावरील माणसांचा चक्काचूर टपावरील माणसांना स्पष्ट दिसत होता. आम्ही परिवारातील सर्वजण ड्रायव्हरशेजारच्या कॅबीनमध्ये बसलेलो असल्याने मागचा ट्रक आम्हाला दिसणे शक्यच नव्हते. पुढचीही एस्.टी. बस काही इंचावरून समोरूनच बाजूला कशीबशी होत पास झाली. थोडक्यातच पुढून व मागून होणारा चक्काचूर परमेश्वराच्या कृपेने झाला नाही.

एकदा रात्री भरझोपेत असताना साईबाबा स्वप्नात आले व म्हणाले, ''तुला तीन-चार वेळा मी वाचविले आहे.'' बस्स! क्षणभर त्यांचे दर्शन घडले. माझ्या टेबलावर अनेक वर्षे त्यांचा बसलेल्या अवस्थेतील, पांढऱ्या दाढीचा व कफनी खांद्याजवळ फाटलेली असा फोटो आहे. त्या फोटोमधीलच त्यांची आकृती माझ्यासमोर साक्षात्

(पृष्ठ क्र. १० वर)

## बाबांवरची अढळ 'श्रद्धा'च यशस्वी करते !

**मी** जयवंत महादेव धर्मीर, चिंचणी, डहाणू, जि. ठाणे येथील रहिवासी असून माझ्या लग्नाला पाच वर्षे होऊन गेली तरी आम्हा दांपत्याच्या पदरी 'मुलबाळ' नव्हते. पुष्कळ उपाय करून पैसा खर्ची केला तरीपण यश काही लाभले नाही.

तो दिवस खरोखर माझ्या भाग्याचा दिवस. माझे भाग्य चांगले म्हणा किंवा नशीब चांगले म्हणा. मी कामावर जात असताना 'साईभक्त' असलेले माझे एक मित्र माझ्या शेजारी येऊन बसले. त्यांच्या हातात 'श्री साईलीला' दीपावली अंक होता. मी सहज वरचेवर वाचण्यासाठी म्हणून त्यांच्याकडे अंक मागितला. तेव्हा ते मित्र म्हणाले, माझा वाचून झाला आहे. तुम्हाला हवा असल्यास घेऊन जा ! नंतर तो अंक मी संपूर्ण वाचला. त्या अंकामध्ये मला अनेक साईभक्तांचे अनुभव वाचावयास मिळाले. हे सर्व साईकृपेने घडल्यामुळे 'साईभक्ती'ची ओढ मनाला लागली व मी 'श्री साईलीला' अंकाचा सभासद होऊन नियमितपणे अंक वाचू लागलो. त्यानंतर मी स्वतः शिरडीला साईदर्शनासाठी गेलो. रात्री साईबाबांच्या मंदिरात बसलो असताना अचानक एका साईभक्ताची ११-१२ महिन्यांची मुलगी माझ्या मांडीवर येऊन बसली. असे हे आपले दयावंत साईबाबा दिलेली वचने खरोखर पाळणारे. साईबाबांच्या अकरा वचनांपैकी एक वचन ''जाणा येथे आहे साहाय्य सर्वांस मागे जे जे त्यास ते ते लाभे॥'' या वचनानुसार साईबाबांचा इशारा मी समजलो.

पुढे साईभक्ती, साईबाबांची नियमित उदी लावणे व वर्षातून एकदा 'साई-दर्शनासाठी' शिरडी येथे जाणे हे सर्व चालूच होते. या व्यतिरिक्त डॉक्टरी उपायही सुरू होते. 'साईभक्ती' लागल्यानंतर एक-दोन वर्षे लोटली व आमचे भाग्य साईकृपेने उजळले. साईबाबांची खरोखर कृपा झाली. माझ्या पत्नीला दिवस गेले. आम्हा दांपत्याला खूप आनंद झाला; परंतु हा आनंद काही फार काळ टिकू शकला नाही. काही दिवसांतच गर्भावस्थेत असताना माझ्या पत्नीला डोळ्यांनी दिसायचे बंद झाले. मी पुष्कळ नाराज झालो. हे जीवन मला नकोसे वाटू लागले.

परंतु साईबाबांवर श्रद्धा असल्यामुळे मन बळकट बनले व पत्नीला उपचारासाठी के.ई.एम्. रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरी तपासामध्ये पत्नीला 'ब्रेन ट्यूमर' असल्याचे निदर्शनास आले. उपाय म्हणून ट्यूमर काढण्यासाठी सहा तासांचे ऑपरेशन करावे लागेल व त्याच्यासाठी 'गर्भपात' अगोदर करावा लागेल, असे डॉक्टरांचे म्हणणे पडले.

पाच वर्षांच्या दीर्घ कालावधीनंतर मिळालेल्या 'फळा'ला आम्ही मुकणार हे समजल्यावर मी तर पूर्ण खचूनच गेलो व मनात देवावर राग केला. रागाच्या भरात साईबाबांना म्हणालो, तुला हिरावूनच न्यायचे होते तर मग आमच्या पदरी हे फळ दिलेच कशाला ? आणि मनाशी निश्चय केला की मरेपर्यंत शिरडीला पाय ठेवायचा नाही व देव मानायचा नाही. परंतु आपण 'साईभक्त' वेडेच नाही का ? बाबांनी आपली कठोर परीक्षा घेतली की आपण रागावतो व निराश होतो. खरोखर, बाबांनीच जर दिले तर बाबा कसे हिरावून नेतील !

दुसऱ्या दिवशी डॉक्टरांचा निर्णय बदलला, गर्भपात न करता ट्यूमरचे ऑपरेशन केले जाईल. ऑपरेशन व्यवस्थित, कुठल्याच प्रकारचा त्रास न होता झाले. काही महिन्यांनी साईकृपेने 'श्रद्धा' जन्माला आली. डॉक्टरी उपाय कितीही असले तरी साईबाबांची कृपा असल्याशिवाय असे कठीण प्रसंग टळूच शकत नाहीत !

आम्ही ठरविल्याप्रमाणे मुलीचे नाव 'श्रद्धा' ठेवले आहे. अशीच सर्व भक्तांवर बाबांची कृपा राहो, ही बाबांच्या चरणी प्रार्थना !

## धन्य धन्य ती द्वारकामाई

धन्य धन्य ती द्वारकामाई।
जिथे नांदती बाबासाई॥
चला जाण्याची करू घाई।
वंदन करू या करू या त्यांचे पायी ॥धृ०॥

निष्ठा सबुरीची गाठ।
पदरी बांधा तिला नीट॥
अंतःकरणी भक्ती हवी।
वंदन करू या करू या त्यांचे पायी ॥
अहंकार दूर सारू।
धैर्य शांतीला जवळ करू॥
साईमाऊली ठेवू हृदयी।
वंदन करू या करू या त्यांचे पायी ॥
बाबासाईंचे वचन।
घेऊ अंगी बाणवून॥
ईश्वर आहे सर्व ठायी।
वंदन करू या करू या त्यांचे पायी ॥
सर्वांभूती देव पाही।
वदले ऐसे बाबासाई॥
शिकवण त्यांची धरू जीवी।
वंदन करू या करू या त्यांचे पायी ॥
म्हणे प्रयाग बाबासाई।
मागणे असे एक पाही।
चरणाजवळी ठाव देई।
वंदन करू या करू या त्यांचे पायी ॥

**—श्रीमती प्रयागबाई पारवे**
बिलोली, नांदेड.

## अविस्मरणीय आत्मा

आत्मा सांगे परमात्म्याला
तुझाच अंश असे मी।
तुलाच बिलगून रहाता रहाता
तूच होईन मी ॥१॥

थेंब सांगे सागराला
तुझाच अंश असे मी।
तुझ्याविना नच जीवन मजला
एकच तू अन् मी ॥२॥

बीज सांगे निज वृक्षाला
जन्म दिला तुज मी।
गर्भाला परि नकोच थारा
प्रेमात वसू आम्ही ॥३॥

साई सांगे निज भक्तांना
विश्वाचा एकच स्वामी।
प्रेमाने त्या हृदयी धरता
जगी न काही कमी ॥४॥

जिवा-शिवाच्या एकतेला
जीवन हेचि नामी।
नित्य स्मरता एकच आत्मा
तोचि येईल कामी ॥५॥

**—श्री. शाम जुवळे**
दादर (प.), मुंबई.

(पृष्ठ क्र. ९ वरून)
उभी होती. वरीलप्रमाणे एकच वाक्य उच्चारून ते अंतर्धान पावले. लगेचच मला जाग आली. डोळे भक्तिभावनेने ओथंबून आले. आठवले.... धुळे कोर्टात काही दुष्टांच्या मारापासून मी बचावलो होतो. आणखीही काही स्वार्थी व लबाडांच्या कारस्थानाने माझा बळी जाणे असेच अवचितपणे परस्परच निवारण झाले होते. रेल्वे-फाटक ओलांडताना असाच दोन-तीन वेळा मी मोटरसायकलवरून भरधाव वेगाच्या रेल्वे-धक्क्यापासून निभावलो होतो. कोणत्या वेळी माझ्या दैवयोगाने बचावलो व कोणकोणत्या वेळी त्या परमपूज्य विभूतीच्या पुण्याईने सहीसलामत राहिलो हे त्या परमपावन साईमाऊलीलाच माहीत !

घरात सौख्य व शांतता असून मन ताळ्यावर आहे. जीवनातील प्रश्न सोडविताना मी परमेश्वरशक्तीला आवाहन करतो. बस्स ! माझ्या हातात एवढेच आहे !!

## बाबांच्या कृपेनं संततीचा लाभ !

(एका साईभक्ताकडून):

**श्री** साईनाथांच्या "आणा येथे आहे साहाय्य सर्वांस मागे जे जे त्यास ते ते लाभे॥" या वचनाची प्रचिती मला अत्यंत रोमांचकारी प्रसंगातून आलेली आहे. आमच्या लग्नाला सहा वर्षे झाली तरी आमच्या घरात पाळणा हलत नव्हता. तशी मी लहानपणापासून गणेशभक्त आहे. लग्न झाल्यावर आम्ही प्रथम शिरडीला गेलो तेव्हापासून माझा ओढा साईभक्तीकडेदेखील लागला.

मूल होण्यासाठी डॉक्टरी उपायांबरोबरच दैवी उपायदेखील चालूच होते. आम्ही उभयता दरवर्षी शिरडीला जातो. मला दिवस राहण्यापूर्वी सतत तीन वर्षे शिरडीला गेल्यानंतर आम्ही ज्या ज्यावेळी समाधीमंदिरात आरतीला जात असू त्या त्यावेळी आरती सुरू झाली की माझ्या डोक्यात, पोटात, पायात भयंकर वेदना होत असत. डोळ्यांसमोर काळोखी येई, चक्कर येई, उभे राहण्याची शक्ती नसे. असा प्रकार आरती संपेपर्यंत चालू असे. नंतर थोडयाच वेळात पूर्वस्थिती येत असे. असं लागोपाठ तीन वर्षं चालू होतं. ज्या ज्यावेळी समाधीमंदिरात मी बाबांसमोर जात असे, त्या त्यावेळी माझे डोळे अश्रूंनी भरलेले असायचे. मी बाबांना कळकळून म्हणायचे,

"बाबा, तुम्ही मला सर्वकाही दिलेत; पण मातृपद अजून लाभले नाही; तेवढे मिळवून द्या! माझ्या पदरात काहीतरी घाला!"

आणि एक दिवस बाबांनी मला माझ्या श्रद्धेचं फळ दिलं. त्याचं असं झालं....

....द्वारकामाईसमोरून सरळ गेल्यानंतर म्हाळसापतीचे घर लागते. त्या रस्त्याने आम्ही जात होतो. ते म्हाळसापतींचे घर असेल हे आम्हाला माहीतच नव्हते. अचानक तिथला फलक आमच्या दृष्टीस पडला. त्यावर लिहिले होते.... येथे साईबाबांच्या अंगावरील अखेरची वस्त्रे दर्शनासाठी आहेत. आम्ही कुतूहलाने त्या घरात गेलो. एका कॉटवर एक ९० वर्षांचे आजोबा बसलेले होते. ते मार्तंडबाबा होत. त्यांनी आदराने आम्हाला आपल्या शेजारी बसवून साईबाबांच्या अंगावरील शेवटची वस्त्रे दाखविली. त्या वस्त्रांवर नम्रतेने मस्तक ठेवून त्यांचे आम्ही दर्शन घेतले. मार्तंडबाबांना आम्ही आमची सर्व हकिकत सांगितली. त्यांनी मला उदी आणि ताईत बांधण्यास दिला आणि साईबाबांच्या मंगलस्नानाचे तीर्थ पाण्यात घालून त्या पाण्याने आम्हा उभयतांस स्नान करण्यास सांगितले. आम्ही बाबांची उदी रोजच पोटात घेत असतो. मार्तंडबाबांनी सुचविलेला उपाय आम्ही मनोभावे केला. आणि वर्षाच्या आतच मला दिवस राहिले! सोमवार, दिनांक ३० सप्टेंबर, १९८५ या दिवशी मला कन्यारत्नाचा लाभ झाला. मला व माझ्या मुलीला जन्मतःच खूप त्रास झाला; पण साईनाथांच्या कृपेनं डॉक्टर वगैरे चांगले मिळाले, सर्व सुरळीत पार पडले. या प्रत्येक घटनेत मला साईनाथच साहाय्य करीत असल्याचा भास होत होता. त्यांचे नाम सतत मुखात होतेच.

आमच्या मुलीचा नामकरणविधि समारंभ आम्ही साईनाथांच्या पुण्यतिथीलाच, म्हणजे दसऱ्याच्या दिवशी केला. साईनाथांवरील श्रद्धेने आमची इच्छा पूर्ण झाली म्हणून तिचे नावदेखील "श्रद्धा" ठेवले. तीही सारखी साईबाबांची उदी मागत असते. तिला नेहमी काही ना काही शारीरिक त्रास होत असतो; पण साईबाबाच तो निभावून नेतात. ●

## हाकेला धावणारे बाबा !

(श्री. संतोष भावल, वैभववाडी, देवगड यांच्याकडून):

**सा**ईंची ज्याच्यावर कृपा झाली तो भक्त फारच नशिबवान म्हटला पाहिजे. कारण एकदा का साईंची आपल्यावर कृपा झाली की त्या माणसाचे जीवन सुरळीत चालणारच! हा साईंवरील आत्मविश्वास आणि श्रद्धा आहे.

खरोखरच मनुष्यजीवन हे इतक्या बारीकसारीक गुंतागुंतीतून जात असते की मनुष्य काही वेळा चक्रावून जातो, भांबावून जातो. बिकट प्रसंगी काय करावे हेच सुचत नाही. परंतु खरोखरच तुम्ही दर दिवशी साईनामाच्या जयघोषात आणि साईनामात जीवन व्यतीत करीत असाल आणि साईंवर दृढ श्रद्धा असेल तर प्रत्येक बारीकसारीक संकटात बाबा स्वतःहून उपाय सुचवतील, हाकेला धावून येतील.

असाच मी एक भरकटत गेलेला मनुष्य होतो. साईभक्तीमुळेच सध्या मी एक सर्वसाधारण चांगला मनुष्य म्हणून सुरळीत जीवन व्यतीत करीत आहे. ही सर्व बाबांचीच कृपा!

बाबांनी म्हटल्याप्रमाणे मला पायाला दोरी बांधून आपल्याकडे खेचून घेतले आहे. त्यासाठी बाबांनी जे जे काही डावपेच आखले त्याला तोड नाही. कारण त्या घडीपासूनच माझ्या उत्कर्षाला सुरुवात झालेली आहे. एका मोठ्या संकटातून बाबांनी मला पूर्णपणे वाचवले आहे. एरव्ही त्यापासून मला कदाचित कायमचे दुःखच भोगत रहावे लागले असते. तो प्रसंग आठवला की त्या गुरुमाऊलीच्या कृपेचे, प्रेमाचे आणि आदराचे डोळ्यांत अश्रू उभे राहतात.

सध्या बाबांच्या कृपेने मी सरकारी सेवेत एका चांगल्या हुद्द्यावर काम करीत आहे. सर्वकाही व्यवस्थित चालले आहे. माझी प्रत्येक गोष्ट ही बाबांच्या नावानेच चालली आहे. संकटसमयी बाबा त्वरित धावून येतात. प्रत्येक दिवशी कुठे ना कुठे हमखास दर्शन देतात. अशा या साईंविषयी अलिकडेच घडलेली गोष्ट....

मी माझी मोटरसायकल घेऊन कोल्हापूरला चाललो होतो. वेळ संध्याकाळची होती. कोल्हापूरला जाता-जाताना वाटेत सायंकाळचे सात वाजले. देवगडहून कोल्हापूरला पोहोचण्यास कमीतकमी पाच तास लागतात. सोबत एक ओळखीचा कंत्राटदार घेतला होता. गाडीचे पुढील शॉक-ॲबसॉर्बर पार निकामी झालेले होते. त्यामुळे गाडी कायम हलायची. गाडीचे चांगले काम करून घेता यावे म्हणून गाडी कोल्हापूरला रेटीत नेत होतो. परंतु शेवटी वाटेतच ७-३० च्या दरम्यान कोल्हापूर २०/२५ कि.मी.वर राहिले असतानाच गाडीचा टायर पंक्चर झाला. आता मात्र खरोखरच आमचे धाबे दणाणले. मनात साईघोष सुरु झाला. देवाला साकडे घातले की देवा साईनाथा, टायरचे पंक्चर काढून मिळू दे आणि खरोखरच चौकशी केल्यावर एक फर्लांगावर एक म्हातारा इसम गावठी पद्धतीने व्हल्कनायझिंग करून देतो असे कळले. तेथे टायर बसवीपर्यंत रात्रीचे ८-०० वाजले. तिथून पुढे प्रवास सुरु केल्यावर गाडी आणखीनच हलायला लागली. माझ्या मनात नाना शंका-कुशंका डोकावू लागल्या. तेव्हा देवाला गाऱ्हाणे घातले की बाबा, या अशा रात्रीच्या वेळी गाडीला काहीएक धोका न होता गाडी व्यवस्थितरीत्या कोल्हापूरपर्यंत पोहोचू दे! आणि अशा कठीण अवस्थेत रात्रीच्या वेळी आम्ही कोल्हापूरला सुखरूप जाऊन पोहोचलो. पुढे चांगला मेस्त्री मिळून गाडीचे कामही व्यवस्थित झाले.

अशी कृपादृष्टी सर्व साईभक्तांवर राहो, हीच श्री साईचरणी प्रार्थना! ●

## प्रभुवर साईनाथ अवतारी

विश्वंभर हे विश्वस्वरूपा –
साईनाथ अवतारी
कशी कळावी लीला तुझी रे –
आम्हास गिरीधारी
प्रभुवर, साईनाथ अवतारी ॥धृ०॥

सूर्यगर्भ जणू तेज वसूचे
धरणीवरती कौतुक नाचे
बालरूप हे शिवशंभूचे –
प्रगटे अवनीवरी ॥१॥

गौरकांती प्रतिबिंब नभाचे
अमृत सांडी नयन प्रभूंचे
दर्शन होता पदकमलाचे –
विपदा पळते दूरी ॥२॥

शुभमंगल ते हास्य मुखावर
सदा प्रफुल्लीत दिसे गुरुवर
ज्ञानालाही अगम्य दुस्तर –
हा भक्तांचा कैवारी ॥३॥

–श्री. गजानन कुलकर्णी
वरची आळी, रत्नागिरी.

(पृष्ठ क्र. ३ वरून)

रूप आहे. या तीन मुखांवाचून अमूर्त व्यक्ततेत येणारच नाहीं, इतकेंच नव्हे, तर अमूर्त जो शिवरूप बिंदू यास परिमाण नाहीं, अथवा रेषारूप प्रकृतीस आकृति नाहीं, तरी त्यांतहीत्रिविधता गृहीत मानणें भाग आहे. (१) मध्य + (२) वर्तुळ मिळून (३) बिंदू मानावा लागतो. रेषेस रुंदी नाहीं, तरी ती रेषा व तिला खालची व वरची कडा अशी ती त्रिविध मानल्यावांचून ती सिद्धच होत नाहीं. याप्रमाणें जीवबिंदूस मायेचें वलय मानावेंच लागतें. कूटस्थ+अविद्या+अविद्येत कूटस्थाचें प्रतिबिंब मिळून जीवबिंदू होतो. त्याचप्रमाणें वृत्तिरेषेस इडा, पिंगला व सुषुम्ना अशा निरनिराळ्या नांवांच्या त्रिधारा मानाव्याच लागतात. अशीं तुझीं त्रिविध दर्शनें होत.

हे मारुते! आम्ही आमचा अंतर्याम दाखवितांना हृदयाकडे बोट करतों. हें जें हृ-द-य तेंहि त्रित्त्वाचेंच वाचक आहे. 'हृ' म्हणजे हरण करणारें-घेणारें हरितत्त्व आहे; 'द' म्हणजे देणें, विसर्ग, नाश करणें (द-द्यति-खण्डयति), हें रूद्रतत्त्व आहे; आणि 'यं' म्हणजे संयमन करणें (य-यच्छति-नियमयति), हें स्थितिदर्शक ब्रह्मातत्त्व आहे. याप्रमाणें ब्रह्मा-विष्णू-महेश हे त्रिदेव मिळून हृदयस्थ अंतर्यामिन् त्रिशिर होतो.

हे हनुमंता! हे तिन्ही देव आपल्याला वररूपानें व गुणरूपानें तुझ्या ठिकाणीं अनुप्रविष्ट आहेत. तूं, लक्ष्मण आणि जानकी यांस प्राणदान देणारा ब्रह्मा, असुरांचे प्राण घेणारा रुद्र आणि सुग्रीव व बिभीषण, यांचे प्राण राखणारा विष्णू (राम), असा आहेस.

हे हनुमंता! (१) अव्ययपुरुष - ज्ञानप्रधान - मनोमय - ज्ञानात्मा - ब्रह्मात्मा, (२) अक्षरपुरुष - क्रियाप्रधान - प्राणमय - कामात्मा - दैवात्मा, (३) आत्माक्षरपुरुष - अर्थप्रधान - वाङ्मय - कर्मात्मा - भूतात्मा याप्रमाणें तुझीं तीन मुखें मानता येतील.

हे बुद्धिमान पुरुषा! तुझ्याच विचाराचे दृष्टीनें पाहतां आत्मरूप राम हे वेदान्तदर्शन, देहरूपकर्ता-दास हें प्राकृतिक सांख्यदर्शन व जीवरूप ईश्वरी अंश हें योगदर्शन, याप्रमाणें तुज अंतर्यामीचें स्वरूप दर्शनत्रयरूप दिसतें. अंतरीं नि:संगता, व्यवहारांत प्रगति-प्रत्यवायांचा प्रतिकार किंवा निरोध आणि यांच्या मध्यस्थ ईश्वरार्पणबुद्धि किंवा दास्यवृति असा तीन मुखांचा तूं अंतर्हनुमान माझ्या हृदयीं प्रकट कधीं होशील बरें?

## चतुर्मुख मज्जातंत्र हनुमान

**मज्जातंत्र-हनुमान** – हे हनुमंता! 'जें पिंडीं तें ब्रह्मांडीं', ही म्हण प्रसिद्धच आहे. ती जर सर्वतोपरी सत्य असेल, तर या ब्रह्मांडांतील जो तूं सुप्रसिद्ध वायुसुत, त्या तुला या पिंडाचे ठिकाणीं कोठें कोठें पहावें बरें! हाच माझा विचार सुरू आहे. हे मारुते! तूं चिरंजिव असून कोठें आहेस, तो मला दिसत नाहींस. समर्थ रामदास म्हणतात कीं, जगीं थोरला देव तो चोरलासे। याप्रमाणें तूंहि प्रचंड देव कोठेंच दिसत नाहींस, हें करें? शरीरशास्त्र, इंद्रियविज्ञान, आकारविज्ञान, पंचीकरण यांपैकीं कोणतें शास्त्र तुझ्या या पिंडांत निर्देश करील? स्वानुभवी संत असेंहि म्हणतात:

देहीं असोनियां देव।
वृथा फिरतो निर्दैव॥१॥
देव आहे अंतर्यामीं।
व्यर्थ हिंडे तीर्थग्रामीं॥२॥

दुधी असतां नवनीत।
नेणे तयाचे मथित॥५॥

तुका सांगे मूढ जना।
देहीं देव कां पाहाना॥६॥

असेंच जर आहे, तर तुला मी बाहेर न शोधतां या शरीररूप पिंडाचे ठिकाणींच शोधतो, तें योग्यच आहे. पण समर्थ म्हणतात कीं,

पिंडासारिखी ब्रह्मांडरचना।
कोण आणितो अनुमाना
ब्रह्मांडीं पदार्थ नाना।
ते पिंडीं कैंचे?॥९।५।२९

तेव्हां याप्रमाणें सारेच बाह्य पदार्थ पिंडाचे ठिकाणीं न सांपडले, तरी पिंडब्रह्मांडींच्या देवता तरी एकच असतील कीं नाहीं? नेत्राच्या ठिकाणीं सूर्यदेवता व नासिकेच्या ठिकाणीं अश्विनीकुमार, याप्रमाणे देवता या शरीराच्या आंत अधिष्ठित नसतील, तर डोळे असूनहि त्यांनी दिसणार नाहीं व नाक असूनहि फुकट जाईल, असें शास्त्र सांगतें व तें अनुभवासहि येतें. मग त्या देवता कशा ओळखाव्या?

समर्थ रामदास पुढें म्हणतात:

स्थूल सूक्ष्म कारण महाकारण।
हे च्यारी पिंडांचे देह जाण।
विराट हिरण्य अव्याकृत
मूळ प्रकृती हे खूण।
ब्रह्मांडींची॥४॥

पिंडीं आहे अंत:करण।
तरी ब्रह्मांडीं विष्णू जाण।
पिंडीं बोलिजेतें मन।
तरी ब्रह्मांडीं चंद्रमा॥५॥

पिंडीं बुद्धि ऐसें बोलिजे।
तरी ब्रह्मांडीं ब्रह्मा ऐसें जाणिजे॥
पिंडीं चित्त ब्रह्मांडीं वोळखिजे।
नारायणु॥७॥

पिंडीं बोलिजे अहंकार।
ब्रह्मांडीं रूद्र हा निर्धार।
ऐसा बोलिला विचार।
शास्त्रांतरीं॥८॥ दा. बो. ९/५

तेव्हां हे महारूद्र हनुमंता! या विचारसरणीप्रमाणें या पिंडाचे म्हणजे मानवशरीराचे ठिकाणीं तुझें स्थूल अथवा सूक्ष्म स्वरूप कोणते? उदाहरणार्थ, अहंकाराचे दृश्य स्वरूप ताठा हे दिसतें. पाठीचा कणा व छाती यांच्यावर माने (गर्दन) च्या ठिकाणीं तो दृश्यरूपांत लक्षणेनें जाणतां येतो. तेंच अहंकाररूप रूद्राचें शरीरांतर्गत स्थान काय?

हे महारूद्र हनुमंता! तूं रूद्राचा अंश आहेस असें म्हणतात; त्या अर्थी त्या रूद्राचें या पिंडाचे ठिकाणीं स्थान कोणते? ते मला अगोदर कळूं दे. ज्याच्या जटाजूटांतून स्वैरगंगा (पृष्ठवंशरज्जू) निघून पृथ्वीवर येते, तो धूर्जटी म्हणजे शिरोगुहेंत शिवरंध्राजवळ राहणारा उष्णीषक काय? शिवरंध्राचा त्रिकोण हेंच रूद्राचें यंत्र काय? प्राणगुहा हेंच त्याचें वसतिस्थान काय? हा मस्तकाच्या पश्चिमेस असलेला उत्कट भावनांचा जो तमोरूप रूद्र त्याचेच परिस्वतंत्र नाडीमंडळ हेंच कल्याणकारी शिवस्वरूप काय? ज्ञानवान मनस्वाधीन मज्जाचक्र व ज्ञाननिरपेक्ष अथवा इच्छानिरपेक्ष स्वतंत्र मज्जाचक्र, मोठा मेंदू व लहान मेंदू; यांपैकीं रूद्ररूप कोणतें?

ऐच्छिक व अनैच्छिक मज्जातंतूंचें उगमस्थान कोणतें ? तें शरीरविज्ञान व इंद्रियविज्ञान या उपनेत्रांतून निश्चित आणि स्पष्ट दिसत नाहीं.

श्रीसमर्थ रामदास म्हणतात :

जाणीव म्हणजे अंत:करण।
अंत:करण विष्णूचा अंश जाण।
विष्णू करितो पाळण।
येणेंप्रकारें ॥२६॥

नेणता प्राणी संहारतो॥
नेणीव तमोगुण बोलिजेतो।
तमोगुणें रुद्र संहारितो।
येणेंप्रकारें॥२७॥ दा. बो. १०/१

तेव्हां ज्ञानसुप्त अशी जी मस्तकाच्या पृष्ठभागीं असलेली भ्रमरगुंफा, तेंच या पिंडांतर्गत रुद्राचें लिंग काय ? गळ्यांत मज्जाग्रंथीरूप रुंडमाळा घालणारा तोच रुद्र काय ? अथवा गळ्यांत अनेक नाडीरूप सर्पवलये धारण करणारे रुद्र तो तोच ? कानशिलावरून व गालावरून गेलेलें जे नाडीत्रय तेच रुद्राचें धनुष्यबाण काय ? उष्णीषकाची जी अर्धजागृत स्थिति तीच रुद्राची तंद्रा काय ? तसेंच मस्तिष्काग्र असलेलें अथवा मस्तिष्कजवनिकेंत असलेलें जें ब्रह्मवारी (मज्जारस), तोच सोम काय ? ढगांत लपलेल्या शीतल व प्रकाशक चंद्राप्रमाणें मस्तिष्कांतील गुहांतून असलेलें मूर्धाविवरजल म्हणजेच या पिंडांतील शिवशिरोभूषण चंद्र काय ! किंवा मस्तिष्कांतील संज्ञाधिष्ठान म्हणजे चंद्र म्हणावा ! कामीजनांना उन्मत्त करणारा सोम किंवा चंद्र कोणता ? ज्याच्या अतिसेवनानें तोल जातो व ज्यांचें परिमित सेवन अमृतरूप होतें, असा तो पिंडांतर्गत सोम म्हणजे मूर्धागर्भविवरजलच नव्हे काय ?

हे महारुद्रा ! याप्रमाणें लिंगाकार, नरकपाल, सर्पवलयें, सोम, जटाजूट, रुंडमाला, चापबाण व गत्यात्मक परिणामी संहारक्रिया, ह्या लक्षणांवरून पिंडांतील रुद्राचें स्वयंभू स्थान पश्चिममस्तक हें जसें सिद्ध होतें; त्याचप्रमाणें यज्ञस्वरूप विष्णूचें हृदय हेंच स्थान शोभतें. तेथें रुधिराची अखंड आहुति सुरूच आहे. पण गति आणि आगति, संकोच आणि विकास, केंद्रत्यागी आणि केंद्राभिगामी, ऐच्छिक आणि अनैच्छिक, प्रबुद्ध आणि अप्रबुद्ध अशा या विरोधी द्वंद्वांचा तोल संभाळणारी स्थितिस्थापक ब्रह्मदेवाची जागा कोणती ? श्रीसमर्थ स्मरण-विस्मरणरूप जी बुद्धि तेंच ब्रह्मदेवाचें स्वरूप सांगतात. तेव्हां ब्रह्मरंध्र हें नांव ज्याच्यामुळें पडलें, कपाळावरील ब्रह्मलिखितावरून तो ज्या कपाळाशेजारींच असावा असें वाटतें, तो टाळू व कपाळ यांस लागून असलेला मुख्य मेंदू म्हणजेच ब्रह्मदेव काय ? दशेंद्रियांना ज्ञानदाता व वेदवेत्ता ब्रह्मदेव म्हणजे मुख्य मेंदूच वाटतो. तेंच बुद्धिचें, इच्छेचें, वासनेचें आणि म्हणून सर्जनक्रियेचें स्थान दिसतें. मानवाचें महत्त्व त्याच मेंदूंत आहे.

तात्पर्य, भ्रमरगुंफा आणि शतदल हीच रुद्र आणि शिव तनु, सहस्त्रदल कमल हें ब्रह्मदेवाचें अधिष्ठान, आणि हृदय अथवा त्या हृदयांतील चतुर्व्यूहाचे नियंत्रण करणारे सुषुम्नाशीर्षक हेंच शेषशाही विष्णूचें स्थान, असें मानतां येईल. कारण त्याचा क्षीरसमुद्र म्हणजे आकाश किंवा विवर, नाभिकमल म्हणजे नाडीचक्र व शेष म्हणजे भुजंगीनाडी (सुषुम्ना), असें मी अनुमान करतों.

हे मारुते ! याप्रमाणें ब्रह्मा-विष्णु-महेश या त्रिदेवांचें सामान्य स्थान म्हणजे मस्तिष्क असें मानल्यावर, तुझें स्वरूप तें कोणतें ? असा सहजच प्रश्न येतो हे वरदपुरुषा ! मूलाधारचक्रापासून तों सहस्त्रारचक्रापर्यंत ज्ञान-इच्छा क्रियांची जी जीवेशसत्ता निरनिराळ्या देवतांच्या रूपांनी या पिंडांचें ठिकाणी नांदत आहे, त्या सर्व सत्तांचे अंश सर्व देवांनीं तुला बालपणींच समर्पित केलेले आहेत. आरंभीं तुला त्यांचें भान नव्हतें, इतकेंच.

हे हनुमंता ! हा मानवी पिंड जन्मास येतो, तेव्हां त्यालाहि या सर्व देवतांच्या ज्ञान-इच्छा-क्रियात्मक शक्तिप्राप्त असून त्याला त्यांचे मुळींच भान नसतें. कांहीं अनैच्छिक क्रिया अल्परूपांत या पिंडाचे ठिकाणी बालपणीं होत असतात. पण ऐच्छिक क्रिया बुद्धिपुर:स्सर व ज्ञानेच्छापूर्वक घडून येण्यास प्रौढावस्थाच यावी लागते. आणि अशी प्रौढावस्था प्राप्त झाली, तरी पिंडांतर्गत सान्याच सुप्त संस्कारांचें, भावनांचें व अनैच्छिक स्वरूपाच्या क्रियांचे सामान्यत: ज्ञान होतच नाहीं. तेव्हां सर्व अंतर्बाह्य क्रियांच्या संबंधी पूर्ण जागृति, हेंच तुझें पिंडांतर्गत पूर्ण प्रबुद्ध असें स्वरूप मानावें काय ? पिंडांतर्गत गतीना स्वैर स्वातंत्र्य न देतां सर्व क्रिया आपल्या ज्ञानांच्या इच्छेच्या आधीन ठेवणें, हेंच मनोजव, जितेंद्रिय व बुद्धिवानांत परमश्रेष्ठ अशा तुझें पिंडांतर्गत रूप मानावें काय ? पूर्वी सांगितल्याप्रमाणें या पिंडांतील गति, आगति, बोधनसा, कार्यनसा, ऐच्छिक आणि अनैच्छिक नाड्या, उर्ध्वगामी आणि अधोगामी मज्जातंतू इत्यादि विरोधी द्वंद्वांचा तोल संभाळणारी अथवा निरोध करणारी, अशी तुझी स्थितिस्थापक चतुर्मुख मूर्ति मानावी काय ? मानवाच्या सर्व शक्तींचा विधि व जीवनाचा विधि तो तूंच काय ?

हे हनुमंता ! मी असें ऐकतों कीं, माहोळास तुझी चतुर्मुख मूर्ति आहे. त्या चार मुखांचें रहस्य काय बरें असेल ! भ्रमर-गुंफा, शतदलकमल, सुषुम्नाशीर्षक आणि सहस्त्रदलकमल, हींच तीं तुझीं चार मुखें काय ? किंवा कर्मेंद्रियें, ज्ञानेंद्रियें, मन आणि बुद्धि हीं तुझीं चार मुखें ! किंवा आलम्बन, निमित्त, उपादान आणि कार्य हीं तुझीं चार मुखें; अथवा उत्पत्ति स्थिति लयात्मक ब्रह्मा, विष्णू, महेश आणि अग्नीषोमात्मक शरीर हीं तुझी चार मुखें ? पंचमुखी शंकराचा तूं चतुर्मुख अवतार तो असाच काय ?

हे वायुनंदना ! तूं जसा रुद्राचा अंश, तसाच वायूचा पुत्र म्हणून प्रसिद्ध आहेस.

श्रीसमर्थ रामदास म्हणतात :

आकाश जैसें निराकार।
तैसा ब्रह्माचा विचार।
तेथें वायोचा विकार।
मूळमाया॥९/६/१

फुकिल्यासरसा वायो गेला।
तेथें वायोसुत निर्माण झाला।
म्हणोन वायोरूप वासनेला।
जन्म आहे॥८॥

वायो स्तब्धरूपें सृष्टिधर्ता।
वायो चंचलरूपें सृष्टिकर्ता।
नकळे तरी विचारीं प्रवर्ता।
म्हणिजे कळे॥२४॥

मुळापासून सेवटवरी।
वायोचि सकळ कांहीं करी।
वायोवेगळें कर्तृत्व चतुरीं।

मन निरोपावें॥२५॥दा.बो. ९/८

पुढें समर्थ म्हणतात:

हनुमंत वायोचा प्रसीध।
पितापुत्रांसी नाहीं भेद॥
म्हणोनि दोघंहि अभेद।
पुरुषार्थविषीं॥दा.बो. १६/६/२५॥

वायोपासून पैलीकडे।
जो कोणी विवेकें पवाडे।
जवळीच आत्मा सांपडे।
तया पुरुषासी॥दा.बो. १७/३/१६॥

हे हनुमंता! वायु हें परब्रह्माचें शबलरूप आहे. सारें पिंडब्रह्मांड गत्यात्मक आहे. आणि वायु हाच गतिप्रेरक आहे. या पिंडांतर्गत साऱ्या स्थूलसूक्ष्म क्रियांचा प्रवर्तक तोच आहे. वायू हे ज्याअर्थी परब्रह्माचें शबलरूप आहे व पार्थीव जड पदार्थाहून तो श्रेष्ठ आहे; त्याअर्थी पृथ्वी व स्वर्ग यांच्या मध्यवर्ती अंतरिक्षांतच त्यांचे स्थान मानावें लागतें, ह्यास्तव या मानवी पिंडाच्या दृष्टिनें नाकाच्या मार्गें, मस्तिष्काचे खालीं व फुप्फुसांच्या वर वायूचें स्थान असेल काय? हा रुद्रीय मरुत् ज्ञानाग्नि चेतविणारा व शरीरांतर्गत पूर्ण जागृत आणि अर्धजागृत प्रेरणांचा व संदेशांचा वाहक व इंद्रियदेवतांचा सेनानी नव्हे काय?

हे मारुते! तूं ज्याचा औरस पुत्र आहेस, त्या वायूचा महिमा आयुर्वेदांतहि फार वर्णिला आहे. सुश्रुतांत म्हटलें आहे कीं, वायू हा स्वयंभू आहे. कारण तो स्वतंत्र आहे. त्याच्या अस्तित्वावर प्राण्यांचें जीवित अवलंबून असल्यामुळें तो शरीरांत नित्य असतो. तो सर्वगामी आहे. तो सर्वशारीरिक तत्त्वांचा जीवन आहे. सर्वांची उत्पत्ति, स्थिति व विनाश करणारा तो आहे. त्याच्या ठिकाणच्या वीर्याबद्दल कल्पनासुद्धां करता येत नाहीं. सर्व दोषांना इकडून तिकडे नेणारा तोच आहे. त्याची गति फार तीव्र आहे व तो फार चंचल आहे. शरीरांतील सर्व क्रिया वातामुळें होतात. म्हणून त्यास प्राणांचा प्राण व सर्व शक्तींचें मूळ म्हटलें आहे. आर्यवैद्यकानें मेंदू हाच वातशक्तीचा सांठा मानला आहे. तसेंच सारा मज्जाव्यूह म्हणजे आर्यवैद्यकाप्रमाणें वातचक्रच आहे.

हे वायुसुता! याप्रमाणें या मानवी पिंडांतील वायुचा केन्द्र आणि संचार निश्चित कळल्यावर आतां तुझें स्वरूप कोणतें ते निश्चित करणें फारच सोपे आहे. हे मारुते! तुझा जन्म मेरू पर्वतावर झाला, असें प्रसिद्ध आहे. त्याचप्रमाणें या मानवी पिंडांतील मेरुहि प्रसिद्धच आहे. ज्याला तेहतीस देवरूप पर्व (मणके) आहेत, तोच पर्वांचा पर्वत म्हणजे पाठीचा मुख्य आधारस्तंभ मेरू असेंच मी शास्त्रानुसार समजतों. या मेरू पर्वतावर तुझा जन्म झाला आहे. किंवा ज्याला अंतरिक्षलोक म्हणून म्हणतात. तोच पामीर मेरू तुझा जन्मप्रांत असेल. किंवा जेथें पम्पा सरोवर आहे व ऋष्यमूकादि पर्वत आहेत व जेथें जवळच रामाचें जनस्थान आहे, तोच चवथ्या विवराजवळचा उंच-सखल सुषुम्नशीर्षक भाग हेंच तुझें निश्चित जन्मस्थान असेल. या पिंडाच्या ग्रीवास्थानचा राजा तोच सुग्रीव असावा.

हे हनुमंता! तुझ्याच सान्निध्यामुळें या पिंडांतील जवळच्या भागास हनुकन्त, हनुमुण्ड, हनुकूटम, हनुकोण, अधोर्ध्व, हन्वस्थि इत्यादि नांवें पडली असावींत. अहल्याजार इंद्रास्था अध:पतन (अवतरण) रूप अथवा अव्यवस्थित संचाररूप जो वाली, त्याचें महत्त्वाचें वधस्थान हेंच असावें.

हे हनुमंता! मेरूवरच सर्व देव असून त्यांत सर्वांत खालच्या त्रिकास्थीजवळील मूलाधारचक्रावर विराजमान असणारा पहिला मरुत् (अ) काररूप गणेश होय, असेंच शास्त्र सांगतें. तसाच सर्वांत वरचा ४९वा (ह) काररूप तूं मारुति सुषुम्नाशीर्षरूप विष्णूस्वरूप रामाजवळच असावास, हेंच योग्य ठरतें. हें जें नर-वानरांचे मुख, तेंच ऋष्यमुख होय, तेंच तुझें प्रियस्थान खरें, येथेंच तूं हंकाररूप अजपाजपानें प्रगट होतोस. म्हणूनच रुद्ररूप अहंकाराचा तुला अंश मानलें आहे. तसेंच याच कारणास्तव तूं वायुसुत म्हणून प्रसिद्ध आहेस, असें वाटतें.

हे हनुमंता! अध्यात्मदृष्टीनें नवद्वाराची अयोध्या नगरी म्हणजे हें शरीरच होय. त्याचप्रमाणें दुसऱ्या दृष्टीनें तूं देह (बुद्धि) रूप लंका जाळलीस ती रावणाची लंका हीच. अनुत्रिकास्थीस किकसा असें म्हणतात. किकसापासून (कॉसिक्स) रावणाची आई कैकसी हे नांव सिद्ध झालें. यावरूनहि पिंडांतर्गत रावणाची कल्पना होईल. दशप्राणांचा अभिमानी जो दशग्रीव रावण, तें शिवाच्या घोरतनूचेंच एक रूप आहे असें दिसतें. अहल्याजार इंद्राचें अध:पतन जसें वालींत आढळतें, तसेंच रुद्राचें घोर स्वरूप रावणरूप अहंकारांत आढळते. फार काय, या पिंडांतर्गत मस्तिष्काचा नकाशा पाहिला तर यांत जांबवानाचें विवर, सेतु व सीता अशींहि रूपें आढळतात. अर्थात तुझी कार्यभूमीहि येथेंच दिसते.

हे मारुते! या माझ्या सीतारामासंबंधीच्या अनुमानांत किंचित् शब्दच्छल किंवा विद्याविनोद होत आहे असें कोणी म्हणेल, तर तें मीहि नाकबूल करणार नाहीं. पण सीतेचा जन्म यज्ञभूमि नांगरतांना पडलेल्या चरांतून झाला आहे, यामुळें या मेंदूतील परिखांना सीता हे नांव योग्यच आहे. पण याहीपेक्षां सीतेचे समग्रचरित्र म्हणजे दूर्निवार दैवरेषेचेंच प्रदर्शन नव्हे काय? अशोकवनांतील सीता राक्षसींच्या छळाला वैतागून म्हणते: ''माझ्या हातून जन्मांतरीं कसलें बरें महापातक घडलें आहे!'' पुढे विधुज्जिव्ह राक्षसाकरवीं रावणानें मायेच्या योगानें रामाचें खोटेंच तुटलेलें मस्तक सीतेपुढें आणून टाकलें, तेव्हांहि सीता म्हणते कीं, ''खरोखर, पूर्वजन्मीं मी कांहीं एक उत्कृष्ट दान केलें नाहीं. त्यामुळें सर्वांचें आतिथ्य करणाऱ्या रामाची भार्या असूनहि मला आजच शोक करण्याची पाळी आली आहे!'' त्याचप्रमाणें हनुमान युद्ध संपल्यावर सीतेस बोलावण्यास गेल्यावेळीं तो 'जवळच्या राक्षसींस मारून टाकूं काय?' असें म्हणाला, तेव्हांहि कपाळाला हात लावून सीता हेंच म्हणाली कीं, 'दुर्दैवामुळें आणि पूर्वसंचित पातकामुळें मला हे सर्व प्राप्त होत आहे! हा दैवाचाच चमत्कारिक खेळ आहे!' यानंतर रामानें सीतेचा त्याग केला, त्यावेळीं ती हेंच म्हणते!

याप्रमाणें सीतेच्या जन्मापासून तों निर्याणापर्यंत दैवरेषा! ''दैवं हि दुरतिक्रमं!'' हेंच सीतेच्या चरित्राचें लक्षण आहे. अर्थात् तीच गोष्ट रामासंबंधींहि खरी ठरते. तेव्हां मेंदूवरील परिखा म्हणजे कपाळाच्या दुर्निवार दैवरेषाच होत, तेंच सीतारामाचे ईशनियत स्वरूप आहे. ब्रह्मलिखित म्हणजे ब्रह्मदेवानें

कोरलेलें तें तेंच, असें म्हणणें वावगें होणार नाहीं. तात्पर्य, हनुमंता! तुझें चरित्र ज्यांत निगडित आहे, तें रामचरित्रसार या शिरोगुहेंत प्रदर्शित होत आहे. तसेंच रामास व तुला वाल्मीकीनें त्रिविक्रम म्हणजे पावलांच्या तीन टप्प्यांत पृथ्वीचें आक्रमण करणारा असें ठिकठिकाणीं म्हटलें आहे, ती तुझी त्रिविक्रम गतीहि या पृष्ठवंशमार्गावरील तुझ्या पदचिन्हांकित कमळांवरून शीघ्र गेलेली दिसतच आहे. याप्रमाणें मानवपिण्डाचे ठिकाणींच तुझ्या स्वरूपाचें व जन्म-कर्माचें साधार अनुमान करतां येतें.

हे रामदूता! रामापासून सीतेकडे व सीतेपासून रामाकडे, सुग्रीवापासून रामाकडे व रामापासून उलट सुग्रीवाकडे, रामापासून भरताकडे व भरताकडून उलट रामाकडे, लंकेंतील त्रिकूटाचलाकडून संजीवनी आणण्याकरतां हिमाचलाकडे व तेथून परत त्रिकूटाचलाकडे, याप्रमाणेंच पिंडांतर्गत हे वायुनंदना! तुझा मज्जाभिगामी व उन्दामी बाहेरून ज्ञानकेंद्राकडे व केंद्राकडून बाहेर – असा सतत संचार सुरूच आहे. हे रामदूता! तुझें जवळ जवळ स्वरूपलक्षणच हें नव्हे का?

हे हनुमंता! कोणी कोणी मस्तिष्क हाच पिंडान्तर्गत इंद्र मानतात. पण प्रत्येक मरुताचे ठिकाणीं तीन भाग वायूचे व एक भाग इंद्राचें असें मानतात. याप्रमाणें तुझ्या चतुर्मुखांत एक भाग इंद्राचा मानणेंहि योग्यच दिसतें. शिवाय इंद्र म्हणजेच पुराणोक्त शिव होय, असें शास्त्र सांगत असल्यामुळें हे महारुद्रा! तुझ्यासंबंधी मीं केलेली कल्पना अयुक्त ठरत नाहीं. इंद्राला मरूत्वान असें म्हणतात व "मरुतोरुद्रपुत्रास:" असेंहि शास्त्रवचन आहे. इंद्र आणि रुद्र हे दोन्ही गतिवाचकच शब्द आहेत. कोणी कोणी ते विद्युच्छक्तिवाचक मानतात. कांहीं असो. मतितार्थ एकच आहे. गति हें विद्युत्‌चें लक्षण आहे.

हे शक्तिमंता! याप्रमाणें शरीरविज्ञान व इंद्रियविज्ञान हे उपनेत्र लावले असतां असें दिसतें कीं, गति, आगति आणि स्थिति अथवा रुद्राणी, नारायणी व ब्रह्माणी अशा तिन्ही शक्ति तुझ्या ठिकाणींच दिसत आहेत. त्यामुळें तूं शक्तिमान म्हणजेच जीवाचा पुरुषार्थ होस, असें म्हणावेंसें वाटतें, म्हणूनच समर्थ म्हणतात त्याप्रमाणें, आत्माराम हा तुझ्यापासून जवळच असून तूंच त्याची वाट दाखविणारा अंतर्यामिन् देव आहेस. तूंच साधकांचा चतुर्विध वेदविधि असून सहस्त्रदलकमल, शतदलकमल, उष्णीषक व सुषुम्नाशीर्ष हींच तुझीं चार मुखें होत असें वाटतें. या मुखाप्रमाणें तुझा केंसाळ करडा रंग, तुझें द्वियुम्मरूप तीक्ष्ण डोळे. सव्यसाची प्राणदा नाडीरूप तुझे मर्मज्ञ, प्रतापी बाहू, इडा व पिंगळारूप तुझे लांब पाय, अनुत्रिकास्थीपर्यंत गुंडाळलेले सुषुम्नारूप तुझें दिव्य पुच्छ, अशी तुझी (मोहोळाची) चतुर्मुख मूर्ति या शरीररूप मोहोळांत स्थित आहे. सोऽहं हा त्याच भ्रमरगुंफारूप मूर्तीचा भ्रमर-गुंजारव अथवा मधुर नादध्वनि ऐकूं येत आहे. हे हनुमंता! श्री रमणमहर्षि आध्यात्मिक हृदय उजवे बाजूस आहे, असें म्हणतात. तरी हे शाखामृगा! प्राणदा नाडीची सव्य शाखा, हें तुझें आवडतें निवासस्थान आहे काय?

अथवा हे हनुमंता! (१) सहस्त्रदलकमल, (२) शतदलकमल, (३) उष्णीषक व (४) सुषुम्नाशीर्ष हींच आत्मा, जीव, मन आणि अहंकार यांचीं स्थाने असून यांचा चतुर्व्यूह तोच तूं, असें कां मानूं नये! हे माझें तुझ्यासंबंधीं अनुमान तुझ्याच अवतारूप समर्थ रामदासांनाहि पटेल असें वाटतें. हे अनुमान जर यथार्थ असेल तर माझ्या बौद्धिक आणि अबौद्धिक ऐच्छिक आणि अनैच्छिक साऱ्या क्रियांचा कर्ता करविता तूंच प्राण-मनरूप आहेस, अशीच धारणा ठेवण्यास काय हरकत आहे.

हे हनुमंता! याप्रमाणें पिंडांतर्गत मुख्य प्रेरक अशा मज्जातंत्राशी तुझें तादात्म्य जोडण्यांतील माझा भाव तुझ्या पुरा लक्षांत कदाचित् येणार नाहीं, असें म्हणण्याचें मी साहस करितों. कारण, तुम्हां देवांना आमचें दुःख आणि अडचणी कितपत जाणवत असतील, याची शंका वाटते. नाहींतर, त्याची जाणीव असूनहि तुम्ही आमचेवर इतके निष्ठुर कसें व्हाल?

हे महारुद्रा! अंतर्मुखवृत्तीनें विचार करणाऱ्या व अपयशानें निराश व उदासीन झालेल्या साधकास "पापोऽहं पापकर्माह पापात्मा पापसंभव:" अशी तीव्र जाणीव कधीं कधीं उत्पन्न होत असते, मग तो, "करचरणकृतं वा कायजं कर्मजं वा श्रवणनयनजं वा मानसंवापराधम्॥ विहितमविहितं वा सर्वमेतत्क्षमस्व जयजय करूणाब्धे श्रीमहादेव शंभो॥" अशी तुमची प्रार्थना करितो. पण याप्रमाणें तुम्ही क्षमा करतां कीं नाहीं? व करावी कीं नाहीं? व करावी तरी कां? अशा शंका त्याच्या मनांत राहतातच. शिवाय, अशी ही पापमयत्वाची भावना सतत करीत राहणें, हें जीवोन्नतीस कितपत उपकारक होईल, याची शंकाच वाटते. स्वामी विवेकानंदांसारखे प्रभावी थोर पुरुष या भावनेचा अत्यंत जोरानें धिक्कारच करितात पण, 'मी पापी आहें', ह्या प्रामाणिक आत्मप्रत्ययांतून मोकळे कसें व्हावें? आणि शरीराकडून व त्याहीपेक्षा मनाकडून होणारी सूक्ष्म पापें अत्यंत दुर्निवार आहेत, असाच साधकास प्रयत्नांतीहि जेव्हां खडतर अनुभव येतो, तेव्हां त्यानें करावें तरी काय? असा प्रश्न उरतो व त्याने साधक त्रस्त व उद्विग्न होतो!

हे हनुमंता! रावणाच्या पानभूमिंतील अथवा शृंगारमंदिरांतील एकान्तात अर्धवट विवस्त्र होऊन निजलेल्या सुंदर व तरुण स्त्रीयांकडे पहात असतां आपल्या शरीराकडून पाप न झालें, तरी मनाकडून तर होणार नाहीं ना? हा धाक तुलाहि वाटत होता. मग सामान्य साधकांच्या शरीरावर व मनावर या आपातरमणीय विषयांच्या अथवा सुखदुःखात्मक संसाराच्या आघातापासून होणाऱ्या अनिवार परिणामांबद्दल त्यांस केवढा बरें धोका वाटला पाहिजे!

हे हनुमंता! सीताशुद्धीच्या निमित्तानें रावणाच्या अंतगृहांत रात्रीं संचार करण्याच्या वेळच्या तुज स्थितप्रज्ञाच्या अंत:स्थितिचें नाथांनीं मोठे मार्मिक वर्णन केलें आहे. ते म्हणतात:

मन मावळतांचि पाहीं।
मी देहींच जालों विदेही।
आतां नग्न स्त्रीयांच्या ठायीं।
शोधीन वैदेही विदेहत्वें॥५४॥

नग्न देखतां सूकर श्वान।
पुरुषास नव्हे काम कामन।
तेंवी देखतां स्त्रीपुरुष मैथुन।
बाधकपण मज नाहीं॥५॥

शस्त्र घालितां दळा आंत।
पुरुष नव्हे कामासक्त।
तेंवी रिघला योनी आंत।
काम कामार्थ मज नाहीं॥५६॥

इतकेंच काय, श्री रामकृष्ण परमहंसांसारख्या आदर्शभूत आधुनिक संतांचा तंत्रसाधनाचा अभ्यास सुरू असतां, तरूण सुस्वरूप अशा नग्न स्त्रीच्या मांडीवर बसून त्यांनीं मंत्रजपाचें साधन केलें! याहिपुढें जाऊन ते लावण्यसंपन्न तरूण प्रणयी युगुलांचें मैथुन मुद्दाम प्रत्यक्ष अगदीं सान्निध बसून पाहात, तेव्हां त्या दांपत्याच्या विषयसुखाकडे दिव्यदृष्टीनें पाहून श्री रामकृष्णांचें मन यत्किंचितहि विकारवश न होतां, उलट त्यांची भाव-समाधि लागे!

हे हनुमंता! याप्रमाणें तुझ्यासारखे देव व श्री शुक्राचार्य व श्री रामकृष्ण परमहंस असे परमविरक्त साधु, हे केवळ अपवादभूत आदर्श होत. बाकीच्या अनेक देवांच्या, ऋषींच्या व साधूंच्या ठिकाणींहि ही सहज व निस्सीम अशी विरक्ति आढळत नाहीं. फार कशाला, तूं ज्या शिवाचा अवतार, त्या शिवाचें भिल्लीणीलाच पाहून नव्हे, तर गजमैथुन व वानरमैथुन पाहूनहि शिवाचें मन कामवश झालें व त्यांतूनच पुढें गजमुख व तूं वानरमुख यांचा जन्म झाला. तसेंच मोहिनी म्हणजे साक्षात् विष्णू; हें ठाऊक असूनहि शिवाचें रेतस्स्खलन पावलें! तीच स्थिती वायुची! तीच विकारवशता ब्रह्मदेवाची व इंद्रादि देवांची! विश्वामित्र-पराशरांसारख्या परमतपस्वी ऋषींनाहि या एडक्या मदनानें घायाळ केलें आहे! वसिष्ठानें योगवसिष्ठांत मुमुक्षु प्रकरणांत केलेली स्त्रीविषयक निंदा जशी ठळक व कठोर आहे, तशीच त्यांस दोन बायका होत्या व त्यांस शंभर पुत्र झाले होते, हेंहि कठोर सत्य आहे!

स्वामी विवेकानंदासारख्या श्री रामकृष्णांच्या अत्यंत विरक्त अशा बालब्रह्मचारी अवतारी चेल्यासहि या देहधर्मानें किंचित्कालतरी बेचैन केल्यावांचून सोडलें नाहीं. मग साक्षात् जळत्या निखाऱ्यांवर बसून त्यांनीं आपल्या दुर्निवार इंद्रियांस घोर प्रायश्चित् दिले! ती गोष्ट निराळी. जी गोष्ट स्त्रीकामाची तीच थोडयाफार फरकानें इतर विषयांची आहे. कामिनी, कांचन आणि माध्यान्ह कालाची क्षुधा यासाठीं जगांत निरंतर तळमळ व चळवळ सुरू आहे. तात्पर्य, इंद्रियांस आकर्षित करणें हा विषयांचा धर्म दुर्निवारच आहे.

अशा दैवदुर्विलासाच्या दुर्निवार परिस्थितींत आपण आपल्या कर्मेंद्रियांच्या बाह्यक्रियांवर ताबा ठेवूं शकूं, असा जरी भ्रमात्मक विश्वास साधकानें क्वचित् बाळगला, तरी पिंडांतर्गत मुख्य प्रेरक अशा मज्ञातंत्रावर व मनावर ताबा ठेवणें किती दुष्कर आहे. याची जाणीव आम्हां दुर्बल साधकांना जितकी असते, तशी तुज अत्यंत विरक्त अशा मूर्तिमंत ब्रह्मचर्यरूपाला असणें अशक्यच वाटतें. अशा भोळ्या-बापड्या, दीन-दुर्बल, विषयी-पामरांची पापापासून मुक्तता करण्याकरितां भागवत धर्मानें मनोलयापेक्षां अथवा विवेकानें होणाऱ्या अन्यथाभासरूप शत्रूच्या नाशापेक्षां तारतम्यानें बराच सोपा असा उपाय सुचविला आहे कीं,

यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत्।
यत्तपस्यसि कौंतेय तत्कुरुष्व मदर्पणम्॥गीता ९/२७

अथवा– कायेन वाचा मनसेन्द्रियैर्वा बुद्ध्यात्मना वाऽनुसृतःस्वभावात्। करोतिनि यद्यत्सकलं परस्मै नारायणायेति समर्पयेत्तत्॥ भा. ११/२/३६

या उपायांचा अवलंब भक्तिपूर्वक करणारा जीव केव्हांहि मार्गभ्रष्ट होण्याची भीती नसते. तो धांवत असला किंवा डोळे मिटून चालत असला, तरी तो ठेंचाळेल किंवा पडेल, अशी मुळींच भीती बाळगावयास नको, असा भागवतधर्म भरंवसा देतो. यास्तव या पिंडांतर्गत साऱ्या मज्ञातंत्ररूप अंतःप्रेरक कर्ता सवरता, जीवाचें भवितव्यकारक, असा तूंच आहेस, असें इंद्रियविज्ञानशास्त्राच्या प्रणालीनें चिंतन करून, मी समस्त शारीरिक व मानसिक पापाच्या धाकांतून पुण्याच्या अभिनिवेशबंधांतून मोकळा होऊं पाहात आहें. याहून मला दुसरा तरणोपायच दिसत नाहीं. यासाठींच थोर शिवभक्त म्हणत आले कीं :

आत्मा त्वं गिरिजापतिः
सहचराः प्राणाः शरीरगृहं।
पूजा ते विषयोप भोगरचना
निद्रा समाधि स्थितिः।
संचारः पदयोः प्रदक्षणविधिः
स्तोत्राणि सर्वागिरः।
यद्यत्कर्म करोमि तत्तदखिलं
शंभो तवाराधनम्॥१।

तेंच मी तुज शिवरूपास म्हणतों आहें.

(१) यानास्थाय नरो
राजन्नप्रमाद्येत कर्हिचित्
धावन्निमील्य वा नेत्रे
न स्खलेन्नपतेदिह॥भा. ११/२/३५
आपणा सकट सर्व देहीं।
भक्ता भगवंता वांचूनि नाहीं॥
यालागीं शांति त्याचे ठायीं।
स्वानंदे पाहीं निःशंक नांदे॥

## पंचमुखी हनुमान

ध्यायेद्वानर नारसिंह खरागट क्रोडशश्ववक्त्रंस्फुटं पद्माक्षीस्फुटपचवक्त्र रूचिरं बालार्क कोटिद्युतिम्। हस्ते शूलकपालमुद्ररवर कौमोद की भुरूहं खट्वांगाङ्कुशपाशपर्वतधरं पीताम्बरं वानरम्॥२०१॥

हे हनुमंता! तुझ्या वानरमुखानें शरीरचेष्टा, नारसिंहमुखानें पृष्ठवंशांतील दैवीशक्ति, गरूडमुखानें कुंडलिनीवरील नियंत्रण, वराहमुखानें देहधारक अन्नाची क्षुधा व अश्वमुखानें शरीरघटकांचें अशाश्वत स्वरूप, असे हे निर्देश समजावे काय?

हे हनुमंता! हनुमत्पटलांत तुझें वरीलप्रमाणें पंचमुखी ध्यान सांगितलें आहे. तुला तुझ्या सहस्त्रनामांत पंचानन म्हणतात. हे महारूद्रा! (१) ईशान (भोक्ता), (२) तत्पुरुष (भोग्य), (३) घोराख्य (बुद्धि), (४) वामदेव (अहंकार), (५) सद्योजात (मन), याप्रमाणें भोक्ता, भोग्य, बुद्धि, अहंकार व मन यांत अधिष्ठित असलेली तुझी सत्ता हींच तुझी पंचमुखे नव्हेत काय? अथवा हे अंतर्यामिन्! आत्मा, बुद्धि, मन, ज्ञानेंद्रिय पंचक व कर्मेंद्रिय पंचक हीं तुझी पांच मुखें मानावीं? हे अंतःकरण पंचका! ह्या आमच्या आत्मारामाच्या प्रकृतीचें शुद्ध स्वरूप आम्हांस पारखें झाले आहे. ती सीताशुद्धि तूं कर.

हे पंचतुण्डा! जीवाच्या ठिकाणचे पंचभौतिक अंश, पंचकोष, पंचप्राण, आनंद-विज्ञान-मन-प्राण-वाक् या पंचकला हीं सर्व तुज अंतर्यामीचींच पंच पंचमुखें नव्हेत काय?

हे कपीश्वरा! कोणत्याहि पार्थिव पदार्थांत पंचमहाभूतांचें दर्शन होतें, त्याप्रमाणें तुझ्या पशुरूपांत, वेद (ऋक्-यजु-साम), लोक

(भू: भुव:-स्व:), प्रजा, (ससंज्ञ, अंत:संज्ञ, असंज्ञ), वीर्य (ब्रह्म--क्षत्र-विट्) व पशुहीं पंचदर्शनें होतात. तींच तुझीं अंतर्यामाची विकासानुक्रमें पांच व्यक्त मुखें होत, असें मी मानतों. किंवा ब्रह्मा, विष्णू, महेश, अग्नि आणि सोमहें आत्मक्षर पंचक अथवा अक्षर-पंचक हीं तुझीं पांच मुखें मानावीं!

## षण्मुख हनुमान्

हे महामध्यस्थपुरुषा! आनन्द, विज्ञान आणि मन अशीं तीन मुक्ति साक्षी व मन, प्राण आणि वाक् अशीं सृष्टिसाक्षी मिळून तुझीं षण्मुखें मानावीं काय? किंवा अध्यस्थ-आधार किंवा कार्य-कारण यांचे षड्विध संबंध म्हणजे (१-२) दोन प्रकारचा ओतप्रोत संबंध, (३) भेदसंबंध, (४) अभेदसंबंध, (५) भेदाभेदसंबंध व (६) अनिर्वचनीयसंबंध हीं तुझीं सहा मुखें मानावीं?

हे हनुमंता! षण्मुख कार्तिकेय आणि तूं एक कसे हें मीं मागेंच तुजपुढें निवेदन केलें आहे. तुझ्या सहस्त्रनामस्तोत्रांत तुला योगिने नम:। कुंडलिने नम:। षट्चक्रधाम्ने नम:। इत्यादी प्रकारचें नमन आहे. या तुझ्या नांवावरून तूं अंतर्यामिन महायोगी व षण्मुख आहेस, असें वाटतें.

हे मारुते, मुलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्ध आणि आज्ञा हीं जीं पिण्डांतर्गत सहा चक्रें, तींच तुझीं सहा मुखकमलें नव्हते काय?

हे योगिन्! डाकिनी, राकिनी, लाकिनी, काकिनी, शांखिनी आणि हाकिनी या सहाशक्तींवर विजय मिळवून त्या आत्मसात करणाऱ्या तुझीं हीं षड्दर्शनेंच होत. या पिंडाचे ठिकाणीं होणाऱ्या बुद्धिपुरस्सर क्रिया व अबुद्धिपूर्वक होणाऱ्या क्रिया यांत गैरमेळ असणें, हेंच दु:खाचें कारण दिसतें.

हे हनुमंता! या पिंडात वावरणाऱ्या शक्ति व बाह्य विश्वशक्ति यांच्यांत सामंजस्य नसणें, हाच यमपाश आहे, असें वाटतें. मानवाचें आणि विश्वाचें अंतर्मन आणि जीवाकडून व्यक्त होणारें ज्ञान इच्छा-क्रियात्मक कर्म, यांच्यांत जर जाणतपणें पूर्णमेळ राहील, तर तीच जीवनन्मुक्त अवस्था होईल.

प्राण आणि अपान यांच्या विरोधांत प्राणाला आपली प्रगति सहज करून घेतां येत नाहीं. पण तुझ्यासारखे योगी आपले प्राण या षड्चक्रांतून बुद्धिपुरस्सर जाणतेपणें आज्ञाचक्रांत नेऊन कृतकार्य होतात. हें क्रौंचविदारण होय. हेंच तुझें महान उड्डाण होय. हेंच तुझें वानराचा देव होणें होय. जीवाच्या अंतर्मनांत जे अनंत जन्मांचे संस्कार आहेत, त्या संस्कारांनुरूप स्वभावज अथवा प्रवाहपतित असें एक प्रकारचें कर्मप्राप्त असतें, पण एषणा त्यास दुसऱ्याच मोहांत घालतात. यामुळें दैव आणि पुरुषार्थ यांच्यांत तीव्र विरोध येऊन जीवाला निराश होण्याची वेळ येते. या अंत:कलहांत चित्ताचा निरोध करून अगोदर बहिर्मन आणि नंतर अंतर्मन शुद्ध करण्याचें काम तसेंच राहातें. वास्तव बहिर्मनाच्या व शक्य तों अंतर्मनाच्याहि क्रिया बंद करून मोकळे झालेले प्राण षड्चक्रभेद करीत करीत आज्ञाचक्रांतून पैलपार गेल्यावांचून विश्वांतील महाप्राणांशीं त्यांचें सामंजस्य घडत नाहीं व जीवशिवाचें ऐक्य लाभत नाहीं. पण हें दुर्घट कृत्य तुझ्या कृपेवांचून कसें व्हावें बरें?

हे हनुमंता! जीवाचें ठिकाणीं सुप्तावस्थेंत असलेली कुंडलिनी ही तुज ईश्वराची लांगूलरूप माया आहे. तीच जीवाच्या स्थितीला कारण आहे. ती माया व तिचें कार्य सामान्य जीवांना कळत नाहीं. त्या अज्ञात अशा शक्तीच्या नियंत्रणांत जीवाला आपले जीवन ठेंचा खात खात व अपयश, दु:ख, संताप, निराशा, रोग, यांचे कटू अनुभव घेत घेत कंठावें लागतें. पण हे प्राणेश्वरा! तुझ्यासारखे महायोगी या चित्कलेच्या साहीचक्रांत स्वैरसंचार करून कुंडलिनीरूप जागृत मायेवर प्रभुत्त्व संपादन करतात व लोकोत्तर सामर्थ्य प्राप्त करून घेतात. रामायणांत व्यक्त झालेल्या तुझ्या लोकविलक्षण चरित्रांत तुझीं हीं षड्शक्तिधारक प्रसन्न मुखकमलें तज्ञांना स्पष्ट दिसून येत असावीत! हे अंतर्यामिन्! तुझें हें दिव्यदर्शन मला कधीं अपरोक्ष होईल काय? अथवा, हे हनुमंता! (१) ईश्वरानें जो भोग आपणांस दिला त्यात संतोष मानावा, (२) परधन-परकांता यांचा मोह कधीं धरू नये, (३) देहधारी आहों तोंवर उद्योगशील असावें, (४) या विश्वाचा केंद्र जो सूर्य तोच त्यांतील आत्मा व तेंच आपलेंहि आत्मरूप जाणावें, (५) याप्रमाणें ध्येय काय व आपण करीत आलों काय, याचा सावधानतेनें विचार करावा, (६) आपला अधिकार व आपलें बल यास अनुसरूनच कर्म करावें. अशीं जीं सहा ईश दर्शनें, तींच तुझींहि षड्विध दर्शनें मला साक्षात्कृत होऊन तीं माझ्या आचरणांत केव्हां उतरतील बरें?

## सप्तमुखी हनुमान

हे हनुमंता! ही सृष्टी उत्पन्न होण्यापूर्वी भौतिक सद्वादद्दृष्टीनें असत्तत्त्व होतें, तेंच सप्तविध प्राणांत विभागले गेलें. (ह्या असत् प्राणांस सप्तर्षि म्हणतात.) त्या सात विभागांचे पुन्हां पंचीकरणाप्रमाणें सात सात विभाग झाले. याप्रमाणें सप्तसप्त विभागात्मक जें विश्वाचें उपादानकारक तेंच तुझें (मरुद्गण) रूप काय?

हे हनुमंता! तुझ्या सहस्त्रनामस्तोत्रांत व कवचांत सप्तसंख्यात्मक अशीं तुझीं नांवे बरींच आहेत. ह्या दिक्कालात्मक पिण्डब्रह्मांडरचनेंत सप्तकांचे महत्त्व फारच दिसतें.

हे सप्तजिव्हपते! ब्रह्मांडातील सप्तसागर, सप्तस्वर्ग, सप्तलोक, सप्तपाताल, सप्तद्वीपें, सप्तजन, सप्तऋषि, सप्तग्रह, सातवासर, सप्तछंद, सप्तपदार्थ, सप्तशिख, सप्तव्याहृति, सप्तसंस्था इत्यादी सप्तकांप्रमाणें या पिंडांतहि सप्तरस, सप्तधातू, सप्तशीर्षण्यप्राण, (सहस्त्रारधरून) सातचक्रें, रक्त, रोग, ऋतु व गर्भाची वाढ यांचीं एक अगर अनेक सातेऱ्यांचीं होणारी आवर्तनें, असें अनेक सप्तविध प्रकार आढळतात. तीं सारीं तुझींच सप्तसप्त मुखें होत.

हे प्राणेश्वरा! चत्वार आत्मा, दोन पक्षप्राण आणि एक पुच्छप्राण याप्रमाणें तुझीं सप्तविध मुखें जाणावीं, असेंहि मनांत येतें. हे मर्मज्ञा! रसायनशास्त्रांत सप्तविधता हें एक गूढ प्रमेय मानलें आहे. सुरांत सप्त सूर, वर्णांत सात वर्ण, सप्तछंद, सप्तमातृका, सात विकार असें आणखी कितीतरी सप्तविध प्रकार आढळतात.

हे मारुते! सप्तविध मरुद्गणांपैकींच तूं एक आहेस. मानवाची बुद्धि व पशूचें पार्थिव शरीर अशी तुझी सप्तविधता आहे. तुझ्या सहस्त्रनामांवरून या सप्तविधतेशीं तुझा विशेष संबंध दिसतो. त्याअर्थीं तुला सप्तमुख